भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# भारतीय संविदा अधिनियम, १८७२

**(सन १८७२ चा अधिनियम क्रमांक ९)**

[दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान]

# The Indian Contract Act, 1872

**(Act No. 9 of 1872)**

[*As in force on the 10th November 2009*]

*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२०१४

[ किंमत : रुपये ४०-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान असलेला दि इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा,** अनुभाग १, खंड १६, अंक १, दिनांक २८ जुलै, २०११ यात पृष्ठे २३ ते ६६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २८ जुलै, २०११.

**व्ही. के. भसीन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Indian Contract Act, 1872 as on the 10th November, 2009 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazettee of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol.16, dated 28th July, 2011 on pages 23 to 66.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 28th July, 2011.

V. K. BHASIN,
Secretary to the
Government of India.

# भारतीय संविदा अधिनियम, १८७२

## कलमांचा क्रम

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**

**उद्देशिका**

१. नाव, विस्तार व प्रारंभ
व्यावृत्ति
२. अर्थ लावणारा खंड

प्रकरण एक

**प्रस्तावांची संसूचना, स्वीकार व तो परत घेणे यांविषयी**

३. प्रस्तावांची संसूचना, स्वीकार व तो परत घेणे.
४. संसूचना केव्हा पूर्ण होते.
५. प्रस्तावांचे व स्वीकारांचे परत घेणे.
६. परत घेणे कसे केले जाते.
७. स्वीकार निरपवाद असला पाहिजे.
८. शर्तीचे पालन केल्यामुळे किंवा प्रतिफल घेतल्यामुळे स्वीकृती.
९. व्यक्त व उपलक्षित वचने.

प्रकरण दोन

**संविदा, शून्यकरणीय संविदा व शून्यवत करार यांविषयी**

१०. कोणते करार संविदा असतात.
११. संविदा करण्यास कोण सक्षम असतात.
१२. संविदा करण्याच्या प्रयोजनार्थ निकोप मन कोणते.
१३. " संमती " याची व्याख्या.
१४. " मुक्त संमती " याची व्याख्या.
१५. " जबरदस्ती " याची व्याख्या.
१६. " गैरवाजवी प्रभाव " याची व्याख्या.
१७. " लबाडी " याची व्याख्या.
१८. " विपर्यास " याची व्याख्या.
१९. मुक्त संमतीरहित करारांची शून्यकरणीयता.
१९क. गैरवाजवी प्रभावामुळे निर्माण झालेली संविदा रद्द टरवण्याचा अधिकार.
२०. जेथे तथ्याच्या बाबीबाबत उभय पक्षकारांची चूकभूल असेल तेथे करार शून्यवत असणे.
२१. कायद्याबाबतच्या चूकभुलींचा परिणाम.
२२. तथ्याच्या बाबींबाबत का पक्षकाराच्या झालेल्या चूकभुलीमुळे उद्‌भवलेली संविदा.
२३. कोणती प्रतिफले व उद्दिष्टे कायदेशीर असतात व कोणती नसतात.

**शून्यवत करार**

२४. प्रतिफले व उद्दिष्टे जर अंशतः बेकायदेशीर असली तर करार शून्यवत असणे.

२५. विनाप्रतिफल करार, जर तो लेखी व नोंदणी केलेला नसेल अथवा एखादी गोष्ट केल्याबद्दल भरपाई करण्याचे ते वचन नसेल अथवा मुदतमर्यादा कायद्याद्वारे मुदतबाह्य झालेल्या ऋणाची परतफेड करण्याचे ते वचन नसेल तर शुन्यवत असणे.

२६. विवाह निरोधी करार शून्यवत असणे.

२७. व्यापार, निरोधी करार शून्यवत असणे.
ज्याचे ख्यातिमूल्य विकण्यात आले आहे असा धंदा न चालवण्याबद्दलच्या कराराची व्यावृत्ति.

२८. वैध कार्यवाहीच्या, निरोधी करार.

उद्‌भवेल तो विवाद लवादाकडे निर्देशित करण्याच्या संविदेची व्यावृत्ति.

आधिच उद्‌भवलेले प्रश्न निर्देशित करण्याच्या संविदेची व्यावृत्ति.

२९. अनिश्चिततेमुळे करार शून्यवत असणे.

३०. जुगाराच्या मार्गाने केलेले करार शून्यवत असणे.

अश्वशर्यतीसाठीच्या विवक्षित बक्षिसाप्रीत्यर्थ अपवाद.

भारतीय दंड संहितेच्या कलम २९४क वर परिणाम न होणे.

प्रकरण तीन

**समाश्रित संविदांविषयी**

३१. "समिश्रित संविदे" ची व्याख्या.

३२. घटना न घडण्यावर समाश्रित असलेल्या संविदा अंमलात आणणे.

३३. घटना न घडण्यावर समाश्रित असलेल्या संविदा अंमलात आणणे.

३४. संविदा जिच्यावर समाश्रित आहे ती घटना म्हणजे हयात व्यक्तीचे भविष्यरालीन आचरण असेल तर, ती घटना अशक्य असल्याचे केव्हा मानावयाचे.

३५. विनिर्दिष्ट घटना निश्चित कालावधीत घडण्यावर ज्या संविदा समाश्रित असतात त्या केव्हा शून्यवत होतात.

विनिर्दिष्ट घटना निश्चित कालावधीत न घडण्यावर ज्या संविदा समाश्रित असतात त्या केव्हा अंमलात आणता येतील.

३६. अशक्य घटनांवर समाश्रित असलेला करार शून्यवत असणे.

प्रकरण चार

**संविदांच्या पालनाविषयी**

**ज्यांचे पालन केलेच पाहिजे अशा संविदा**

३७. संविदांतील पक्षकारांचे आबंधन.

३८. पालनाची प्रविदा स्वीकारण्यास नकार दिल्याचा परिणाम.

३९. वचनाचे संपूर्णपणे पालन करण्यास पक्षकाराने नकार दिल्याचा परिणाम.

**संविदनाचे पालन कोणी करावयाचे**

४०. जिने वचनाचे पालन करावयाचे ती व्यक्ती.

४१. त्रयस्थ व्यक्तीने केलेले पालन स्वीकारल्याचा परिणाम.

४२. संयुक्त दायित्वांची प्रक्रांती.

४३. संयुक्त वचनदात्यांपैकी कोणाही एकाला पालन करण्यास भाग पाडता येईल.

प्रत्येक वचनदाता अंशदान करण्यास भाग पाडू शकेल.

अंशदान करम्यातील कसुरीमुळे झालेल्या तोट्यात हिस्सा असणे.

## पालनासाठी अवधी व ठिकाण

४६. जेथे आवेदन करावयाचे नाही आणि कोणताही अवधी विनिर्दिष्ट केलेला नाही तेथे वचनाच्या पालनासाठी कालावधी.

४७. जेथे अवधी विनिर्दिष्ट केलेला आहे आणि आवेदन करावयाचे नाही तेथे वचनाच्या पालनासाठी अवधी व ठिकाण.

४८. विवक्षित दिवशी करावयाचे पालन योग्य वेळी व ठिकाणी होण्यासाठी आवेदनपत्र.

४९. जेथे वचनाच्या पालनासाठी आवेदन करावयाचे नाही व कोणतेही ठिकाण निश्चित केलेले नाही तेथे पालनासाठी ठिकाण.

५०. वचनग्रहीत्याने विहित किंवा मंजूर केलेल्या रीतीने किंवा वेळी पालन करणे.

## अन्योन्य वचनाचे पालन

५१. अन्योन्य वचनगआहीता पालन करण्यास तयार व राजी असल्याशिवाय वचनदाता पालन करण्याला बांधील नाही.

५२. अन्योन्य वचनांच्या पालनाचा क्रम.

५३. ज्या घटनेमुळे संविदा परिणामक व्हावयाची आहे त्या घटनेस प्रतिबंध करणाऱ्या पक्षकाराचे दायित्व.

५४. अन्योय वचनांची मिळून बनलेल्या संविदेत, ज्या वचनांचे पालन प्रथम करावयाचे त्याबाबतचा कसुरीचा परिणाम.

५५. ज्या संविदेत वेळ अत्यावश्यक असते त्याप्रसंगी तिचे पालन निश्चित वेळी करण्यास कसूर केल्याचा परिणाम.

जेव्हा वेळ अत्यावश्यक नसते तेव्हा अशी कसून करण्याचा परिणाम.

संमत झालेल्यापेक्षा अन्य वेळी केलेल्या पालनाच्या स्वीकृतीचा परिणाम.

५६. अशक्य कृती करण्याचा करार.

नंतर अशक्य किंवा बेकायदेशीर ठरणारी कृती करण्याची संविदा.

अशक्य किंवा बेकायदेशीर असल्याचे माहीत असलेल्या कृतीचे पालन न केल्यामुळे झालेल्या हानीबद्दल भरपाई.

५७. वैध गोष्टी आणि तसेच अन्य अवैध गोष्टीही करण्याचे अन्योन्य वचन.

५८. एक शाखा अवैध असलेले पर्यायी वचन.

## प्रदानाचे विनियोजन

५९. फेडावयाचे ऋण दर्शवलेले असते त्याबाबतीतील प्रदानाचे उपयोजन.

६०. फेडावयाचे ऋण दर्शवलेले नसते त्याबाबतीत प्रदानाचे उपयोजन.

६१. जेथे कोणताही पक्षकार विनयोग निश्चित करत नाही त्याबाबतीतील प्रदानाचे उपयोजन.

## ज्यांचे पालन करण्याची गरज नाही त्या संविदा

६२. संविदेचे नवीनीकरण, विखंडन व त्याय फेरफार यांचा परिणाम.

६३. वचनग्रहीत्याला वचनाचे पालन अनावश्यक किंवा माफ करता येईल.

६४. शून्यकरणीय संविदेच्या विखंडनाचे परिणाम.

६५. शून्यवत करारानुसार किंवा जी शून्यवत होते त्या संविदेनुसार जिला फायदा मिळालेला असेल त्या व्यक्तीचे आबंधन.

६६. शून्यकरणीय संविदेचे विखंडन संसूचित करण्याची किंवा ती परत घेण्याची पद्धत.

६७. वचनग्रहीत्याने वचनदात्याला पालनकरता वाजवी सोयी उपलब्ध करून देण्याबाबत दुर्लक्ष केल्याचा परिणाम.

प्रकरण पाच

**संविदेने निर्माण केलेल्या संबंधाशी सदृश्य असणाऱ्या विवक्षित संबंधाविषयी**


६८. संविदा करण्यास असमर्थ असलेल्या व्यक्तीला किंवा तिच्यासाठी पुरवठा केलेल्या आवश्यक वस्तूंबाबत दावा सांगणे.

६९. ज्याचे प्रदान होण्यात एखादी व्यक्ती हितसंबंधित आहे अशा दुसऱ्याकडून देय असलेल्या पैशाचे तिने प्रदान केल्याबद्दल तिला प्रतिपूर्ती.

७०. निःशुल्क नसलेल्या कृतीचा लाभ उपभोगणाऱ्या व्यक्तीचे आबंधन.

७१. मला सापडलेल्याची जबाबदारी.

७२. चूकभूलीने किंवा जबरदस्तीमुळे ज्या व्यक्तीला पैसे देण्यात आले किंवा वस्तू स्वाधीन करण्यात आली तिचे दायित्व.


**संविदाभंगाच्या परिणामंविषयी**


७३. संविदाभंगामुळे घडून आलेली हानी किंवा नुकसान याबद्दल भरपाई.

संविदेने निर्माण केलेल्यांश सदृश्य असलेली आबंधने पार पाडण्यात कसूर केल्याबद्दल भरपाई.

७४. संविदाभंगासाठी शास्ती करारनिविष्ट असेल अशा बाबतीत संविदाभंगाबद्दल भरपाई.

७५. संविदा अधिकारातः विखंडित करणारा पक्षकार भरपाईस हक्कदार.


प्रकरण सात

**मालविक्रय**


७६ ते १२३. [निरसित]


प्रकरण आठ

**क्षतिपूर्ती व हमी यांविषयी**


१२४. "क्षतिपूर्ती संविदे" ची व्याख्या.

१२५. क्षतिपूर्ती धारकांविरूद्ध दावा आणला असता त्याचे हक्क.

१२६. "हमी संविदा", "प्रतिभू", "मुख्य ऋणको" , "धनको".

१२७. हमीसाठी प्रतिफल.

१२८. प्रतिभूचे दायित्व.

१२९. अविरत हमी.

१३०. अविरत हमी परत घेणे.

१३१. प्रतिभूच्या मृत्यूमुळे अविरत हमी परत घेणे.

१३२. प्रथमतः दायी असलेल्या दोन व्यक्तींच्या दायित्वामध्ये, त्यांच्यामधील एराची कसूर झाली तर दुसरा प्रतिभू होईल. अशी संव्यवस्था त्यांच्याकडे झालेली असल्यास तिचा परिणाम होणार नाही.

१३३. संविदेच्या अटींमध्ये फेरफार केल्यामुळे प्रतिभूची विमुक्ती.

१३४. मुख्य ऋणकोच्या मुक्तीमुळे किंवा विमुक्तीमुळे प्रतिभूची विमुक्ती.

१३५. धनको मुख्य ऋणकोशी आपसमेळ करतो किंवा त्याला अवधी देतो किंवा त्यांच्याविरूद्ध दावा न आणण्याचा करार करतो अशा बाबतीत प्रतिभूची विमुक्ती.

१३६. मुख्य ऋणकोला अवधी देण्याची संविदा त्रयस्थ व्यक्तींशी केली जाते अशा बाबतीत प्रतिभू विमुक्त होत नाही.

१३७. धनको दावा आणण्यापासून परावृत्त राहिल्याने प्रतिभू विमुक्त होत नाही.

१३८. एका प्रतिभूतीच्या मुक्तीमुळे इतर विमुक्त होत नाहीत.

१३९. प्रतिभूच्या परिणामस्वरुप उपायास हानी पोचवणाऱ्या धनकोच्या कृती किंवा अकृतीमुळे प्रतिभूची विमुक्ती.

१४०. फेड किंवा पालन झाल्यावर प्रतिभूचे अधिकार.

१४१. धनकोच्या प्रतिभूतींच्या फायद्यावर प्रतिभूचा अधिकार.

१४२. विपर्यासाद्वारे मिळवलेली हमी अवैध.

१४३. लपवणुकीद्वारे मिळवलेली हमी अवैध.

१४४. हमीत सहप्रतिभू सामील होईपर्यंत धनको तिच्या आधारावर कृती करणार नाही अशा संविदेवर हमी.

१४५. सहप्रतिभूचे क्षतिपूर्ती करण्याचे उपलक्षित वचन.

१४६. सहप्रतिभू समान अंशदान करण्यास दायी.

१४७. भिन्न भिन्न रकमांसाठी असलेल्या सहप्रतिभूंचे दायित्व.

प्रकरण नऊ

## निक्षेपाविषयी

१४८. " निक्षेप ", " निक्षेपक " व " निक्षेपग्राही " यांच्या व्याख्या

१४९. निक्षेपग्राहीला सुपूर्गीय कशी करावयाची.

१५०. निक्षेपित मालातील वैगुण्य उघड करणे हे निक्षेपकाचे कर्तव्य.

१५१. निक्षेपग्राहीने घ्यावयाची काळजी.

१५२. निक्षेपित वस्तू गहाळ होणे इत्यादीबद्दल निक्षेपग्राही केव्हा दायी नसतो.

१५३. निक्षेपाग्राहीने शर्तीशी विसंगत कृती केल्यामुळे निक्षेपाचे समापन.

१५४. निक्षेपित मालाचा अनधिकृत वापर करणाऱ्या निक्षेपग्राहीचे दायित्व.

१५५. निक्षेपकांच्या समंतीने त्याच्या मालाचे निक्षेपग्राहीच्या मालाशी मिश्रण केल्याचा परिणाम.

१५६. माल वेगळा केला जाऊ शकतो तेव्हा, निक्षेपकाच्या संमतीशिवाय केलेल्या मिश्रणाचा परिणाम.

१५७. माल वेगळा केला जाऊ शकत नाही अशा बाबतीत निक्षेपकांच्या संमतीशिवाय केलेल्या मिश्रणाचा परिणाम.

१५८. आवश्यक त्या खर्चाची निक्षेपकाने फेड करणे.

१५९. निःशुल्क उसना दिलेला माल परत करणे.

१६०. निक्षेपित माल मुदत संपताच किंवा प्रयोजन साध्य परत करणे.

१६१. माल योग्य रीतीने परत केला नसेल अशा बाबतीत निक्षेपग्राहीची जबाबदारी.

१६२. निःशुल्क निक्षेपाचे मृत्युमुळे समापन.

१६३. निक्षेपित केलेल्या मालापासूनच्या वृद्धीस किंवा फायद्यात निक्षेपक हक्कदार.

१६४. निक्षेपकाची निक्षेपग्राहीच्या बाबतीतली जबाबदारी.

१६५. अनेक संयुक्त मालकांकडून निक्षेप.

१६६. विनाहक्क निक्षेपकाच्या पुन्हा स्वाधीन केली असता निक्षेपग्राही जबाबदार नाही.

१६७. निक्षेपित मालावर दावा सांगणाऱ्या त्रयस्थ व्यक्तीचा हक्क.

१६८. माल सापडलेल्याचा हक्क देऊ केलेल्या विनिर्दिष्ट बक्षिसाकरता त्याला दावा करता येईल.

१६९. सामान्यतः विक्रेय असलेली वस्तू सापडलेल्या व्यक्तीला ती विकता येईल.

१७०. निक्षेपग्राहीचा विशिष्ट धारणाधिकार.

१७१. बँकव्यवसायी, वखारिये, मालधक्कालावे, न्यायवादी व विमादलाल यांच्या सर्वसाधारण धारणाधिकार.

**तारणरूप निक्षेप**

१७२. “ तारण ”, “ तारणकार ” व “ तारणधारक ” यांच्या व्याख्या

१७३. तारणधारकाचा अडवून ठेवण्याचा हक्क

१७४. ज्यासाठी माल तारण ठेवला त्याहून अन्य तारणासाठी किंवा वचनासाठी तारणधारकाने माल ठेवून घ्यावयाचा नाही. मागाहूनच्या कर्जाच्या बाबतीत गृहीतक.

१७५. आलेल्या असाधारण खर्चाबाबत तारणधारकाचा हक्क.

१७६. तारणकार कसूर करतो त्याबाबतीतील तारणधारकाचा हक्क.

१७७. कसूर करणाऱ्या तारणकाराचा विमोचनाचा हक्क.

१७८. व्यापारी अभिकर्त्याने केलेले तारण.

१७८क. शून्यकरणीय संविदेनुसार कब्जा असलेल्या व्यक्तीने केलेले तारण.

१७९. तारणकाराला केवळ मर्यादित हितसंबंध असेल त्याबाबतीतील तारण.

**निक्षेपग्राही निक्षेपक यांचे अपकर्त्याविरूद्ध दावे**

१८०. निक्षेपग्राहीचा किंवा निक्षेपकाचा अपकृत्याविरूद्ध दावा.

१८१. अशा दाव्यांमधून मिळालेल्या अनुतोषांचे किंवा भरपाईचे संविभाजन.

प्रकरण दहा

**अभिकरण**

**अभिकर्त्यांची नियुक्ती प्राधिकार**

१८२. “ अभिकर्ता ” व “ प्रकर्ता ” यांच्या व्याख्या

१८३. अभिकर्ता कोण नेमू शकतो.

१८४. अभिकर्ता कोणाला होता येईल.

१८५. प्रतिफल असणे आवश्यक नाही.

१८६. अभिकर्त्याचा प्राधिकार व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.

१८७. व्यक्त व उपलक्षित प्राधिकार यांची व्याख्या.

१८८. अभिकर्त्याच्या प्राधिकाराची व्याप्ती.

१८९. आणीबाणीच्या प्रसंगी अभिकर्त्याचा प्राधिकार.

**उप-अभिकर्ते**

१९०. अभिकर्ता प्रत्यायोजन केव्हा करू शकत नाही.

१९१. “ उप-अभिकर्ता ” यांची व्याख्या.

१९२. योग्यरीतीने नेमलेल्या उप-अभिकर्त्याद्वारे प्रकर्त्याचे प्रतिनिधित्व.

अभिकर्त्याची उप-अभिकर्त्याबद्दलची जबाबदारी.

उप-अभिकर्त्याची जबाबदारी.

१९३. प्राधिकाराशिवाय नियुक्त केलेल्या उप-अभिकर्त्याबद्दल अभिकर्त्याची जबाबदारी.

१९४. प्रकर्ता व अभिकरणाच्या वतीने कार्य करण्यासाठी अभिकर्त्याने रीतसर नियुक्त केलेल्या व्यक्ती यांच्यामधील नाते.

१९५. अशा व्यक्ती नामित करताना अभिकर्त्याचे कर्तव्य.

## अनुमती

१९६. एखाद्या व्यक्तीकरता, तिच्या प्राधिकाराशिवाय केलेल्या कृतींबाबत तिचा हक्क. अनुमतीचा परिणाम.

१९७. अनुमती व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.

१९८. विधिग्राह्य अनुमतीसाठी माहिती आवश्यक.

१९९. संव्यवहाराचा भाग असलेल्या प्राधिकृत न केलेल्या कृतीला अनुमती देण्याचा परिणाम.

२००. प्राधिकृत न केलेल्या व्यक्तीला दिलेल्या अनुमतीमुळे त्रयस्थ व्यक्तीला क्षती पोचत नाही.

## प्राधिकार परत घेणे

२०१. प्राधिकरणाचे समापन

२०२. विषयवस्तूत अभिकर्त्याचा हितसंबंध असतो अशाबाबतीत अभिकरणाचे समापन.

२०३. प्रकर्त्याला अभिकर्त्याचा प्राधिकार केव्हा परत घेता येईल.

२०४. प्राधिकार अंशतः वापरला असेल अशा बाबतीतील परत घेणे.

२०५. प्रकर्त्याने परत घेण्याबद्दल किंवा अभिकर्त्याने त्याग केल्याबद्दल नुकसानभरपाई.

२०६. परत घेण्याची किंवा त्याग करण्याची नोटीस.

२०७. परत घेणे आणि त्याग करणे व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.

२०८. अभिकर्त्याच्या प्राधिकाराचे समापन अभिकर्त्यापुरते व त्रयस्थ व्यक्तीपुरते केव्हा परिणामक होते.

२०९. प्रकर्त्याच्या मृत्यूमुळे किंवा भ्रमिष्टपणामुळे अभिकरण समापित झाले असता अभिकर्त्याचे कर्तव्य.

२१०. उप अभिकर्त्याच्या प्राधिकाराचे समापन.

## अभिकर्त्याते प्रकर्त्याविषयीचे कर्तव्य.

२११. प्रकर्त्याच्या धंद्याचे चालन करताना अभिकर्त्याचे कर्तव्य

२१२. अभिकर्त्याच्या बाबतीत आवश्यक असलेले कौशल्य व तत्परता.

२१३. अभित्र्याचे हिशेब.

२१४. प्रकर्त्याशी संपर्क साधण्याचे अभिकर्त्याचे कर्तव्य.

२१५. अभिकरणाच्या धंद्यात प्रकर्तांच्या संमतीशिवाय अभिकर्ता त्याच्या स्वतःच्या फायद्यासाठी व्यवहार करतो अशाबाबतीत प्रकर्त्यांचा हक्क.

२१६. अभिकरणाच्या धंद्यात स्वतः फायद्यासाठी व्यवहार करत असताना अभिकर्त्यांने मिळवलेल्या लाभावर प्रकर्त्यांचा हक्क.

२१७. प्रकर्त्यांसाठी मिळालेल्या रकमांमधून अडवून ठेवण्याचा हक्क.

२१८. प्रकर्त्यांकरता मिळालेल्या रकमांचा भरणा करण्याचे अभिकर्त्यांचे कर्तव्य.

२१९. अभिकर्त्यांचे पारिश्रमिक केव्हा देय होते.

२२०. गैरचालित धंद्याबद्दल अभिकर्ता पारिश्रमिकास हक्कदार नसतो.

२२१. प्रकर्त्यांच्या मालमत्तेवर अभिकर्त्यांचा धारणाधिकार.

## अभिकर्त्याविषयीचे प्रतकर्त्यांचे कर्तव्य.

२२२. कायदेशीर कृतींच्या परिणामांबाबत अभिकर्त्यांची क्षतिपूर्ती करावयाची.

२२३. सद्भावपूर्वक केलेल्या कृतींच्या परिणामांबाबत अभिकर्त्यांची क्षतिपूर्ती.

२२४. गुन्हेगारी कृतीमध्ये अभिकर्त्यांसाठी नियोक्ता दायी नसणे.

२२५. प्रकर्त्यांच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या क्षतीबद्दल अभिकर्त्यांला भरपाई.

त्रयस्त व्यक्तींशी केलेल्या संविदावर अभिकरणाचा प्रस्ताव.

२२६. अभिकर्त्याच्या संविदा अंमलात आणणे व परिणाम.

२२७. जेव्हा अभिकर्ता प्राधिकाराला अतिक्रम करतो तेव्हा प्रकर्ता कोठवर बांधलेला असतो.

२२८. जेव्हा अभिकर्त्यांच्या प्राधिकाराचा अतिक्रम पृथक करता येण्यासारखा नसतो तेव्हा प्रकर्ता बांधलेला नाही.

२२९. अभिकर्त्याला दिलेल्या नोटिशीचे परिणाम.

२३०. प्रकर्त्यांच्या वतीने केलेल्या संविदा अभिकर्ता जातीने अंमलात आणू शकत नाही किंवा त्याद्वारे बांधला जाऊ शकत नाही.

तद्विरूद्ध संविदा असल्याचे गृहीतक.

२३१. उघड न केलेल्या अभिकर्त्याने केलेल्या संविदेतील पक्षकारांचे अधिकार.

२३२. प्रकर्ता समजला गेलेल्या अभिकर्त्याशी केलेल्या संविदेचे पालन.

२३३. जातीने दायी असलेल्या अभिकर्त्याशी व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचा हक्क.

२३४. प्रकर्ता किंवा अभिकर्ता यालाच केवळ दायी धरला जाईल या विश्वासावर कार्य करण्यास अभिकर्त्याला किंवा प्रकर्त्याला प्रवृत करण्याचे परिणाम.

२३५. बनावट अभिकर्त्याचे दायित्व.

२३६. अभिकर्ता म्हणून खोटेपणाने संविदा करणारी व्यक्ती पालनास हक्कदार नाही.

२३७. अभिकर्त्याच्या अप्राधिकृत असलेल्या कृती प्राधिकृत होत्या असा समाज निर्माण करणाऱ्या प्रकर्त्याचे दायित्व.

२३८. अभिकर्त्याने केलेल्या विपर्यासाचा किंवा लबाडीचा करारावर परिणाम.

प्रकरण अकरा

**भागीदाराविषयक**

२३९ ते २६६. निरसित

**अनुसूची.** निरसित.

# भारतीय संविदा अधिनियम, १८७२

## (१८७२ चा अधिनियम क्रमांक ९)[१]

( १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान )

[२५ एप्रिल, १८७२]

**ज्याअर्थी**, संविदासंबंधीच्या कायद्यांच्या विवक्षित भागांची व्याख्या करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे, **उद्देशिका.**

**त्याअर्थी**, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रारंभिक

**१.** या अधिनियमास ' भारतीय संविदा अधिनियम, १८७२ ' असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ.**

[२][जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून] संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे, आणि तो सप्टेंबर, १८७२ च्या पहिल्या दिवशी अंमलात येईल.

[३]* * * यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, याद्वारे स्पष्टपणे निरसित न केलेल्या कोणत्याही संविधीच्या, अधिनियमाच्या किंवा विनियमाच्या तरतुदीवर, अथवा या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या कोणत्याही व्यापारी परिपाठावर किंवा रूढीवर किंवा कोणत्याही संविदेच्या कोणत्याही घटितावर परिणाम करणार नाही. **व्यावृत्ति.**

**२.** या अधिनियमात, संदर्भावरून विरुद्ध हेतू दिसून येत नसेल तेथे, पुढील शब्द व शब्दप्रयोग पुढील अर्थानी वापरले आहेत :— **अर्थ लावणारा खंड.**

(क) जेव्हा एक व्यक्ती कोणतीही गोष्ट करण्याची किंवा ती करण्यापासून अप्रवृत्त राहण्याची आपली इच्छा दुसऱ्याला, अशा कृतीस किंवा अप्रवृत्तीस त्या दुसऱ्याची अनुमती मिळवण्याच्या हेतूने दर्शवते, तेव्हा तिने प्रस्ताव केला असे म्हटले जाते ;

(ख) जिच्याकडे प्रस्ताव करण्यात येतो ती व्यक्ती जेव्हा त्याबाबत आपली अनुमती दर्शवते, तेव्हा तो प्रस्ताव स्वीकारण्यात आला आहे असे म्हटले जाते. प्रस्ताव जेव्हा स्वीकृत होतो तेव्हा तो वचन होतो ;

(ग) प्रस्ताव करणाऱ्या व्यक्तीला "वचनदाता" असे म्हणतात, आणि प्रस्ताव स्वीकारणाऱ्या व्यक्तीला "वचनग्रहीता" असे म्हणतात ;

(घ) जेव्हा, वचनदात्याच्या इच्छेवरून, वचनग्रहीत्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने एखादी गोष्ट केलेली असते किंवा ती करण्यापासून ती अप्रवृत राहिलेली असते, अथवा करते किंवा करण्यापासून अप्रवृत्त राहते, अथवा करण्याचे किंवा करण्यापासून अप्रवृत्त राहण्याचे वचन देते, तेव्हा, अशा कृतीस किंवा अप्रवृत्तीस किंवा वचनास "वचनाचे प्रतिफल" असे म्हणतात ;

---

१. भारताकरता मुख्य कायद्यांचा संग्रह तयार करण्यासाठी नेमलेल्या हर मॅजेस्टीज कमिशनर्स यांच्या दिनांक ६ जुलै, १८६६ च्या अहवालावर आधारलेल्या विधेयकाची उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरता पहा :

**भारताचे राजपत्र,** १८६७, असाधारण, पृष्ठ ३४; संयुक्त समितीच्या अहवालाकरता, पहा : **भारताचे राजपत्र,** १८६७, असाधारण, दि. २८ मार्च, १८७२, कौसिलमधील चर्चेकरता पहा, **भारताचे राजपत्र,** असाधारण, १८६७, पुरवणी, पृष्ठ १०६४ **भारताचे राजपत्र,** असाधारण, १८७१, पृष्ठ ३१३ आणि **भारताचे राजपत्र,** असाधारण, १८७१, पृष्ठ ५२७.

"संपत्ति हस्तांतरण अधिनियम, १८८२" (१८८२ चा ४) याची जी प्रकरणे आणि कलमे संविदांशी संबंधित आहेत ती, ज्या ठिकाणी तो अधिनियम लागू आहे त्या ठिकाणी या अधिनियमाचा भाग असल्याचे मानले जाईल. पहा १८८२ चा अधिनियम ४, कलम ४

या अधिनियमाचा "वऱ्हाड विधी अधिनियम, १९४१" (१९४१ चा ४) द्वारे वऱ्हाडवर, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दादरा व नगर हवेलीवर, १९६३ चा विनियम ११ कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीववर, १९६३ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय आणि अमिनदीवी बेटांवर, १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची याद्वारे पाँडिचेरीवर विस्तार केला आहे आणि पुढील ठिकाणी तो अंमलात असल्याचे घोषित केले आहे :—

संथाळ परगणे - पहा : "संथाळ परगणे न्याय व विधी विनियम, १८९९" (१८९९ चा ३) कलम ३ द्वारे विशोधित केल्यानुसार "संथाळ परगणे धाराबंदी विनियम", (१८७२ चा ३) कलम ३. पंथ पिप्लोद- पहा : "पंथ पिप्लोद विधी विनियम, १९२९" (१९२९ चा १) - कलम २.

"अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४" (१८७४ चा १४) च्या कलम ३ अन्वये पुढील ठिकाणी तो अंमलात असल्याचे घोषित करण्यात आले आहे - आग्रा प्रांतातील तराई (दलदलीचा प्रदेश) - **भारताचे राजपत्र,** १८७६, भाग एक, पृष्ठ ५०५.

हजारीबाग, लोहारदाग, मानभूम हे जिल्हे आणि सिंगभूम जिल्ह्यातील परगणा घालभूम आणि कोल्हान- पहा : **भारताचे राजपत्र,** १८८१, भाग एक, पृष्ठ ५०४. लोहारदाग जिल्हयात सध्या १८९४ मध्ये वेगळा केलेला विद्यमान पलमाँ जिल्हा समाविष्ट आहे. लोहारदाग जिल्ह्याला आता रांची जिल्हा असे म्हणतात- पहा : **कलकता राजपत्र,** १८९९- भाग एक, पृष्ठ ४४.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग व राज्ये खेरीज करून" याऐवजी घातले.

३. १९१४ चा अधिनियम १० - कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे "यासोबतच्या अनुसूचीत उल्लेखिलेल्या अधिनियमिती तिच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या व्याप्तीपुरत्या निरसित झाल्या आहेत, परंतु" हे शब्द निरसित झाले.

(ङ) जी एकमेकांचे प्रतिफल होतात असे प्रत्येक वचन व प्रत्येक वचन-संच म्हणजे करार होय ;

(च) जी एकमेकांचे प्रतिफल किंवा त्या प्रतिफलाचा भाग होतात त्या वचनांना "अन्योन्य वचने" असे म्हणतात ;

(छ) कायद्याद्वारे बजावणीयोग्य नसलेला करार शून्यवत असल्याचे म्हटले जाते ;

(ज) कायद्याद्वारे अंमलबजावणीयोग्य असलेला करार म्हणजे संविदा होय ;

(झ) जो करार त्यातील एका किंवा अधिक पक्षकारांच्या विकल्पानुसार कायद्याद्वारे अंमलबजावणीयोग्य असतो, पण दुसऱ्याच्या किंवा दुसऱ्यांच्या विकल्पानुसार नाही, तो करार शून्यकरणीय संविदा असते ;

(ञ) जी संविदा कायद्याद्वारे अंमलबजावणीयोग्य असण्याचे थांबते ती, जेव्हा ती अंमलबजावणीयोग्य असण्याचे थांबते तेव्हा शून्यवत होते.

## प्रकरण एक

## **प्रस्तावांची संसूचना, स्वीकार व तो परत घेणे यांविषयी**

**प्रस्तावांची संसूचना, स्वीकार व तो परत घेणे.**

**३.** प्रस्तावाची संसूचना, प्रस्तावाचा स्वीकार आणि प्रस्ताव व स्वीकार परत घेणे हे, असा प्रस्ताव संसूचित करणारा, स्वीकारणारा किंवा तो परत घेणारा पक्षकार असा प्रस्ताव, स्वीकार किंवा तो परत घेणे ज्याद्वारे संसूचित करण्याचा हेतू ठेवतो किंवा जिला तो संसूचित करण्याचा प्रभाव आहे अशा त्या पक्षकाराच्या यथाक्रम कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे केली असल्याचे मानण्यात येते.

**संसूचना केव्हा पूर्ण होते.**

**४.** प्रस्तावाची संसूचना ज्या व्यक्तीस करण्यात येते तिला जेव्हा ती माहीत होते तेव्हा ती संसूचना पूर्ण होते.

स्वीकाराची संसूचना,—

प्रस्तावापुरती, जेव्हा ती त्याच्याकडे प्रेषित होण्याच्या ओघात ठेवली जाते, ज्यामुळे ती स्वीकर्त्याच्या अधिकाराबाहेर जाते तेव्हा ;

स्वीकर्त्यापुरती, जेव्हा ती प्रस्तावकाला माहीत होते तेव्हा ;

पूर्ण होते.

प्रस्ताव परत घेण्याची संसूचना,—

जी व्यक्ती ती करते तिच्यापुरती, ती ज्या व्यक्तीकडे करण्यात येते तिच्याकडे प्रेषित होण्याच्या ओघात जेव्हा ठेवली जाते ज्यामुळे ती संसूचना करणाऱ्या व्यक्तीच्या अधिकाराबाहेर जाते तेव्हा ;

ज्या व्यक्तीला ती करण्यात येते तिच्यापुरते, जेव्हा ती तिला माहीत होते तेव्हा ;

पूर्ण होते.

### **उदाहरणे**

(क) "क", "ख" ला विवक्षित किमतीला एक घर विकण्याचा पत्राद्वारे प्रस्ताव करतो. जेव्हा "ख" ला पत्र मिळते तेव्हा प्रस्तावाची संसूचना पूर्ण होते.

(ख) "ख" "क" चा डाकेने पाठवलेल्या पत्राद्वारे केलेला प्रस्ताव स्वीकारतो.

स्वीकाराची संसूचना—

"क" पुरती, जेव्हा पत्र डाकेत टाकले जाते तेव्हा ;

"ख" पुरती, जेव्हा "ख" ला पत्र मिळते तेव्हा,

पूर्ण होते.

(ग) "क" तारेद्वारे आपला प्रस्ताव परत घेतो,

जेव्हा तार पाठवली जाते तेव्हा "क" पुरते परत घेणे पूर्ण होते. जेव्हा "ख" ला ती मिळते तेव्हा ते "ख" पुरते पूर्ण होते.

"ख" तारेद्वारे आपला स्वीकार परत घेतो. जेव्हा तार पाठवली जाते तेव्हा, (प्रस्ताव) परत घेणे. "ख" पुरते पूर्ण होते व "क" पुरते, ती जेव्हा त्याला पोहोचले तेव्हा पूर्ण होते.

**प्रस्तावांचे व स्वीकारांचे परत घेणे.**

**५.** प्रस्ताव, त्याच्या स्वीकाराची संसूचना प्रस्तावकापुरती पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही वेळी परत घेता येईल, पण त्यानंतर नाही.

स्वीकार, स्वीकाराची संसूचना स्वीकर्त्यापुरती पूर्ण होण्यासाठी कोणत्याही वेळी परत घेता येईल, पण त्यानंतर नाही.

### **उदाहरण**

"क" डाकेने पाठवलेल्या पत्राद्वारे, "ख" ला आपले घर विकण्याचा प्रस्ताव करतो.

"ख" डाकेने पाठवलेल्या पत्राद्वारे, प्रस्ताव स्वीकारतो.

"क" ला आपला प्रस्ताव "ख" ने आपले स्वीकाराचे पत्र डाकेत टाकण्यापूर्वी कोणत्याही वेळी किंवा तत्क्षणी परत घेता येईल, पण त्यानंतर नाही.

आपण केलेला स्वीकार "ख" ला, तो संसूचित करणारे पत्र "क" ला पोचण्यापूर्वी कोणत्याही वेळी किंवा तत्क्षणी परत घेता येईल, पण त्यानंतर नाही.

**परत घेणे कसे केले जाते.**

**६.** प्रस्ताव—

(१) प्रस्तावकाने अन्य पक्षकराला दिलेल्या परत घेण्याच्या नोटिशीच्या संसूचनेद्वारे ;

(२) अशा प्रस्तावात त्याच्या स्वीकाराकरता विहित केलेला कालावधी लोटल्यामुळे, किंवा अशाप्रकारे कोणताही कालावधी विहित केला नसल्यास, स्वीकाराची संसूचना न होता वाजवी कालावधी लोटल्यामुळे ;

(३) स्वीकर्त्याने स्वीकाराची पूर्ववर्ती शर्त पूर्ण करण्यात कसूर केल्यामुळे ; किंवा

(४) प्रस्तावकाच्या मृत्यूचे किंवा भ्रमिष्टपणाचे वृत्त स्वीकर्त्यास स्वीकारापूर्वी माहीत झाल्यास, त्याच्या मृत्यूमुळे किंवा भ्रमिष्टपणामुळे परत घेतला जातो.

**स्वीकार निरपवाद असला पाहिजे.**

**७.** प्रस्तावाचे वचनात रूपांतर होण्यासाठी, प्रस्ताव—

(१) निरपवाद व बिनशर्त असला पाहिजे ;

(२) जर प्रस्तावात, तो ज्या रीतीनी स्वीकारावयाचा ती रीत विहित केलेली नसेल तर तो एखाद्या नेहमीच्या व वाजवी रीतीनेच व्यक्त केलेला असला पाहिजे. जर प्रस्ताव ज्या रीतीने स्वीकारावयाचा ती रीत विहित केलेली असेल आणि स्वीकार अशा रीतीने केला गेला नाही, तर, स्वीकार संसूचित झाल्यानंतर वाजवी अवधीत प्रस्तावकाला, आपला प्रस्ताव विहित रीतीने स्वीकारला गेला पाहिजे, अन्य प्रकारे नाही, असा आग्रह धरता येईल, पण जर तो असे करण्यात कसूर करील तर, त्याने स्वीकाराचा स्वीकार केला असे होते.

**शर्तीचे पालन केल्यामुळे किंवा प्रतिफल घेतल्यामुळे स्वीकृती.**

**८.** प्रस्तावाच्या शर्तीचे पालन, किंवा प्रस्तावासोबत देऊ केले जाईल अशा, अन्योन्य वचनाच्या कोणत्याही प्रतिफलाचा स्वीकार म्हणजे प्रस्तावाची स्वीकृती होय.

**व्यक्त व उपलक्षित वचने.**

**९.** कोणत्याही वचनाचा प्रस्ताव किंवा स्वीकार जेथवर शब्दांनी केला जातो तेथवर, ते वचन व्यक्त असल्याचे म्हटले जाते. असा प्रस्ताव किंवा स्वीकार जेथवर शब्दांव्यतिरिक्त अन्य रीतीने केला जातो तेथवर, ते वचन उपलक्षित असल्याचे म्हटले जाते.

## प्रकरण दोन

## संविदा, शून्यकरणीय संविदा व शून्यवत करार यांविषयी

**कोणते करार संविदा असतात.**

**१०.** सर्व करार, जर ते संविदा करण्यास सक्षम असलेल्या पक्षकारांच्या मुक्त संमतीने, कायदेशीर प्रतिफलार्थ व कायदेशीर उद्दिष्टाकरता करण्यात आले असतील आणि ते शून्यवत असल्याचे याद्वारे व्यक्तपणे घोषित करण्यात आले नसेल तर, ते संविदा असतात.

यात अंतर्भूत असलेले काहीही, कोणतीही संविदा, [१]लेखी किंवा साक्षीदारांच्या समक्ष करणे ज्याद्वारे आवश्यक करण्यात आले असेल अशा, [२][भारतामध्ये] अंमलात असलेल्या व याद्वारे व्यक्तपणे निरसित न केलेल्या कोणत्याही कायद्यावर अथवा कोणत्याही दस्तऐवज नोंदणीविषयक कायद्यावर परिणाम करणार नाही.

**संविदा करण्यास कोण सक्षम असतात.**

**११.** जी व्यक्ती, ती ज्या कायद्याला अधीन [३]असेल त्यानुसार सज्ञान वयाची आहे, आणि जी निकोप मनाची आहे, आणि ती ज्याला अधीन असेल अशा कोणत्याही कायद्याद्वारे संविदा करण्यास अपात्र झालेली नाही अशी प्रत्येक व्यक्ती संविदा करण्यास सक्षम असते.

---

१. पहा - उदाहरणार्थ येथील पुढील क.२५, "कॉपीराइट अधिनियम, १९५७" (१९५७ चा १४)- क. १९, "परिवाहक अधिनियम, १८६५" (१८६५ चा ३) - कलमे ६ व ७, "कंपनी अधिनियम, १९५६" (१९५६ चा १) - कलमे १२, ३०, ४६ व १०९.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतामध्ये" याऐवजी घातलेल्या भाग "क" राज्ये आणि भाग "ग" राज्य यांमध्ये या मजकूराऐवजी हा शब्द १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांच्याद्वारे घातले.

३. पहा, "भारतीय सज्ञानत्व अधिनियम, १८७५" (१८७५चा ९).

**संविदा करण्याच्या प्रयोजनार्थ निकोप मन कोणते.**

**१२.** एखादी व्यक्ती, तिने संविदा केली त्यावेळी ती समजून घेण्यास आणि तिच्या हितसंबंधावर होणाऱ्या तिच्या परिणामांबाबत बुद्धिसंगत मत बनवण्यास सक्षम असेल तर, ती, संविदा करण्याच्या प्रयोजनार्थ, निकोप मनाची असल्याचे म्हटले जाते.

जी व्यक्ती बहुधा विकल मनाची असते, पण अधूनमधून निकोप मनाची असते, तिला, जेव्हा ती निकोप मनाची असेल तेव्हा संविदा करता येईल.

जी व्यक्ती बहुधा निकोप मनाची असते, पण अधूनमधून विकल मनाची असते तिला, जेव्हा ती विकल मनाची असेल तेव्हा संविदा करता येणार नाही.

**उदाहरणे**

(क) वेड्यांच्या इस्पितळातील जो रुग्ण अधूनमधून निकोप मनाचा असतो त्याला त्या मध्यंतरीच्या काळात संविदा करता येईल.

(ख) एखादा सुबुद्ध मनुष्य की, ज्याला तापामुळे उन्माद झालेला आहे किंवा जो इतका प्यालेला आहे की त्याला संविदेच्या अटी समजू शकत नाहीत किंवा आपल्या हितसंबंधांवर होणाऱ्या तिच्या परिणामांबाबत तो बुद्धिसंगत मत बनवू शकत नाही तो असा उन्माद किंवा अशी धुंदी टिकून असेपर्यंत संविदा करू शकत नाही.

**"संमती" याची व्याख्या.**

**१३.** दोन किंवा अधिक व्यक्ती जेव्हा एका गोष्टीसाठी एकाच अर्थाने सहमत होतात तेव्हा त्यांनी संमती दिली असल्याचे म्हटले जाते.

**"मुक्त संमती" याची व्याख्या.**

**१४.** संमती जेव्हा —

(१) कलम १५ मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे असलेली जबरदस्ती, किंवा

(२) कलम १६ मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे असलेला गैरवाजवी प्रभाव, किंवा

(३) कलम १७ मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे असलेली लबाडी, किंवा

(४) कलम १८ मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे असलेला विपर्यास, किंवा

(५) कलमे २०, २१ व २२ यांच्या तरतुदींना अधीन असलेली, चूकभूल यामुळे उद्‌भवलेली नसते तेव्हा ती मुक्त असल्याचे म्हटले जाते.

अशी जबरदस्ती, गैरवाजवी प्रभाव, लबाडी, विपर्यास किंवा चूकभूल नसती तर संमती दिली गेली नसती असे असते तेव्हा ती याप्रमाणे उद्‌भवली असल्याचे म्हटले जाते.

**"जबरदस्ती" याची व्याख्या.**

**१५.** "जबरदस्ती" म्हणजे कोणत्याही व्यक्तीला करार करायला लावण्याच्या हेतूने, कोणत्याही व्यक्तीला बाधक होईल अशाप्रकारे, "भारतीय दंड संहिते" (१८६० चा ४५) ने प्रतिषिद्ध केलेले कोणतेही कृत्य करणे किंवा करण्याची धमकी देणे अथवा बेकायदेशीरपणे कोणतीही मालमत्ता अडकवून ठेवणे किंवा अडकवून ठेवण्याची धमकी देणे होय.

**स्पष्टीकरण.**—जेथे जबरदस्तीचा वापर करण्यात आला त्या ठिकाणी "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) अंमलात आहे किंवा नाही हे बिनमहत्त्वाचे आहे.

**उदाहरण**

मुक्त सागरात एका इंग्लिश जहाजावर "क", "भारतीय दंड संहिते" (१८६० चा ४५) अन्वये गुन्हेगारी धाकदपटशात मोडणाऱ्या कृतीद्वारे "ख" ला करार करावयास लावतो.

नंतर "क" कलकता येथे "ख" विरुद्ध संविदाभंगाबद्दल दावा लावतो.

"क" चे कृत्य इंग्लंडच्या कायद्यानुसार अपराध नसले तरी, आणि ते कृत्य करण्यात आले त्यावेळी व त्या ठिकाणी "भारतीय दंड संहिते" (१८६० चा ४५) चे कलम ५०६ अंमलात नव्हते असे असले तरीही "क" ने जबरदस्तीचा वापर केलेला आहे असे होते.

**"गैरवाजवी प्रभाव" याची व्याख्या.**

[१][**१६.** (१) जेथे पक्षकारांमध्ये असलेले संबंध अशाप्रकारचे असतात की ज्यायोगे पक्षकारांपैकी एक दुसऱ्याच्या इच्छाशक्तीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत आहे आणि दुसऱ्याविरुद्ध गैरफायदा घेण्यासाठी तो त्या स्थितीचा उपयोग करतो तेथे संविदा "गैरवाजवी प्रभावा"तून निर्माण झाली असल्याचे म्हटले जाते.

---

१. १८९९ चा अधिनियम क्रमांक ६, कलम २ द्वारे मूळ कलम १६ ऐवजी घातले.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी तत्त्वाच्या सर्वसाधारणतेस बाध न येता,—

(क) जेथे एखाद्या व्यक्तीची दुसऱ्यावर वास्तव किंवा दृश्यमान हुकूमत असते, अथवा तिचे दुसऱ्याशी विश्वासाचे नाते असते ; किंवा

(ख) जेथे ती, जिच्या मानसिक क्षमतेवर वयोमान, आजार किंवा मानसिक अगर शारीरिक क्लेश यांच्या कारणाने तात्पुरता किंवा कायमचा तात्कालिक परिणाम झाला आहे अशा व्यक्तीशी संविदा करते,

तेथे ती दुसऱ्याच्या इच्छाशक्तीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असल्याचे मानले जाते.

(३) जेथे दुसऱ्या व्यक्तीच्या इच्छाशक्तीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असलेली व्यक्ती, तिच्याशी संविदा करील तो संव्यवहार उघड उघड किंवा दाखल केलेल्या साक्षी पुराव्यावरून सद्विवेकाविरुद्ध असल्याचे दिसून येईल तेथे, अशी संविदा गैरवाजवी प्रभावामुळे निर्माण झाली नव्हती हे शाबीत करण्याचा भार त्या दुसऱ्याच्या इच्छाशक्तीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असलेल्या व्यक्तीवर राहील.

या पोटकलमातील काहीही "भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२" (१८७२ चा १) याचे कलम १११ च्या तरतुदींवर परिणाम करणार नाही.

**उदाहरणे**

(क) "क" ने आपला मुलगा "ख" यास तो अज्ञान असताना पैसे कर्जाऊ दिले होते, "ख" सज्ञान झाल्यावर "क" बाप या नात्याच्या प्रभावाचा गैरवापर करून, त्याच्याकडून कर्जाबाबत देय असलेल्या रकमेहून अधिक रकमेचे बंधपत्र करून घेतो. "क" गैरवाजवी प्रभावाचा वापर करतो.

(ख) रोगाने किंवा वार्धक्याने जर्जर झालेला एक मनुष्य "क" हा, त्याच्यावर त्याचा वैद्यकीय परिचर म्हणून "ख" चा प्रभाव असल्यामुळे त्याच्या व्यावसायिक सेवेदाखल त्याला अवाजवी रक्कम देण्याचे कबूल करतो. "ख" गैरवाजवी प्रभावाचा वापर करतो.

(ग) "क" हा त्याच्या गावातील एक सावकार "ख" याचा ऋणी (in debt) असताना सद्विवेकाविरुद्ध वाटतील अशा अटींवर त्याच्याकडून नवीन कर्ज काढतो. ती संविदा गैरवाजवी प्रभावामुळे निर्माण झाली नव्हती, हे शाबीत करण्याची जबाबदारी "ख" वर आहे.

(घ) मुद्रा - बाजारात चणचण असताना "क" एका सावकाराकडे कर्ज मागतो. सावकार बेसुमार अधिक व्याजदर लावल्याखेरीज कर्ज देण्याचे नाकारतो. "क" या अटींवर कर्ज स्वीकारतो. हा धंद्याच्या सामान्य क्रमातील संव्यवहार आहे व संविदा गैरवाजवी प्रभावामुळे निर्माण झालेली नाही.]

**"लबाडी" याची व्याख्या.**

**१७.** [१]"लबाडी" याचा अर्थ, संविदेतील एखाद्या पक्षकाराकडून किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा त्याच्या अभिकर्त्याकडून तिच्यातील अन्य पक्षकाराला किंवा त्याच्या अभिकर्त्याला फसवण्याच्या किंवा त्याला संविदा करण्यास प्रवृत्त करण्याच्या हेतूने केलेली पुढीलपैकी कोणतीही कृती, असा असून त्यात ते समाविष्ट आहे :—

(१) जरी खरी नाही ती गोष्ट ती खरी असल्याबद्दल ज्याचा विश्वास नाही त्याने तथ्य म्हणून सूचित करणे ;

(२) एखादे तथ्य माहीत असलेल्या किंवा त्याबद्दल विश्वास असलेल्या व्यक्तींकडून त्या तथ्याची प्रत्यक्ष लपवणूक ;

(३) पालन करण्याचा कोणताही हेतू नसताना दिलेले वचन ;

(४) फसवणूक करू शकणारी अन्य कोणतीही कृती ;

(५) लबाडीची म्हणून कायद्याद्वारे विशेषरीत्या घोषित करण्यात आली असेल अशी अन्य कोणतीही कृती किंवा अकृती.

**स्पष्टीकरण.**—एखाद्या व्यक्तीच्या करार करण्याबद्दलच्या इच्छेवर ज्यांच्यामुळे परिणाम होण्याचा संभव आहे अशा तथ्यांबाबत, जेथे प्रकरणाची परिस्थिती अशी असेल की जी लक्षात घेता, मौन राखणाऱ्या व्यक्तीचे [२] बोलणे हे तिचे कर्तव्य आहे असे असल्याशिवाय किंवा तिचे मौन हेच बोलण्याच्या तोडीचे आहे असे असल्याशिवाय त्या तथ्यांच्याबाबतीत केवळ मौन राखणे ही लबाडी होत नाही.

**उदाहरणे**

(क) "क" लिलावाद्वारे "ख" ला घोडा विकतो, तो विकल असल्याचे "क" ला माहीत आहे. घोड्याच्या विकलतेबद्दल "क" "ख" ला काहीच सांगत नाही. यात "क" ची लबाडी नाही.

---

१. कलम २३८ महा.

२. कलम १४३ महा.

(ख) "ख" ही "क" ची मुलगी आहे आणि ती नुकतीच सज्ञान झाली आहे. येथे दोन पक्षकारातील नात्यामुळे, घोडा विकल असल्यास "ख" ला ते सांगणे "क" चे कर्तव्य ठरेल.

(ग) "ख" "क" ला म्हणतो, तुम्ही नाकारत नसल्यास घोडा निकोप असल्याचे मी गृहीत धरीन. "क" काहीच बोलत नाही. येथे "क" चे मौन बोलण्याच्या तोडीचे आहे.

(घ) "क" व "ख" हे व्यापारी असून संविदेची बोलणी सुरू करतात. ज्यामुळे संविदेची बोलणी चालू ठेवण्याच्या "ख" च्या इच्छेवर परिणाम होऊ शकेल असा बदल किंमतीमध्ये झाल्याची "क" ला खाजगी माहिती मिळाली आहे. "ख" ला माहिती देण्यास "क" बांधलेला नाही.

**"विपर्यास" याची व्याख्या.**

**१८.** "विपर्यास" याचा अर्थ,—

(१) ते खरे असल्याचे तो मानत असला तरी, त्याचे प्रपादन करणाऱ्या व्यक्तीला असलेली माहिती पाहता ते समर्थनीय नाही अशा रीतीने केलेले ठाम प्रतिपादन ;

(२) जो कर्तव्यभंग, फसवण्याचा हेतू नसताना, तो करणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या पोटी दावा सांगणाऱ्या कोणासही फायदा मिळवून देतो असा दुसऱ्याची, त्याला बाधक किंवा त्याच्या पोटी दावा सांगणाऱ्या कोणासही बाधक अशी दिशाभूल करून केलेला कोणताही कर्तव्यभंग ;

(३) जी गोष्ट कराराचा विषय असेल तिच्या सारभागाबाबत करारातील एखाद्या पक्षकाराची चूकभूल होण्यास, कितीही अजाणतेपणाने का होईना, कारणीभूत होणे,

असा आहे व त्यात हे समाविष्ट आहे.

**मुक्त संमतीरहित करारांची शून्यकरणीयता.**

**१९.** जेव्हा जबरदस्ती [१]*** , लबाडी किंवा विपर्यास यांद्वारे करारास संमती मिळवली जाते तेव्हा करार हा, ज्याची संमती याप्रमाणे मिळवण्यात आली असेल त्या पक्षकाराच्या विकल्पानुसार शून्यकरणीय संविदा असते.

संविदेतील ज्या पक्षकाराची संमती लबाडीने किंवा विपर्यासाद्वारे मिळवण्यात आली असेल त्यास, त्याला योग्य वाटेल तर, संविदेचे पालन व्हावे व केलेली अभिवेदने खरी असती तर तो ज्या स्थितीत असता ती त्याला प्राप्त करून देण्यात यावी असा आग्रह धरता येईल.

**अपवाद**.—तथापि, विपर्यासाद्वारे किंवा कलम १७ च्या अर्थांतर्गत लबाडीयुक्त असलेल्या मौनाद्वारे अशी संमती मिळवण्यात आली असेल तर, ज्याची संमती याप्रमाणे मिळवण्यात आली असेल त्या पक्षकाराजवळ, सर्वसामान्य तत्परता दाखवून सत्य शोधून काढण्याचे साधन होते असे असल्यास संविदा शून्यकरणीय नसते.

**स्पष्टीकरण.**—ज्या पक्षकाराविरुद्ध लबाडीचे आचरण करण्यात आले किंवा ज्याच्याशी विपर्यास करण्यात आले त्याने संविदेस दिलेल्या संमतीस जी कारणीभूत झाली नाही अशी लबाडी किंवा असा विपर्यास संविदेला शून्यकरणीय करत नाही.

**उदाहरणे**

(क) "ख" ला फसवण्याच्या हेतूने "क" आपल्या कारखान्यात वर्षाकाठी पाचशे मण नीळ तयार होते असे खोटे अभिवेदन करतो आणि त्याद्वारे "ख" ला कारखाना विकत घेण्यास प्रवृत करतो. संविदा "ख" च्या विकल्पानुसार शून्यकरणीय आहे.

(ख) "क" विपर्यासाद्वारे त्याच्या कारखान्यात पाचशे मण नीळ तयार होते असा "ख" चा चुकीचा समज करून देतो. "ख" कारखान्याचे हिशेब तपासतो, त्यावरून फक्त चारशे मण नीळ तयार होते असे दिसून येते. त्यानंतर "ख" कारखाना विकत घेतो. संविदा "क" च्या विपर्यासामुळे शून्यकरणीय होत नाही.

(ग) "क" लबाडीने आपली संपदा बोजापासून मुक्त आहे असे "ख" ला कळवतो. तदनंतर "ख" ती संपदा विकत घेतो. संपदा गहाणाधीन आहे. "ख" ला एकतर संविदा शून्यवत करता येईल किंवा तिचे पालन व्हावे व गहाण-ऋणाचे विमोचन व्हावे असा आग्रह धरता येईल.

(घ) "ख" ला "क" च्या संपदेत धातुकाची शीर सापडली असून तो त्या धातुकाचे अस्तित्व "क" पासून लपवण्यासाठी उपाय योजतो व त्याप्रमाणे लपवतो. "क" च्या अज्ञानामुळे "ख" ला ती संपदा कमी किंमतीला विकत घेणे शक्य होते. संविदा "क" च्या विकल्पानुसार शून्यकरणीय आहे.

---

१. १८९९ चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे "गैरवाजवी प्रभाव" हे शब्द निरसित केले.

(ङ) "ख" च्या मृत्यूनंतर त्याच्या संपदेचा उत्तराधिकारी होण्यास "क" हक्कदार आहे ; "ख" मरण पावतो. "ख" च्या मृत्यूचे वृत्त "ग" ला कळताच तो ते वृत्त "क" पर्यंत पोचण्यास प्रतिबंध करतो व अशाप्रकारे "क" ला संपदेतील त्याचा हितसंबंध "ग" ला विकण्याला प्रवृत्त करतो. विक्री "क" च्या विकल्पानुसार शून्यकरणीय आहे.

[१][**१९ क.** जेव्हा गैरवाजवी प्रभावाद्वारे करारास संमती मिळवली जाते तेव्हा करार हा, ज्याची संमती याप्रमाणे मिळवण्यात आली आहे त्या पक्षकाराच्या विकल्पानुसार शून्यकरणीय संविदा असतो. **गैरवाजवी प्रभावामुळे निर्माण झालेली संविदा रद्द ठरवण्याचा अधिकार.**

अशी कोणतीही संविदा एकतर बिनशर्त, किंवा ती शून्यवत करण्यास, जो हक्कदार होता त्या पक्षकाराला जर तिच्या अन्वये कोणताही लाभ मिळाला असेल तर न्यायालयाला न्याय्य वाटतील अशा अटींवर व शर्तीवर रद्द ठरवता येईल.

**उदाहरणे**

(क) "क" च्या मुलाने एका वचनचिठ्ठीवर "ख" ची बनावट सही केली आहे. "क" च्या मुलावर खटला भरण्याची धमकी देऊन "ख" "क" कडून त्या बनावट वचनचिठ्ठीच्या रकमेचे बंधपत्र मिळवतो. जर "ख" ने या बंधपत्रावरून दावा लावला तर न्यायालयाला बंधपत्र रद्द ठरवता येईल.

(ख) "क" हा सावकार "ख" या शेतकऱ्याला १०० रु. कर्जाऊ देतो आणि गैरवाजवी प्रभावाद्वारे, "ख" ला द.म.द.शे. ६ या व्याजदराने २०० रु. चे वैधपत्र निष्पादित करण्यास प्रवृत्त करतो. न्यायालयाला न्याय्य वाटेल इतक्या व्याजासकट १०० रु. ची परतफेड करण्यास "ख" ला आदेश देऊन बंधपत्र रद्द ठरवता येईल.]

**२०.** जेथे करारातील उभय पक्षकारांची करारास सारभूत असलेल्या तथ्याच्या बाबीबाबत चूकभूल असते तेथे करार शून्यवत असतो. स्पष्टीकरण. - जी गोष्ट कराराची विषयवस्तू असते तिच्या मूल्यासंबंधी चुकीचे मत म्हणजे तथ्याच्या बाबीसंबंधीची चूकभूल असे मानावयाचे नाही. **जेथे तथ्याच्या बाबींबाबत उभय पक्षकारांची चूकभूल असेल तेथे करार शून्यवत असणे.**

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला विनिर्दिष्ट जहाजी माल विकण्याचा करार करतो, तो इंग्लंडहून मुंबईला येण्याच्या मार्गावर आहे असा त्यांचा समज आहे. मागाहून असे आढळून येते की, माल वाहून नेणारे जहाज सौदा झाल्याच्या दिनांकापूर्वी टाकून दिलेले होते व माल नाहीसा झाला होता. कोणत्याही पक्षकाराला या गोष्टी माहीत नव्हत्या. करार शून्यवत आहे.

(ख) "क" "ख" कडून एक विवक्षित घोडा विकत घेण्याचा करार करतो. मागाहून असे आढळून येते की, सौद्याच्या वेळी घोडा मेलेला होता. मात्र कोणत्याही पक्षकाराला ती गोष्ट माहीत नव्हती. करार शून्यवत आहे.

(ग) "क" हा "ख" च्या हयातीपर्यंत एका संपदेला हक्कदार असून ती तो "ग" ला विकण्याचा करार करतो. कराराच्या वेळी "ख" मृत होता. पण दोन्ही पक्षकार त्या गोष्टीबाबत अज्ञानात होते. करार शून्यवत आहे.

**२१.** एखादी संविदा [२][भारतात] अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याबाबतच्या चूकभुलीमुळे ती उद्‌भवली होती म्हणून शून्यकरणीय नसते; पण [२][भारतात] अंमलात नसलेल्या कायद्याबाबतची चूकभूल ही तथ्याबाबतच्या चूकभुलीसारखीच परिणामक असते. **कायद्याबाबतच्या चूकभुलीचा परिणाम.**

[३]* * * * *

**उदाहरण**

एक विशिष्ट ऋण भारतीय मुदतमर्यादा कायद्यान्वये मुदतबाह्य झाले आहे या चुकीच्या समजाच्या आधारावर "क" व "ख" संविदा करतात. ती संविदा शून्यकरणीय नाही.

[४]* * * * *

---

१. १८९९ चा अधिनियम क्रमांक ६, कलम ३ द्वारे घातले.

२. मूळचे "ब्रिटिश भारतात" हे शब्द क्रमशः अनुकूलन आदेश, १९४८ व अनुकूलन आदेश, १९५० यांच्याद्वारे वरीलप्रमाणे सुधारले आहेत.

३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातलेला परिच्छेद २, अनुकूलन आदेश, १९५० द्वारे गाळला.

४. १९१७ चा अधिनियम २४, कलम ३ आणि अनुसूची दोनद्वारे कलम २१ चे दुसरे उदाहरण निरसित केले.

**तथ्याच्या बाबीबाबत एका पक्षकाराच्या झालेल्या चूकभुलीमुळे उद्‌भवलेली संविदा.**

**२२.** एखादी संविदा, केवळ तिच्यावरील पक्षकारांपैकी एकाची तथ्याच्या बाबीबाबत चूकभूल झाल्यामुळे ती उद्‌भवली होती म्हणून शून्यकरणीय नसते.

**कोणती प्रतिफले व उद्दिष्टे कायदेशीर असतात व कोणती नसतात.**

**२३.** कराराचे प्रतिफल किंवा उद्दिष्ट, जर—

त्यास कायद्याद्वारे [१]मनाई केलेली आहे ; अथवा

त्याला परवानगी दिल्यास ते कोणत्याही कायद्याच्या तरतुदी विफल करील अशा स्वरूपाचे आहे ; अथवा

ते लबाडीचे आहे ; अथवा

दुसऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या मालमत्तेला होणारी क्षती त्यात अनुस्यूत किंवा उपलक्षित आहे ; अथवा न्यायालयाने ते अनैतिक किंवा लोकहित धोरणाच्या विरोधी मानले आहे,

असे नसेल तर ते कायदेशीर असते.

यांपैकी प्रत्येक प्रकरणी, कराराचे प्रतिफल किंवा उद्दिष्ट कायद्याविरुद्ध असल्याचे म्हटले जाते, ज्याचे उद्दिष्ट किंवा प्रतिफल कायद्याविरुद्ध आहे असा प्रत्येक करार शून्यवत असतो.

**उदाहरणे**

(क) "क" आपले घर "ख" ला १०,००० रुपयाला विकण्याचा करार करतो, येथे १०,००० रुपयांची रक्कम देण्याचे "ख" चे वचन हे "क" च्या घर विकण्याच्या वचनाचे प्रतिफल आहे आणि घर विकण्याचे "क" चे वचन हे "ख" च्या १०,००० रुपये देण्याच्या वचनाचे प्रतिफल आहे. ही कायदेशीर प्रतिफले आहेत.

(ख) "ग" हा "ख" चे १,००० रुपये देणे लागतो; त्याने जर ते फेडण्यात कसूर केली तर, सहा महिन्यांच्या अखेरीस "ख" ला १,००० रुपये देण्याचे "क" वचन देतो. तदनुसार "ख" "क" ला मुदत देण्याचे वचन देतो. येथे प्रत्येक पक्षकाराचे वचन हे दुसऱ्या पक्षकाराच्या वचनाचे प्रतिफल आहे व ती कायदेशीर प्रतिफले आहेत.

(ग) "ख" ने "क"ला दिलेल्या विवक्षित रकमेबद्दल तो "ख" ला असे वचन देतो की, विवक्षित जलप्रवासात त्याचे जहाज फुटले तर "क" "ख" ला त्याची किंमत भरून देईल. येथे "क" चे वचन हे "ख" ने दिलेल्या रकमेचे प्रतिफल आहे व "ख" ने दिलेली रक्कम ही "क" च्या वचनाचे प्रतिफल आहे आणि ही कायदेशीर प्रतिफले आहेत.

(घ) "क" हा "ख" ला त्याच्या मुलाचे पालनपोषण करण्याचे वचन देतो व "ख" त्या प्रयोजनाकरता "क" ला वर्षाकाठी १,००० रुपये देण्याचे वचन देतो. येथे प्रत्येक पक्षकाराचे वचन हे दुसऱ्या पक्षकाराच्या वचनाचे प्रतिफल आहे. ती कायदेशीर प्रतिफले आहेत.

(ङ) "क" "ख" व "ग" त्यांना लबाडीने मिळालेल्या किंवा मिळावयाच्या लाभाची आपापसात वाटणी करण्याचा करार करतात. करार शून्यवत आहे, कारण त्याचे उद्दिष्ट बेकायदेशीर आहे.

(च) "क" हा "ख" ला सरकारी सेवेत नोकरी लावून देण्याचे वचन देतो व "ख" हा "क" ला १,००० रुपये देण्याचे वचन देतो. करार शून्यवत आहे, कारण त्याचे प्रतिफल बेकायदेशीर आहे.

(छ) "क" एका जमीनमालकाचा अभिकर्ता असून आपल्या प्रकर्त्याच्या नकळत, पैशाच्या बदल्यात आपल्या प्रकर्त्याच्या मालकीच्या जमिनीचा पट्टा "ख" ला मिळवून देण्याचा करार करतो. "क" व "ख" यांच्यामधील करार शून्यवत आहे, कारण त्यात "क" ने लपवणूक करून आपल्या प्रकर्त्याविरुद्ध केलेली लबाडी उपलक्षित आहे.

(ज) "क" ने लूटमारीबद्दल "ख" विरुद्ध सुरू केलेला खटला सोडून देण्याचे तो "ख" ला वचन देतो आणि "ख" आपण घेतलेल्या वस्तूची किंमत भरून देण्याचे वचन देतो. करार शून्यवत आहे, कारण त्याचे उद्दिष्ट बेकायदेशीर आहे.

(झ) "क" ची संपदा विधानमंडळाच्या एका अधिनियमाच्या तरतुदींनुसार जमीन महसुलाच्या थकबाकीकरता विकण्यात आली आहे आणि त्याद्वारे कसूरदाराला ती संपदा खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. "क" शी सलोखा करून "ख" खरेदीदार होतो व "क" ला ती संपदा आपण दिलेली किंमत त्याच्याकडून मिळाल्यावर अभिहस्तांतरित करण्याचा करार करतो. करार शून्यवत आहे, कारण त्यामुळे परिणामी तो संव्यवहार म्हणजे कसूरदाराने केलेली खरेदी होते व म्हणून कायद्याचे उद्दिष्ट विफल होईल.

(ञ) "क" हा "ख" चा मुखत्यार असून तो "ग" च्या बाजूने "ख" कडे त्या नात्याने आपला प्रभाव वापरण्याचे वचन देतो आणि "ग" "क" ला १,००० रुपये देण्याचे वचन देतो. करार शून्यवत आहे, कारण तो अनैतिक आहे.

(ट) "क" हा "ख" ला आपली मुलगी रखेली म्हणून भाड्याने देण्याचा करार करतो. भाड्याने देणे हे जरी "भारतीय दंड संहिते" (१८६० चा ४५) अन्वये शिक्षापात्र नसले तरी करार शून्यवत आहे, कारण तो अनैतिक आहे.

---

१. पुढील कलमे २६, २७, २८ आणि ३० पहा.

### शून्यवत करार

**२४.** जर एका किंवा अधिक उद्दिष्टांच्या एकल प्रतिफलाचा कोणताही भाग अथवा एकाच उद्दिष्टांच्या अनेक प्रतिफलांपैकी कोणतेही एक किंवा कोणत्याही एकाचा कोणताही भाग बेकायदेशीर असेल तर करार शून्यवत असतो. **प्रतिफले व उद्दिष्टे जर अंशतः बेकायदेशीर असली तर, करार शून्यवत असणे.**

**उदाहरण**

"क" "ख" च्या वतीने जी वैध आहे अशी निळीची निर्मिती व जो अवैध आहे अशा अन्य वस्तुंचा क्रयविक्रय यांची देखरेख करण्याचे वचन देतो. "ख" हा "क" ला दर वर्षास १०,००० रुपये वेतन देण्याचे वचन देतो. "क" च्या वचनाचे उद्दिष्ट व "ख" च्या वचनाचे प्रतिफल अंशतः बेकायदेशीर असल्यामुळे करार शून्यवत आहे.

**२५.** प्रतिफलाविना केलेला करार जर — **विनाप्रतिफल करार, जर तो लेखी व नोंदणी केलेला नसेल अथवा एखादी गोष्ट केल्याबद्दल भरपाई करण्याचे ते वचन नसेल अथवा मुदतमर्यादा कायद्याद्वारे मुदतबाह्य झालेल्या ऋणाची परतफेड करण्याचे ते वचन नसेल तर, शून्यवत असणे.**

(१) तो लेखी स्वरूपात व्यक्त झालेला आहे व [१][दस्तऐवजांच्या] नोंदणीसाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये नोंदणी झालेली आहे, आणि एकमेकांशी निकटचे नाते असलेल्या पक्षकारांमधील नैसर्गिक प्रेमाच्या व मायेच्या पोटी तो करण्यात आला आहे, असे नसेल तर ; किंवा जर

(२) एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने पूर्वी वचनदात्यासाठी काही केले आहे किंवा वचनदात्याला जे करण्यास विधितः भाग पाडता आले असते असे काही केलेले आहे त्या व्यक्तीची संपूर्णतः किंवा अंशतः भरपाई करण्याचे ते वचन आहे, असे नसेल तर ; किंवा जर

(३) दाव्यासाठी मुदतमर्यादा कायदा नसता तर धनको ज्या ऋणाच्या वसुलीची बजावणी करू शकला असता ते संपूर्णतः किंवा अंशतः फेडण्याचे, लेखी स्वरूपातले आणि त्यायोगे प्रभारित होईल अशा व्यक्तीने अथवा त्या संबंधात सर्वसाधारणतः किंवा विशेषतः प्राधिकृत केलेल्या तिच्या अभिकर्त्याने स्वाक्षरित केलेले ते वचन आहे, असे नसेल तर,

शून्यवत असतो.

यापैकी कोणत्याही प्रकरणी, असा करार संविदा असतो.

**स्पष्टीकरण (१).**—या कलमातील काहीही, दाता व अदाता यांच्या परस्परांपुरते प्रत्यक्षात झालेल्या दानाच्या विधिग्राह्यतेवर, परिणाम करणार नाही.

**स्पष्टीकरण (२).**—वचनदात्याने ज्यास मुक्तपणे संमती दिली आहे तो करार केवळ प्रतिफल अपर्याप्त आहे एवढ्याच कारणावरून शून्यवत नसतो; पण वचनदात्याने संमती मुक्तपणे दिली होती काय या प्रश्नाचा निर्णय करताना न्यायालयाला प्रतिफलाची अपर्याप्तता हिशेबात घेता येईल.

**उदाहरणे**

(क) "क" कोणतेही प्रतिफल नसताना, "ख" ला १,००० रुपये देण्याचे वचन देतो. हा शून्यवत करार आहे.

(ख) "क" नैसर्गिक प्रेमाच्या व मायेच्या पोटी आपला मुलगा "ख" यास १,००० रुपये देण्याचे वचन देतो. आपण "ख" ला दिलेले वचन "क" लेखी स्वरूपात करतो व त्याची नोंदणी करतो. ही संविदा आहे.

(ग) "क" ला "ख" ची थैली सापडते व ती तो त्याला देतो. "ख" "क" ला ५० रुपये देण्याचे वचन देतो. ही संविदा आहे.

(घ) "क" "ख" च्या लहान मुलाचा सांभाळ करतो. "ख" "क" ला तसे करण्यासाठी येणारा खर्च भरून देण्याचे वचन देतो. ही संविदा आहे.

(ङ) "क" "ख" चे १,००० रुपये देणे लागतो, पण ते ऋण मुदतमर्यादा अधिनियमाद्वारे मुदतबाह्य झाले आहे. "क" ऋणासाठी "ख" ला ५०० रुपये देण्याचे लेखी वचन स्वाक्षरित करतो. ही संविदा आहे.

(च) "क" १,००० रुपये किमतीचा घोडा १० रुपयाला विकण्याचा करार करतो. "क"ने करारास मुक्तपणे संमती दिली होती. प्रतिफल अपर्याप्त असले तरीही तो करार संविदा आहे.

(छ) "क" १,००० रुपये किमतीचा घोडा १० रुपयाला विकण्याचा करार करतो. आपण करारास मुक्तपणे संमती दिली होती हे "क" नाकबूल करतो. प्रतिफलाची अपर्याप्तता हे "क" ने संमती मुक्तपणे दिली होती की नाही याचा विचार करताना न्यायालयाने हिशेबात घ्यावे असे तथ्य आहे.

**२६.** अज्ञान व्यक्तीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीच्या विवाहाच्या निरोधी असलेला प्रत्यक्ष करार शून्यवत असतो. **विवाह निरोधी करार शून्यवत असणे.**

**२७.** ज्याद्वारे कोणीही कोणत्याही प्रकारचा कायदेशीर व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करण्यापासून निरुद्ध होतो असा प्रत्येक करार त्या व्याप्तीपुरता शून्यवत असतो. **व्यापार, निरोधी करार शून्यवत असणे.**

---

१. १८९१ चा अधिनियम क्र. १२, कलम २ आणि अनुसूची दोन, भाग एक द्वारे "हस्तांतरण पत्राच्या" याऐवजी घातले.

ज्याचे ख्यातिमूल्य विकण्यात आले आहे असा धंदा न चालवण्याबद्दलच्या कराराची व्यावृत्ति.

**अपवाद १.—**जो धंद्याचे ख्यातिमूल्य विकतो त्याला, जोवर क्रेता किंवा त्याच्यापासून ख्यातिमूल्यावर हक्क प्राप्त होणारी कोणतीही व्यक्ती तसाच धंदा विनिर्दिष्ट स्थानिक सीमांच्या आत चालवील तोवर, त्या सीमांच्या आत सदृश धंदा चालवण्यापासून परावृत्त राहण्याचा करार क्रेत्याशी करता येईल, परंतु धंद्याचे स्वरूप लक्षात घेता अशा सीमा न्यायालयाला वाजवी वाटल्या पाहिजेत.

[१]* * * * *

वैध कार्यवाहीच्या, निरोधी करार.

[२][**२८.** ज्या कराराद्वारे त्यातील कोणताही पक्षकार कोणत्याही संविदेखालील किंवा तिच्याबाबतचे आपले अधिकार सर्वसामान्य न्यायाधिकरणातील नेहमीच्या वैध कार्यवाहीद्वारे बजावण्यापासून संपूर्णपणे निर्बंधित होतो, अथवा त्याला ज्या कालावधीच्या आत आपले अधिकार अशाप्रकारे बजावता येतील ती मर्यादित होते ;

(ख) जो करार, त्यातील कोणत्याही पक्षकारास आपला अधिकार बजावण्यापासून वंचित करण्यासाठी विनिर्दिष्ट कालावधीच्या समाप्तीनंतर त्यातील पक्षकाराचा त्या संविदेखालील किंवा त्याबाबतचा अधिकार समाप्त करतो किंवा त्यातील पक्षकारास कोणत्याही दायित्वापासून मुक्त करतो,

असा प्रत्येक करार त्या व्याप्तीपुरता शुन्यवत असतो.]

उद्‌भवेल तो विवाद लवादाकडे निर्देशित करण्याच्या संविदेची व्यावृत्ति.

**अपवाद १.—**जिच्याद्वारे दोन किंवा अधिक पक्षकार, कोणत्याही विषयाच्या किंवा विषयवर्गाच्या बाबत त्यांच्यामध्ये उद्‌भवेल असा कोणताही विवाद लवादाकडे निर्देशित केला जाईल, आणि याप्रमाणे निर्देशित केलेल्या विवादाबाबत अशा लवादाने निवाड्याने दिलेली रक्कमच वसूल करण्याजोगी असेल असे संमत करतात, अशा संविदेस हे कलम अवैध ठरवणार नाही.

[३]* * * * *

आधीच उद्‌भवलेले प्रश्न निर्देशित करण्याच्या संविदेची व्यावृत्ति.

**अपवाद २.—**जिच्याद्वारे दोन किंवा अधिक पक्षकार, त्यांच्यामध्ये आधीच उद्‌भवलेला असेल असा कोणताही प्रश्न लवादाकडे निर्देशित करण्याचे संमत करतात अशा कोणत्याही लेखी संविदेसही हे कलम अवैध ठरवणार नाही किंवा [४]लवादाकडे निर्देशित करण्याबाबत त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदीवरही ते परिणाम करणार नाही.

अनिश्चिततेमुळे करार शून्यवत असणे.

**२९.** ज्यांचा अर्थ निश्चित नाही किंवा निश्चित करण्याजोगा नाही ते करार शून्यवत असतात.

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला "शंभर टन तेल" विकण्याचा करार करतो. कोणत्या प्रकारचे तेल अभिप्रेत होते हे दाखवणारे काहीही यात नाही. करार अनिश्चितेमुळे शून्यवत आहे.

(ख) "क" "ख" ला वाणिज्य वस्तू म्हणून ओळखले जाणारे विनिर्दिष्ट वर्णनाचे शंभर टन तेल विकण्याचा करार करतो. करार शून्यवत करणारी कोणतीही अनिश्चितता या ठिकाणी नाही.

(ग) "क" केवळ खोबरेलतेलाचा व्यापारी असून तो "ख" ला "शंभर टन तेल" विकण्याचा करार करतो. "क" च्या व्यापाराच्या स्वरूपावरून शब्दांचा अर्थ दर्शवला जातो व म्हणून "क" ने शंभर टन खोबरेलतेलाच्या विक्रीची संविदा केली आहे असे होते.

(घ) "क" रामनगर येथील आपल्या कोठारातील धान्य "ख" ला विकण्याचा करार करतो. करार शून्यवत करणारी कोणतीही अनिश्चितता या ठिकाणी नाही.

(ङ) "क" "एक हजार मण तांदूळ "ग" निश्चित करील त्या किमतीस "ख" ला विकण्याचा करार करतो. किंमत निश्चित करणे शक्य आहे, म्हणून करार शून्यवत करणारी कोणतीही अनिश्चितता या ठिकाणी नाही.

(च) "क" "ख" ला "माझा पांढरा घोडा पाचशे रुपयाला किंवा एक हजार रुपयाला" विकण्याचा करार करतो. दोहोंपैकी कोणती किंमत द्यावयाची होती ते दाखवणारे काहीही नाही. करार शून्यवत आहे.

जुगाराच्या मार्गाने केलेले करार शून्यवत असणे.

**३०.** जुगाराच्या मार्गाने केलेले करार शून्यवत असतात ; आणि कोणत्याही जुगारात जिंकल्याचे अभिकथन करण्यात आलेली अथवा कोणत्याही जुगाराच्या किंवा जिच्यावर कोणताही जुगार लावला गेला होता अशा अन्य अनिश्चित घटनेच्या निकालावर अवलंबून ठेवून कोणत्याही व्यक्तीकडे सोपवलेले काहीही मिळवण्याकरता कोणताही दावा लावता येणार नाही.

---

१. १९३२ चा अधिनियम क्र. ९, कलम ७३ व अनुसूची दोनद्वारे अपवाद २ व ३ निरसित केले.

२. भारतीय संविदा (सुधारणा) अधिनियम १९९६ (१९९७ चा १) च्या कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

३. १८७७ चा अधिनियम क्र.१, कलम २ व अनुसूचीद्वारे अपवाद, १ चा दुसरा खंड निरसित केला.

४. लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०) आणि कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) कलम ३८९ पहा.

कोणत्याही अश्वशर्यतीतील विजेत्याला किंवा विजेत्यांना द्यावयाचे पाचशे रुपये किंवा त्याहून अधिक मूल्य असलेले कोणतेही तबक, बक्षीस किंवा तितकी पैशाची रक्कम यासाठी किंवा यापोटी केलेले अभिदान किंवा अंशदान अथवा अभिदान किंवा अंशदान करण्याचा करार यांना हे कलम बेकायदेशीर ठरवित असल्याचे मानण्यात येणार नाही. **अश्वशर्यतीसाठीच्या विवक्षित बक्षिसा - प्रीत्यर्थ अपवाद.**

"भारतीय दंड संहिते" (१८६० चा ४५) च्या कलम २९४क च्या तरतुदी ज्या संव्यवहारास लागू आहेत अशा, अश्वशर्यतीसंबंधीच्या कोणत्याही संव्यवहारास या कलमातील काहीही वैध करत असल्याचे मानण्यात येणार नाही. **भारतीय दंड संहितेच्या कलम २९४क वर परिणाम न होणे.**

## प्रकरण तीन

### समाश्रित संविदांविषयी

**३१.** "समाश्रित संविदा" म्हणजे अशा संविदेस सांपार्श्विक असलेली एखादी घटना घडल्यास किंवा न घडल्यास एखादी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही अशी संविदा होय. **"समाश्रित संविदे" ची व्याख्या.**

**उदाहरण**

जर "ख" चे घर जळले तर "ख" ला १०,००० रुपये देऊ अशी "क" संविदा करतो. ही समाश्रित संविदा आहे.

**३२.** एखादी अनिश्चित भावी घटना घडल्यास एखादी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही अशाप्रकारची समाश्रित संविदेची ती घटना घडल्याशिवाय व घडेपर्यंत कायद्याद्वारे अंमलात आणली जाऊ शकत नाही. **घटना घडण्यावर समाश्रित असलेल्या संविदा अंमलात आणणे.**

जर ती घटना अशक्य झाली तर, अशा संविदा शून्यवत होतात.

**उदाहरणे**

(क) जर "क" "ग" च्या मागे हयात राहिला तर "ख" चा घोडा विकत घेऊ अशी "क" "ख" शी संविदा करतो. "ग" हा "क" च्या हयातीत मरण पावल्याशिवाय व मरेपर्यंत ही संविदा कायद्याद्वारे अंमलात आणली जाऊ शकत नाही.

(ख) "ग" ला एक घोडा देऊ केलेला असून त्याने तो विकत घेण्याचे नाकारले तर "ख" ला तो घोडा विनिर्दिष्ट किमतीला विकू अशी "क" "ख" शी संविदा करतो. "ग" ने घोडा विकत घेण्याचे नाकारल्याशिवाय व नाकारीपर्यंत संविदा कायद्याद्वारे अंमलात आणली जाऊ शकत नाही.

(ग) जेव्हा "ख" "ग" शी विवाह करील तेव्हा "ख" ला काही पैशांची रक्कम देऊ अशी "क" संविदा करतो. "ख" शी विवाह न होताच "ग" मरण पावतो. संविदा शून्यवत होते.

**३३.** एखादी अनिश्चित भविष्यकालीन घटना न घडल्यास एखादी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही अशाप्रकारच्या समाश्रित संविदा, ती घटना घडणे अशक्य ठरते तेव्हा अंमलात आणल्या जाऊ शकतात, तत्पूर्वी नाही. **घटना न घडण्यावर समाश्रित असलेल्या संविदा अंमलात आणणे.**

**उदाहरण**

जर विवक्षित जहाज परतले नाही तर "ख" ला पैशाची रक्कम देऊ असा "क" करार करतो. जहाज बुडाले. जहाज बुडाल्यानंतर संविदा अंमलात आणली जाऊ शकते.

**३४.** संविदा जिच्यावर समाश्रित आहे ती भविष्यकालीन घटना म्हणजे एखादी व्यक्ती एखाद्या अविनिर्दिष्ट काळी कसे आचरण करील ती पद्धत असेल तर जिच्यामुळे अशा व्यक्तीला कोणत्याही निश्चित मुदतीच्या आत किंवा आणखी संभावी घटना घडल्याशिवाय याप्रमाणे आचरण करणे अशक्य होईल अशी एखादी गोष्ट ती करील तेव्हा ती घटना अशक्य झाल्याचे मानले जाईल. **संविदा जिच्यावर समाश्रित आहे ती घटना म्हणजे हयात व्यक्तीचे भविष्यकालीन आचरण असेल तर, ती घटना अशक्य असल्याचे केव्हा मानावयाचे.**

**उदाहरण**

जर "ख" ने "ग" शी विवाह केला तर "ख" ला काही पैशांची रक्कम देऊ असा "क" करार करतो. "ग" "घ" शी विवाह करतो. "घ" मरण पावेल व नंतर "ग" ला "ख" शी विवाह करता येईल असेही होणे शक्य असले तरी, "ख" चा "ग" शी विवाह होणे आता अशक्यच मानले पाहिजे.

**३५.** विनिर्दिष्ट अनिश्चित घटना निश्चित केलेल्या मुदतीच्या आत घडल्यास एखादी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही, अशा समाश्रित संविदा, जर निश्चित कालावधी संपण्याच्या वेळी अशी घटना घडलेली नसेल अथवा जर निश्चित कालावधी संपण्यापूर्वी ती घटना अशक्य झाली तर, शून्यवत होतात. **विनिर्दिष्ट घटना निश्चित कालावधीत घडण्यावर ज्या संविदा समाश्रित असतात त्या केव्हा शून्यवत होतात.**

**विनिर्दिष्ट घटना निश्चित कालावधीत न घडण्यावर ज्या संविदा समाश्रित असतात त्या केव्हा अंमलात आणता येतील.**

विनिर्दिष्ट अनिश्चित घटना निश्चित कालावधीच्या आत न घडल्यास एखादी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही, अशा समाश्रित संविदा, निश्चित कालावधी संपला असून अशी घटना घडलेली नाही अथवा अशी घटना घडणार नाही हे निश्चित कालावधी संपण्यापूर्वी सुनिश्चित झाले तर, कायद्याद्वारे अंमलात आणता येतील.

**उदाहरणे**

(क) विवक्षित जहाज एक वर्षाच्या आत परतल्यास "ख" ला काही पैशांची रक्कम देऊ असे "क" वचन देतो. जहाज एक वर्षाच्या आत परतल्यास संविदा अंमलात आणता येईल आणि जहाज एक वर्षाच्या आत जळून गेल्यास ती शून्यवत होते.

(ख) विवक्षित जहाज एक वर्षाच्या आत न परतल्यास "ख" ला काही पैशांची रक्कम देऊ असे "क" वचन देतो. जहाज एक वर्षाच्या आत परतले नाही किंवा एक वर्षाच्या आत जळून गेले तर संविदा अंमलात आणता येईल.

**अशक्य घटनांवर समाश्रित असलेला करार शून्यवत असणे.**

**३६.** अशक्य घटना घडल्यास एखादी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही असे समाश्रित करार शून्यवत असतात. मग करारातील पक्षकारांना घटनेची अशक्यता ज्यावेळी करार झाला त्यावेळी ज्ञात असो वा नसो.

**उदाहरणे**

(क) दोन सरळ रेषांनी जागा वेढली गेल्यास "ख" ला १,००० रुपये देऊ असे "क" वचन देतो. करार शून्यवत आहे.

(ख) "ख" ने "क" ची मुलगी "ग" हिच्याशी विवाह केल्यास "ख" ला १,००० रुपये देऊ असा "क" करार करतो. कराराच्या वेळी "ग" मृत होतो. करार शून्यवत आहे.

## प्रकरण चार

## संविदाच्या पालनाविषयी

### ज्यांचे पालन केलेच पाहिजे अशा संविदा

**संविदांतील पक्षकारांचे आबंधन.**

**३७.** संविदेतील पक्षकारांनी आपापल्या वचनांचे एकतर पालन केले पाहिजे किंवा पालन करण्याची प्रविदा केली पाहिजे, मात्र या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये असे पालन अनावश्यक किंवा माफ केलेले असेल ते वगळून—
—

वचनदाते पालनापूर्वी मरण पावले तर, संविदेवरून तद्‌विरुद्ध उद्देश दिसून येत नसल्यास, अशा वचनदात्यांचे प्रतिनिधी वचनांनी बांधले जातात.

**उदाहरणे**

(क) विवक्षित दिवशी १,००० रुपये दिल्यावर माल "ख" च्या स्वाधीन करू असे "क" वचन देतो. "क" त्या दिवसापूर्वी मरण पावतो. "क" चे प्रतिनिधी "ख" कडे माल स्वाधीन करण्यास बांधलेले आहेत आणि "ख" "क" च्या प्रतिनिधींना १,००० रुपये देण्यास बांधलेला आहे.

(ख) "क" विवक्षित किंमतीस "ख" ला विवक्षित दिवशी एक रंगचित्र काढून देण्याचे वचन देतो. "क" त्या दिवसापूर्वी मरण पावतो. "क" चे प्रतिनिधी किंवा "ख" देखील संविदा अंमलात आणू शकत नाही.

**पालनाची प्रविदा स्वीकारण्यास नकार दिल्याचा परिणाम.**

**३८.** जेथे वचनदात्याने वचनग्रहीत्याला पालनाची प्रविदा केलेली असेल आणि प्रविदा स्वीकारण्यात आली नसेल तेथे, वचनदाता पालन न केल्याबद्दल जबाबदार नसतो, तसेच त्यामुळे संविदेनुसार मिळालेले आपले हक्कही तो गमावीत नाही.

अशा प्रत्येक प्रविदेने पुढील शर्ती पूर्ण केल्या पाहिजेत :—

(१) ती बिनशर्त असली पाहिजे ;

(२) ती योग्य वेळी व ठिकाणी आणि ज्या व्यक्तीने प्रविदा केली असेल, ती आपल्या वचनाने जे करण्यास बांधलेली आहे ते सर्वच त्या ठिकाणी व त्यावेळी करण्यास समर्थ व इच्छुक आहे याची खात्री करून घेण्याची वाजवी संधी, ज्या व्यक्तीला प्रविदा केली तिला मिळेल अशा परिस्थितीत ती केलेली असली पाहिजे ;

(३) जर प्रविदा म्हणजे वचनग्रहीत्याकडे काही स्वाधीन करण्याची प्रविदा असेल तर देऊ केलेली वस्तू ही वचनदाता आपल्या वचनाद्वारे स्वाधीन करण्यास बांधलेला आहे तीच वस्तू आहे हे पाहण्याची वचनग्रहीत्यास वाजवी संधी मिळाली पाहिजे.

अनेक संयुक्त वचनग्रहीत्यांपैकी एकाने केलेल्या प्रविदेला त्या सर्वांनी केलेल्या प्रविदांचेच वैध परिणाम असतात.

**उदाहरण**

"क" "ख" ला त्याच्या गोदामात, १ मार्च १८७३ रोजी विशिष्ट प्रतीच्या कापसाच्या १०० गासड्या स्वाधीन करण्याची संविदा करतो. पालनाची प्रविदा या कलमात सांगितल्याप्रमाणे परिणामक करण्यासाठी, देऊ केलेली वस्तू ही संविदेनुसार ठरलेल्या प्रतीचा कापूस आहे व १०० गासड्या आहेत याबाबत स्वत:चे समाधान करून घेण्याची वाजवी संधी "ख" ला मिळेल अशा परिस्थितीत "ख" च्या गोदामात "क" ने नियत दिवशी तो कापूस आणला पाहिजे.

**३९.** जेव्हा संविदेतील एका पक्षकाराने आपल्या वचनाचे संपूर्णपणे पालन करण्यास नकार दिला असेल किंवा पालन करण्यास स्वतःस निःसमर्थ केले असेल तेव्हा, संविदा चालू ठेवण्यास वचनग्रहीत्याने शब्दांद्वारे किंवा वर्तनाद्वारे आपली मूक संमती दर्शवली नसेल तर त्याला ती संविदा संपविता येईल.

**वचनाचे संपूर्णपणे पालन करण्यास पक्षकाराने नकार दिल्याचा परिणाम.**

**उदाहरणे**

(क) "क" ही गायिका एका नाट्यगृहाचा व्यवस्थापक "ख" याच्याशी पुढील दोन महिन्यांत प्रत्येक आठवड्यातील दोन रात्री त्याच्या नाट्यगृहात गाण्याची संविदा करते व तिला प्रत्येक रात्रीच्या प्रयोगाचे १०० रुपये देण्यास "ख" बांधून घेतो. सहाव्या रात्री "क" नाट्यगृहात इच्छापूर्वक गैरहजर राहते. "ख" ला संविदा संपविण्याची मोकळीक आहे.

(ख) "क" ही गायिका एका नाट्यगृहाचा व्यवस्थापक "ख" याच्याशी पुढील दोन महिन्यांत प्रत्येक आठवड्यातील दोन रात्री त्याच्या नाट्यगृहात गाण्याची संविदा करते व तिला प्रत्येक रात्रीच्या प्रयोगाचे १०० रुपये या दराने पैसे देण्यास "ख" बांधून घेतो. सहाव्या रात्री "क" नाट्यगृहात इच्छापूर्वक गैरहजर राहते. सातव्या रात्री "ख" च्या अनुमतीने "क" गाते. "ख" ने संविदा चालू ठेवण्यास आपली मूकसंमती दर्शवली आहे आणि आता तो ती संपवू शकत नाही, पण सहाव्या रात्री "क" ने गाण्यात कसूर केल्यामुळे झालेल्या नुकसानाबद्दल भरपाई मिळण्यास तो हक्कदार आहे.

**संविदांचे पालन कोणी करावयाचे**

**४०.** कोणत्याही संविदेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही वचनाचे पालन वचनदात्याने स्वतः करावे असा त्या संविदेतील पक्षकारांचा हेतू होता असे प्रकरणाच्या स्वरूपावरून दिसून येत असेल तर, अशा वचनाचे पालन वचनदात्याने केले पाहिजे. अन्य प्रकरणी वचनदात्याला किंवा त्याच्या प्रतिनिधींना त्याचे पालन करण्यासाठी सक्षम असलेल्या व्यक्ती नेमता येईल.

**जिने वचनाचे पालन करावयाचे ती व्यक्ती.**

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला काही पैशांची रक्कम देण्याचे वचन देतो. "ख" ला स्वतः पैसे देऊन, किंवा ते दुसऱ्याकडून "ख" ला देववून "क" ला या वचनाचे पालन करता येईल ; आणि, जर पैसे देण्यासाठी नियत केलेल्या वेळेपूर्वी "क" मरण पावला तर त्याच्या प्रतिनिधींनी वचनाचे पालन केले पाहिजे किंवा तसे करण्यासाठी एखादी योग्य व्यक्ती नेमली पाहिजे.

(ख) "क" हा "ख" साठी रंगचित्र काढण्याचे वचन देतो. "क" ने त्या वचनाचे व्यक्तिशः पालन केले पाहिजे.

**४१.** जेव्हा वचनग्रहीता वचनाचे त्रयस्थ व्यक्तीने केलेले पालन स्वीकारतो तेव्हा तो नंतर वचनदात्याला संविदा अंमलात आणण्यास भाग पाडू शकत नाही.

**त्रयस्थ व्यक्तीने केलेले पालन स्वीकारल्याचा परिणाम.**

**४२.** जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्तींनी संयुक्त वचन दिलेले असेल तेव्हा, संविदेवरून तद्विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, अशा सर्व व्यक्तींनी आपल्या हयातीत संयुक्तपणे आणि त्यापैकी कोणाच्याही मृत्यूनंतर त्याच्या प्रतिनिधीने उत्तरजीवीच्या किंवा उत्तरजीवींच्यासह संयुक्तपणे व अखेरच्या उत्तरजीवीच्या मृत्यूनंतर सर्वांच्या प्रतिनिधींनी संयुक्तपणे वचनाची पूर्तता केली पाहिजे.

**संयुक्त दायित्वांची प्रक्रांती.**

**४३.** जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती संयुक्त वचन देतात तेव्हा, वचनग्रहीता, तद्विरुद्ध व्यक्त कराराच्या अभावी, अशा संयुक्त वचनदात्यांपैकी कोणाही [१][एकास किंवा अधिकांस] संपूर्ण वचनाचे पालन करण्यास भाग पाडू शकेल.

**संयुक्त वचनदात्या-पैकी कोणाही एकाला पालन करण्यास भाग पाडता येईल.**

संविदेवरून तद्विरुद्ध हेतू दिसून न आल्यास, दोन किंवा अधिक संयुक्त वचनदात्यांपैकी प्रत्येकजण वचनाच्या पालनात आपल्या बरोबरीने सारखेच अंशदान करण्यास अन्य प्रत्येक संयुक्त वचनदात्याला भाग पाडू शकेल.

**प्रत्येक वचनदाता अंशदान करण्यास भाग पाडू शकेल.**

जर दोन किंवा अधिक संयुक्त वचनदात्यांपैकी कोणाही एकाने असे अंशदान करण्यात कसूर केली तर, अशा कसुरीमुळे उद्भवणारा तोटा बाकीच्या संयुक्त वचनदात्यांनी समान हिश्श्यांत सोसला पहिजे.

**अंशदान करण्यातील कसुरीमुळे झालेल्या तोट्यात हिस्सा असणे.**

**स्पष्टीकरण.—**या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिभूने आपल्या मुख्य ऋणकोच्या वतीने भरणा केलेल्या रकमा मुख्य ऋणकोकडून वसूल करण्यास प्रतिभूला प्रतिबंध केला जाणार नाही, किंवा मुख्य ऋणकोने केलेल्या भरण्याची प्रतिभूकडून काहीही वसुली करण्यास मुख्य ऋणकोला हक्कदार केले जाणार नाही.

(क) "क", "ख" आणि "ग" संयुक्तपणे "घ" ला ३,००० रुपये देण्याचे वचन देतात. "घ" त्याला ३,००० रुपये देण्यास "क" ला किंवा "ख" ला किंवा "ग" ला भाग पाडू शकेल.

---

१. १८९१ चा अधिनियम क्रमांक १२, कलम २ अनुसूची दोन, भाग एक द्वारे "एकास" याऐवजी घातले.

(ख) "क", "ख" आणि "ग" संयुक्तपणे "घ" ला ३,००० रुपये देण्याचे वचन देतात. संपूर्ण रक्कम देणे "ग" ला भाग पडते. "क" दिवाळखोर आहे, पण त्याची मत्ता त्याची निम्मी ऋणे फेडण्याला पुरेशी आहे. "ग" ५०० रुपये "क" च्या संपदेतून आणि १,२५० रुपये "ख" कडून मिळण्याला हक्कदार आहे.

(ग) "क", "ख" आणि "ग" हे "घ" ला ३,००० रुपये देण्याच्या संयुक्त वचनाने बद्ध आहेत. "ग" काहीही देण्यास असमर्थ आहे, आणि संपूर्ण रक्कम देणे "क" ला भाग पाडते. "क", "ख" कडून १,५०० रुपये मिळण्याला हक्कदार आहे.

(घ) "क", "ख" आणि "ग" हे "घ" ला ३,००० रुपये देण्याच्या संयुक्त वचनाने बद्ध असून "क" आणि "ख" हे "ग" चे केवळ प्रतिभू आहेत. "ग" पैसे देण्यात कसूर करतो. संपूर्ण रक्कम देणे "क" आणि "ख" यांना भाग पडते. "ग" कडून ती वसूल करण्याला ते हक्कदार आहेत.

**एका संयुक्त वचनदात्याला बंधमुक्त करण्याचा परिणाम.**

**४४.** जेथे दोन किंवा अधिक व्यक्तींनी संयुक्त वचन दिलेले असते, तेथे वचनग्रहीत्याने अशा संयुक्त वचनदात्यांपैकी एकाला बंधमुक्त केल्याने अन्य संयुक्त वचनदात्याची किंवा संयुक्त [१]वचनदात्यांची विमुक्ती होत नाही, तसेच बंधमुक्ती याप्रमाणे बंधमुक्तता मिळालेल्या संयुक्त वचनदात्यांना अन्य संयुक्त वचनदात्याप्रत किंवा संयुक्त [१]वचनदात्यांप्रत असलेल्या जबाबदारीतून विमुक्त करत नाही.

**संयुक्त अधिकारांची प्रक्रांती.**

**४५.** जेव्हा एखाद्या व्यक्तीने संयुक्तपणे दोन किंवा अधिक व्यक्तींना वचन दिलेले असेल तेव्हा, संविदेवरून तद्‌विरुद्ध हेतू दिसून न आल्यास, पालनाची मागणी करण्याचा अधिकार, तो व ते यांच्यात परस्परांपुरते, त्यांच्या हयातीत संयुक्तपणे त्यांच्याकडे आणि त्यांच्यापैकी कोणाच्याही मृत्यूनंतर उत्तरजीवीच्या किंवा उत्तरजीवींच्या सह संयुक्तपणे अशा मृत व्यक्तीच्या प्रतिनिधीकडे आणि अखेरच्या उत्तरजीवीच्या मृत्यूनंतर [२]संयुक्तपणे सर्वांच्या प्रतिनिधींच्याकडे राहतो.

**उदाहरण**

"ख" आणि "ग" यांनी "क" ला कर्जाऊ दिलेल्या ५,००० रुपयांच्या प्रतिफलार्थ "क" संयुक्तपणे "ख" आणि "ग" यांना विनिर्दिष्ट दिवशी त्या रकमेची सव्याज परतफेड करण्याचे वचन देतो. "ख" मरण पावतो. पालनाची मागणी करण्याचा अधिकार "ग" च्या हयातीत "ख" च्या प्रतिनिधीसह संयुक्तपणे "ग" च्या कडे आणि "ग" च्या मृत्यूनंतर संयुक्तपणे "ख"आणि "ग" यांच्या प्रतिनिधींच्या कडे राहतो.

## पालनासाठी अवधी व ठिकाण

**जेथे आवेदन करावयाचे नाही आणि कोणताही अवधी विनिर्दिष्ट केलेला नाही तेथे वचनाच्या पालनासाठी कालावधी.**

**४६.** जेथे संविदेनुसार, वचनग्रहीत्याने आवेदन केल्याशिवाय वचनदात्याने वचनाचे पालन करावयाचे असेल आणि पालनासाठी कोणताही अवधी विनिर्दिष्ट केलेला नसेल तेथे अभिसंकेताचे पालन वाजवी अवधीत केले पाहिजे.

**स्पष्टीकरण.—**"वाजवी अवधी म्हणजे काय" हा प्रश्न, प्रत्येक विशिष्ट प्रकरणात, तथ्याचा प्रश्न आहे.

**जेथे अवधी विनिर्दिष्ट केलेला आहे आणि आवेदन करावयाचे नाही तेथे वचनाच्या पालनासाठी अवधी व ठिकाण.**

**४७.** जेव्हा वचनाचे पालन विवक्षित दिवशी करावयाचे असेल आणि वचनग्रहीत्याच्या आवेदनाशिवाय त्याचे पालन करण्याचे वचनदात्याने वचन दिलेले असेल तेव्हा, अशा दिवशी कामकाजाच्या नेहमीच्या वेळात कोणत्याही वेळी आणि जेथे वचनाचे पालन करावयास हवे त्या ठिकाणी वचनदात्याला त्याचे पालन करता येईल.

**उदाहरण**

"क", "ख" च्या वखारीत एक जानेवारीला माल स्वाधीन करण्याचे वचन देतो. "क" त्या दिवशी "ख" च्या वखारीत ती बंद होण्याच्या नेहमीच्या वेळेनंतर माल आणतो आणि तो स्वीकारला जात नाही. "क" ने आपल्या वचनाचे पालन केलेले नाही.

**विवक्षित दिवशी करावयाचे पालन योग्य वेळी व ठिकाणी होण्यासाठी आवेदनपत्र.**

**४८.** जेव्हा वचनाचे पालन विवक्षित दिवशी करावयाचे असेल आणि वचनग्रहीत्याच्या आवेदनाशिवाय त्याचे पालन करण्याचे वचनदात्याने वचन दिलेले नसेल तेव्हा, योग्य ठिकाणी व कामकाजाच्या नेहमीच्या वेळात पालन व्हावे यासाठी आवेदन करणे हे वचनग्रहीत्याचे कर्तव्य असते.

**स्पष्टीकरण.—** "योग्य अवधी व ठिकाण म्हणजे काय" हा प्रश्न, प्रत्येक विशिष्ट प्रकरणात, तथ्याचा प्रश्न आहे.

---

१. कलम १३८ पहा.

२. सरकारी बंधपत्राच्या बाबतीत कलम ४५ च्या अपवादासाठी सार्वजनिक ऋण अधिनियम, १९४४ (१९४४ चा १८) कलम ८ पहा.

**४९.** जेव्हा वचनग्रहीत्याच्या आवेदनाशिवाय वचनाचे पालन करावयाचे असेल व त्याच्या पालनासाठी कोणतेही ठिकाण निश्चित केलेले नसेल तेव्हा, वचनाच्या पालनासाठी वाजवी ठिकाण नियत केले जावे यासाठी वचनग्रहीत्याकडे आवेदन करणे व अशा ठिकाणी त्याचे पालन करणे हे वचनदात्याचे कर्तव्य असते.

**जेथे वचनाच्या पालनासाठी आवेदन करावयाचे नाही व कोणतेही ठिकाण निश्चित केलेले नाही तेथे पालनासाठी ठिकाण.**

**उदाहरण**

"क", "ख" ला हजार मण ताग ठरलेल्या दिवशी स्वाधीन करण्याचे वचन देतो. तो घेण्याच्या प्रयोजनार्थ वाजवी ठिकाण नियत केले जावे यासाठी "क" ने "ख" ला आवेदन केले पाहिजे, आणि अशा ठिकाणी त्याच्याकडे ताग स्वाधीन केला पाहिजे.

**५०.** कोणत्याही वचनाचे पालन वचनग्रहीता विहित किंवा मंजूर करील अशा कोणत्याही रीतीने किंवा कोणत्याही वेळी करता येईल.

**वचनग्रहीत्याने विहित किंवा मंजूर केलेल्या रीतीने किंवा वेळी पालन करणे.**

**उदाहरणे**

(क) "ख", "क" चे २,००० रुपये देणे लागतो. "क", "ख" ला, "ग" या बँक व्यवसायीकडील "क" च्या खात्यात ती रक्कम भरण्यास सांगतो. "ग" कडे "ख" चेही खाते असून तो ती रक्कम आपल्या खात्यातून "क" च्या जमा खात्यात खातेबदल करण्याचा आदेश देतो आणि "ग" तसे करतो. नंतर आणि "क" ला खातेबदल झाल्याचे माहीत होण्यापूर्वी "ग" चे दिवाळे निघते. "ख" ने उचित भरणा केलेला आहे.

(ख) "क" आणि "ख" परस्परांचे ऋणी आहेत. "क" व "ख" एका बाबीविरुद्ध दुसरीची वजावट करून हिशेब नक्की करतात आणि "ख" याप्रमाणे नक्की झाल्यावर त्याच्याकडून देय असल्याचे आढळून आलेली बाकी "क" ला चुकती करतो. हे "क" आणि "ख" एकमेकांना ज्या रकमा देणे लागत होते त्या त्यांनी प्रत्येक रक्कम चुकती केल्यासारखे आहे.

(ग) "क", "ख" चे २,००० रुपये देणे लागतो. "ख" ऋण कमी करण्यासाठी म्हणून "क" चा काही माल स्वीकारतो. माल स्वाधीन करणे हे अंशतः फेड म्हणून प्रवर्तित होते.

(घ) "घ" हा "क" चे १०० रुपये देणे लागत असून तो १०० रुपयाची वचनचिठ्ठी डाकेने पाठवण्यास "ख" ला सांगतो. वचनचिठ्ठी अंतर्भूत असलेले पत्र "क" चा योग्य पत्ता लिहून "ख" ने ते डाकेत टाकताच ऋण फिटल्यासारखेच आहे.

**अन्योन्य वचनाचे पालन**

**५१.** जेव्हा संविदा एकाचवेळी पालन करावयाच्या वचनांची बनलेली असते तेव्हा, वचनग्रहीता आपल्या अन्योन्य वचनाचे पालन करण्यास तयार व राजी असल्याशिवाय कोणाही वचनदात्याने आपल्या वचनाचे पालन करण्याची गरज नसते.

**अन्योन्य वचनग्रहीता पालन करण्यास तयार व राजी असल्या-शिवाय वचनदाता पालन करण्याला बांधील नाही.**

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला माल स्वाधीन करील आणि स्वाधीन करण्याच्या वेळी "ख" त्याची किंमत देईल, अशी "क" व "ख" संविदा करतात.

स्वाधीन करण्याच्या वेळी मालाची किंमत देण्यास "ख" तयार व राजी असल्याशिवाय "क" ने माल स्वाधीन करण्याची गरज नाही.

किंमत देण्याच्या वेळी माल स्वाधीन करण्यास "क" तयार व राजी असल्याशिवाय "ख" ने त्याची किंमत देण्याची गरज नाही.

(ख) हप्त्याहप्त्याने द्यावयाच्या किंमतीला "क", "ख" ला माल स्वाधीन करील अशी "क" व "ख" संविदा करतात ; पहिला हप्ता स्वाधीन करण्याच्या वेळी द्यावयाचा आहे.

स्वाधीन करण्याच्या वेळी पहिला हप्ता देण्यास "ख" तयार व राजी असल्याशिवाय "क" ने माल स्वाधीन करण्याची गरज नाही.

पहिला हप्ता देण्याच्या वेळी माल स्वाधीन करण्यास "क" तयार व राजी असल्याशिवाय "ख" ने पहिला हप्ता देण्याची गरज नाही.

**५२.** जेथे अन्योन्य वचनांचे पालन ज्या क्रमाने करावयाचे तो संविदेद्वारे स्पष्टपणे निश्चित करण्यात आला असेल तेथे, त्यांचे पालन त्या क्रमाने केले जाईल; जेथे तो क्रम संविदेद्वारे स्पष्टपणे निश्चित करण्यात आला नसेल तेथे, संव्यवहाराच्या स्वरूपामुळे आवश्यक होईल त्या क्रमाने त्यांचे पालन केले जाईल.

**अन्योन्य वचनांच्या पालनाचा क्रम.**

**उदाहरणे**

(क) "क", "ख" ला ठराविक किंमतीला एक घर बांधून देईल अशी "क" व "ख" संविदा करतात. घर बांधून देण्याच्या "क" च्या वचनांचे पालन घराची किंमत देण्याच्या "ख" च्या वचनाच्या पालनापूर्वी झाले पाहिजे.

(ख) "क" आपला धंदेमाल "ख" ला ठराविक किंमतीला हस्तांतरित करील अशी "क" व "ख" संविदा करतात, आणि "ख" पैशांच्या प्रदानाबद्दल प्रतिभूती देण्याचे वचन देतो. प्रतिभूती दिली जाईपर्यंत "क" च्या वचनाचे पालन होण्याची गरज नाही, कारण "क" ने आपला माल स्वाधीन करण्यापूर्वी त्याला प्रतिभूती मिळणे संव्यवहाराच्या स्वरूपामुळे आवश्यक आहे.

**ज्या घटनेमुळे संविदा परिणामक व्हावयाची आहे त्या घटनेस प्रतिबंध करणाऱ्या पक्षकाराचे दायित्व.**

**५३.** जेव्हा संविदेत अन्योन्य वचने अंतर्भूत असतात, आणि संविदेतील एक पक्षकार दुसऱ्याला आपल्या वचनाचे पालन करण्यास प्रतिबंध करतो तेव्हा, संविदा याप्रमाणे प्रतिबंध झालेल्या पक्षकाराच्या विकल्पानुसार शून्यकरणीय होते; आणि संविदेचे पालन न केल्याचा परिणाम म्हणून त्याला जी कोणतीही हानी पोहोचेल त्याबद्दल अन्य पक्षकाराकडून भरपाई मिळण्यास तो हक्कदार असतो.

**उदाहरण**

"ख", "क" करता एक हजार रुपयात विवक्षित काम पार पाडील अशी "क" व "ख" संविदा करतात. "ख" तद्नुसार काम करण्यास तयार व राजी आहे. पण "क" त्याला तसे करण्यास प्रतिबंध करतो. संविदा "ख" च्या विकल्पानुसार शून्यकरणीय आहे; आणि जर त्याने ती विखंडित करण्याचा पर्याय स्वीकारला तर, तिचे पालन न केल्यामुळे त्याला झाली असेल अशा कोणत्याही हानीबद्दल "क" कडून भरपाई वसूल करण्याला तो हक्कदार आहे.

**अन्योन्य वचनांनी मिळून बनलेल्या संविदेत, ज्या वचनांचे पालन प्रथम करावयाचे त्याबाबतच्या कसुरीचा परिणाम.**

**५४.** जेव्हा संविदा अशा अन्योन्य वचनांची मिळून बनलेली असते की, त्यातील एकाचे पालन किंवा त्याच्या पालनाची मागणी दुसऱ्याचे पालन होईपर्यंत केली जाऊ शकत नाही आणि निकटपूर्वी उल्लेखिलेल्या वचनाचा वचनदाता त्याचे पालन करण्यात कसूर करतो तेव्हा, असा वचनदाता अन्योन्य वचनाच्या पालनाची मागणी करू शकत नाही आणि संविदेचे पालन न केल्यामुळे संविदेतील अन्य पक्षकाराला जी हानी पोहोचेल त्याबद्दल त्याने अशा अन्य पक्षकाराला भरपाई दिली पाहिजे.

**उदाहरणे**

(क) "क" पुरवील तो जहाजी माल घेऊन कलकत्त्याहून मॉरिशसला पाठवण्यासाठी "क" "ख" चे जहाज भाड्याने घेतो, "ख" ला त्याच्या वाहतुकीबद्दल विवक्षित वाहणावळ मिळवायची आहे. "क" जहाजाला कोणताही जहाजी माल पुरवत नाही. "क" "ख" च्या वचनाच्या पालनाची मागणी करू शकत नाही आणि त्याचे संविदेचे पालन न केल्यामुळे "ख" ला जी हानी पोहोचेल त्याबद्दल "ख" ला भरपाई दिली पाहिजे.

(ख) "क" ठराविक किंमतीत विवक्षित बांधकाम करण्याची "ख" शी संविदा करतो. कामासाठी जरूर असलेले घरांचे व इमारती लाकूड "ख" ने पुरवावयाचे आहे. "ख" कोणतेही घरांचे किंवा इमारती लाकूड पुरवण्यास नकार देतो आणि ते काम पार पाडता येत नाही . "क" ने ते बांधकाम करण्याची गरज नाही आणि संविदेचे पालन न केल्यामुळे "क" ची जी हानी झाली असेल तीबद्दल त्याला भरपाई देण्यास "ख" बांधलेला आहे.

(ग) एक महिन्यापर्यंत जे जहाज येऊ शकणार नाही त्यावरील विवक्षित व्यापारी माल आपण "ख" ला विनिर्दिष्ट किंमतीत स्वाधीन करू अशी "क" त्याच्याशी संविदा करतो व "ख" संविदेच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत त्या व्यापारी मालाची किंमत देण्यास बांधून घेतो. "ख" आठवड्याच्या आत किंमत देत नाही. "क" ने माल स्वाधीन करण्याच्या वचनाचे पालन करण्याची गरज नाही व "ख" ने भरपाई दिली पाहिजे.

(घ) "क" "ख" ला व्यापारी मालाच्या शंभर गासडया विकण्याचे वचन देतो. दुसऱ्या दिवशी त्या स्वाधीन करावयाच्या आहेत व "ख" "क" ला एक महिन्याच्या आत त्यांची किंमत देण्याचे वचन देतो. "क" आपल्या वचनानुसार माल स्वाधीन करत नाही. किंमत देण्याच्या "ख" च्या वचनाचे पालन होण्याची गरज नाही व "क" ने भरपाई दिली पाहिजे.

**ज्या संविदेत वेळ अत्यावश्यक असते त्याप्रसंगी तिचे पालन निश्चित वेळी करण्यास कसूर केल्याचा परिणाम.**

**५५.** जेव्हा संविदेतील पक्षकार विवक्षित गोष्ट विनिर्दिष्ट वेळी किंवा तत्पूर्वी अथवा विवक्षित गोष्टी विनिर्दिष्ट वेळी किंवा तत्पूर्वी करण्याचे वचन देतो आणि अशी कोणतीही गोष्ट विनिर्दिष्ट वेळी किंवा तत्पूर्वी करण्यात कसूर करतो तेव्हा, जर वेळ ही संविदेची अत्यावश्यक बाब असावी असा पक्षकारांचा हेतू असेल तर, संविदा किंवा तिच्यापैकी पालन झालेली नसेल तेवढी संविदा वचनग्रहीत्याच्या विकल्पानुसार शून्यकरणीय होते.

**जेव्हा वेळ अत्यावश्यक नसते तेव्हा अशी कसूर करण्याचा परिणाम.**

वेळ ही संविदेत अत्यावश्यक असावी असा जर पक्षकारांचा हेतू नसेल तर, अशी गोष्ट विनिर्दिष्ट वेळी किंवा तत्पूर्वी करण्यात कसूर केल्यामुळे संविदा शून्यकरणीय होत नाही; पण अशा कसुरीमुळे वचनग्रहीत्याला झालेल्या कोणत्याही हानीबद्दल तो वचनदात्याकडून भरपाई मिळण्यास हक्कदार असतो.

**संमत झालेल्यापेक्षा अन्य वेळी केलेल्या पालनाच्या स्वीकृतीचा परिणाम.**

वचनदात्याने आपल्या वचनाचे पालन संमत केलेल्या वेळी करण्यात कसूर केल्यामुळे शून्यकरणीय असलेल्या संविदेच्या बाबतीत, जर संमत झालेल्यापेक्षा अन्य कोणत्याही वेळी केलेले अशा वचनाचे पालन वचनग्रहीत्याने स्वीकारले असेल तर, संमत केलेल्या वेळी वचनाचे पालन न झाल्यामुळे झालेल्या कोणत्याही हानीबद्दल वचनग्रहीता भरपाईची मागणी, तसे करण्याचा आपला हेतू असल्याची नोटीस अशा स्वीकाराच्या वेळी वचनदात्याला दिल्याशिवाय, करू शकत नाही.

**५६.** मुळातच अशक्य असलेली कृती करण्याचा करार शून्यवत असतो. **अशक्य कृती करण्याचा करार.**

एखादी कृती करण्याची संविदा केली असता, ती कृती संविदा केल्यानंतर अशक्य होते किंवा वचनदाता प्रतिबंध करू शकत नव्हता अशा एखाद्या घटनेच्या कारणाने बेकायदेशीर होते अशा बाबतीत ती संविदा, ती कृती जेव्हा अशक्य किंवा बेकायदेशीर होते तेव्हा शून्यवत होते.[१] **नंतर अशक्य किंवा बेकायदेशीर ठरणारी कृती करण्याची संविदा.**

जेव्हा एखाद्या व्यक्तीने जी अशक्य किंवा बेकायदेशीर असल्याचे तिला माहीत होते किंवा वाजवी तत्परता दाखवली असती तर माहीत होऊ शकले असते आणि वचनग्रहीत्याला जे माहीत नव्हते अशी एखादी गोष्ट करण्याचे वचन दिलेले असते तेथे, वचनाचे पालन न केल्यामुळे अशा वचनग्रहीत्याला जी हानी पोहोचेल अशा कोणत्याही हानीबद्दल अशा वचनदात्याने अशा वचनग्रहीत्याला भरपाई दिली पाहिजे. **अशक्य किंवा बेकायदेशीर असल्याचे माहीत असलेल्या कृतीचे पालन न केल्यामुळे झालेल्या हानीबद्दल भरपाई.**

### उदाहरणे

(क) "क" "ख" शी जादूने खजिना शोधून काढण्याचा करार करतो. करार शून्यवत आहे.

(ख) "क" व "ख" एकमेकांशी विवाह करण्याची संविदा करतात. विवाहासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी "क" वेडा होतो. संविदा शून्यवत होते.

(ग) "क" चा "ग" शी आधीच विवाह झाला असताना व तो ज्या कायद्याला अधीन आहे त्याद्वारे, त्यास बहुपत्नीकत्व आचरण्यास मनाई झालेली असताना, तो "ख" शी विवाह करण्याची संविदा करतो. "क" ने आपल्या वचनाचे पालन न केल्यामुळे "ख" च्या झालेल्या हानीबद्दल त्याने तिला भरपाई दिली पाहिजे.

(घ) "क" "ख" करता विदेशी बंदरात जहाजी माल चढवून घेण्याची संविदा करतो. ते बंदर ज्या देशात आहे त्या देशाविरुद्ध "क" चे सरकार नंतर युद्ध घोषित करते. युद्ध घोषित होते तेव्हा संविदा शून्यवत होते.

(ङ) "ख" ने आगाऊ दिलेल्या रकमेच्या प्रतिफलार्थ "क" एका नाट्यसंस्थेत सहा महिन्यांकरता भूमिका करण्याची संविदा करतो. कित्येक प्रसंगी "क" इतका आजारी होतो की, तो भूमिका करू शकत नाही. त्या त्या प्रसंगी भूमिका करण्याची संविदा शून्यवत होते.

**५७.** जेथे प्रथमत: ज्या विवक्षित गोष्टी वैध आहेत त्या करण्यासाठी आणि दुसरे म्हणजे, विनिर्दिष्ट परिस्थितीत ज्या अवैध आहेत अशा अन्य विवक्षित गोष्टी करण्यासाठी व्यक्ती अन्योन्यास वचन देतात, तेथे पहिला वचन-संच संविदा असतो, मात्र दुसरा शून्यवत करार असतो. **वैध गोष्टी आणि तसेच अन्य अवैध गोष्टीही करण्याचे अन्योन्य वचन.**

### उदाहरण

"क" "ख" ला एक घर १०,००० रुपयाला विकेल, मात्र "ख" ने ते जुगारघर म्हणून वापरले तर तो "क" ला त्याबद्दल ५०,००० रुपये देईल असा "क" आणि "ख" करार करतात.

अन्योन्य वचनांचा पहिला संच म्हणजे घर विकणे आणि त्याबद्दल १०,००० रुपये देणे ही संविदा आहे.

दुसरा संच बेकायदेशीर उद्दिष्टांकरता म्हणजे "ख" ने ते जुगारघर म्हणून वापरणे याकरता असून तो शून्यवत करार आहे.

**५८.** ज्याची एक शाखा वैध आहे आणि दुसरी अवैध आहे अशा पर्यायी वचनाच्या बाबतीत, केवळ वैध शाखाच अंमलात आणली जाऊ शकते. **एक शाखा अवैध असलेले पर्यायी वचन.**

### उदाहरण

"क" "ख" ला १,००० रुपये देईल व "ख" त्याला त्याबद्दल नंतर तांदूळ किंवा चोरटी आयात केलेली अफू स्वाधीन करील असा "क" व "ख" करार करतात.

हा करार म्हणजे तांदूळ स्वाधीन करण्याची विधिग्राह्य संविदा आहे आणि अफूपुरता तो शून्यवत करार आहे.

### प्रदानाचे विनियोजन

**५९.** जेथे एखादा ऋणको, तो एखाद्या व्यक्तीची अनेक वेगवेगळी ऋणे देणे लागत असता, एखादे प्रदान विशिष्ट ऋण फेडण्याकडे उपयोजित करावयाचे आहे, अशा व्यक्त सूचनेसह किंवा ते उपलक्षित करणाऱ्या परिस्थितीत तिच्याकडे ते प्रदान करतो तेथे, ते प्रदान स्वीकारले गेल्यास तदनुसार उपयोजित केले गेले पाहिजे. **फेडावयाचे ऋण दर्शवलेले असते त्याबाबतीतील प्रदानाचे उपयोजन.**

---

१. पुढील कलम ६५ पहा.

**उदाहरणे**

(क) "क" "ख" चे अन्य ऋणांच्या जोडीस, एक जूनला देय होणाऱ्या वचनचिठ्ठीवरून १,००० रुपये देणे लागतो. तेवढ्या रकमेचे तो "ख" चे दुसरे कोणतेही ऋण देणे लागत नाही. एक जूनला "क" "ख" ला १,००० रुपये देतो. ते प्रदान त्या वचनचिठ्ठीच्या फेडीसाठी उपयोजित करावयाचे आहे.

(ख) "क" "ख" च्या अन्य ऋणांच्या जोडीनेच त्याचे ५६७ रुपये रकमेचे देणे लागतो. "क" "ख" ला (पत्र) लिहून रकमेचा भरणा करण्याची मागणी करतो. "क" "ख" ला ५६७ रुपये पाठवतो. जे ऋण चुकते करण्याची "ख" ने मागणी केली होती त्याची फेड म्हणून हा भरणा उपयोजित करावयाचा आहे.

**फेडावयाचे ऋण दर्शवलेले नसते त्याबाबतीत प्रदानाचे उपयोजन.**

**६०.** जेथे प्रदान कोणत्या ऋणाकडे उपयोजित करावयाचे त्याची ऋणकोने सूचना दिलेली नसेल किंवा ते दर्शवणारी अन्य कोणतीही परिस्थिती नसेल तेथे, धनकोला ऋणकोकडून प्रत्यक्षात देय व प्रदेय असलेल्या कोणत्याही कायदेशीर ऋणाकडे स्वविवेकानुसार ते उपयोजित करता येईल - मग दाव्यांच्या कालमर्यादेबाबत त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे त्याची वसुली रोधित झालेली असो वा नसो.

**जेथे कोणताही पक्षकार विनियोग निश्चित करत नाही त्याबाबतीतील प्रदानाचे उपयोजन.**

**६१.** जेथे कोणत्याही पक्षकाराने कोणताही विनियोग निश्चित केलेला नसेल, तेथे प्रदान ऋणांची कालक्रमानुसार फेड करण्याकडे उपयोजिले जाईल - मग दाव्यांच्या मुदतमर्यादेबाबत त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे ती मुदतबाह्य झालेली असोत वा नसोत. जर ऋणे समान अवधीची असतील तर ते प्रदान प्रत्येकाच्या फेडीसाठी यथाप्रमाण उपयोजिले जाईल.

**ज्यांचे पालन करण्याची गरज नाही त्या संविदा**

**संविदेचे नवीनीकरण, विखंडन व त्यात फेरफार यांचा परिणाम.**

**६२.** जर संविदेतील पक्षकारांनी तिच्या ऐवजी नवीन संविदा करण्याचा, ती संविदा विखंडित करण्याचा किंवा तिच्यात फेरफार करण्याचा करार केला तर, मूळ संविदेचे पालन करण्याची गरज नसते.

**उदाहरणे**

(क) एका संविदेखाली "क" "ख" चे काही पैसे देणे लागतो. "क", "ख" व "ग" यांच्यात असा करार होतो की, "ख" तेथून पुढे ऋणको म्हणून "क" ऐवजी "ग" चा स्वीकार करील. "क" चे "ख" ला देय असलेले जुने ऋण संपते आणि "ग" कडून "ख" ला देय असे नवीन ऋण निर्माण होते.

(ख) "क" "ख" चे १०,००० रुपये देणे लागतो. "क" "ख" शी संव्यवस्था करतो आणि "ख" ला १०,००० रुपयांच्या ऋणाच्या ऐवजी स्वतः ची ("क" ची) संपदा ५,००० रुपयाला गहाण देतो. ही नवीन संविदा आहे आणि त्यायोगे जुनी संविदा नष्ट होते.

(ग) एका संविदेखाली "क" "ख" चे १,००० रुपये देणे लागतो. "ख" "ग" चे १,००० रुपये देणे लागतो. "ख" "क" ला त्याच्या वहीत १,००० रुपये "ग" च्या खाती जमा टाकण्याचा आदेश देतो. पण "ग" या संव्यवस्थेला अनुमती देत नाही. "ख" अजूनही "ग" चे १,००० रुपये देणे लागतो, आणि कोणतीही नवीन संविदा करण्यात आलेली नाही.

**वचनग्रहीत्याला वचनाचे पालन अनावश्यक किंवा माफ करता येईल.**

**६३.** प्रत्येक वचनग्रहीत्याला, त्याला देण्यात आलेल्या वचनाचे पालन पूर्णतः किंवा अंशतः अनावश्यक किंवा माफ करता येईल अथवा अशा पालनाचा कालावधी वाढवून देता येईल. [1] अथवा त्याऐवजी त्याला योग्य वाटेल अशी कोणतीही पूर्ती स्वीकारता येईल.

**उदाहरणे**

(क) "क" "ख" साठी एक रंगचित्र काढून देण्याचे वचन देतो. नंतर "ख" त्याला तसे करण्यास मनाई करतो. "क" वचनाचे पालन करण्यास त्यानंतर बांधलेला नाही.

(ख) "क" "ख" चे ५,००० रुपये देणे लागतो. ज्या वेळी व ठिकाणी रुपये प्रदेय होते त्यावेळी व ठिकाणी संपूर्ण ऋणाची फेड म्हणून "क" "ख" ला २,००० रुपये देतो व "ख" ते स्वीकारतो. संपूर्ण ऋण फिटते.

(ग) "क" "ख" चे ५,००० रुपये देणे लागतो. "ग" "ख" ला त्याच्या "क" विरोधी मागणीची पूर्ती म्हणून १,००० रुपये देतो आणि तो ते स्वीकारतो. हे प्रदान म्हणजे संपूर्ण मागणीची परतफेड आहे.[2]

---

१. परंतु पुढील कलम १३५ पहा.

२. मागील कलम ४१ पहा.

(घ) एका संविदेनुसार "क" काही पैशांची रक्कम "ख" ला देणे लागतो, ती रक्कम विनिश्चित झालेली नाही. रक्कम विनिश्चित करून न घेता "क" तिची फेड म्हणून "ख" ला २,००० रुपये इतकी रक्कम देतो आणि "ख" ती स्वीकारतो. ही संपूर्ण ऋणाची फेड आहे मग त्याची रक्कम कितीही असो.

(ङ) "क" "ख" चे २,००० रुपये देणे लागतो आणि तो अन्य धनकोचाही ऋणी आहे. "ख" धरून आपल्या ऋणकोशी "क" त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या मागणीच्या रुपयापैकी आठ आणे [1][इतका आपसमेळ] त्यांना देण्याची संव्यवस्था करतो. "ख" ला १,००० रुपयाचा भरणा केल्याने "ख" च्या मागणीची फेड होते.

**शून्यकरणीय संविदेच्या विखंडनाचे परिणाम.**

**६४.** जिच्या विकल्पानुसार संविदा शून्यकरणीय असते ती व्यक्ती जेव्हा ती विखंडित करते तेव्हा तिच्यातील अन्य पक्षकाराने, तिच्यात अंतर्भूत असलेल्या ज्या वचनाचा तो वचनदाता आहे त्याचे पालन करण्याची गरज नसते. शून्यकरणीय संविदा विखंडित करणारा पक्षकार, जर त्याला अशा संविदेमधील अन्य पक्षकाराकडून कोणताही लाभ मिळालेला असेल तर, जिच्याकडून तो मिळाला होता त्या व्यक्तीला, होईल तेथवर, असा लाभ परत करील.[2]

**शून्यवत करारानुसार किंवा जी शून्यवत होते त्या संविदेनुसार जिला फायदा मिळालेला असेल त्या व्यक्तीचे आबंधन.**

**६५.** जेव्हा करार शून्यवत असल्याचे आढळून येते अथवा जेव्हा संविदा शून्यवत होते, तेव्हा अशा करारानुसार किंवा संविदेनुसार जिला कोणताही फायदा मिळाला असेल अशी कोणतीही व्यक्ती, जिच्याकडून तिला तो मिळाला त्या व्यक्तीला तो परत करण्यास किंवा त्याबद्दल भरपाई देण्यास बांधलेली असते.

### उदाहरणे

(क) "ख" ने "क" ची मुलगी "ग" हिच्याशी विवाह करण्याचे वचन दिल्याच्या प्रतिफलार्थ "क" "ख" ला १,००० रुपये देतो. वचनाच्या वेळी "ग" मृत आहे. करार शून्यवत आहे, पण "ख" ने "क" ला १,००० रुपये परत दिले पाहिजेत.

(ख) "क" "ख" शी त्याला १ मे पूर्वी २५० मण तांदूळ स्वाधीन करण्याची संविदा करतो. "क" त्या दिवसापूर्वी केवळ १३० मण स्वाधीन करतो आणि नंतर काहीही स्वाधीन करत नाही. "ख" १ मे नंतर ते १३० मण ठेवून घेतो. तो "क" ला त्याबद्दल पैसे देण्यास बांधलेला आहे.

(ग) "क" ही गायिका एका नाट्यगृहाचा व्यवस्थापक "ख" याच्याशी पुढील दोन महिन्यात प्रत्येक आठवड्यातील दोन रात्री त्याच्या नाट्यगृहात गाणे म्हणण्याची संविदा करते व तिला प्रत्येक रात्रीच्या प्रयोगाचे १०० रुपये देण्यास "ख" वचनबद्ध होता. सहाव्या रात्री "क" नाट्यगृहात इच्छापूर्वक गैरहजर राहते आणि परिणामी "ख" संविदा विखंडित करतो. "ख" ने "क" ला ज्या पाच रात्री तिने गाणे म्हटले होते त्याबद्दल पैसे दिले पाहिजेत.

(घ) "क" "ख" च्या प्रीत्यर्थ १,००० रुपयात एका जलशात गाण्याची संविदा करतो; ते आगाऊ दिलेले आहेत. "क" गाऊ न शकण्याइतका आजारी पडतो. जर "क" गाऊ शकला असता तर "ख" ला जो फायदा झाला असता त्याच्या हानीबद्दल "क" "ख" ला भरपाई देण्यास बांधलेला नाही, पण आगाऊ दिलेले १,००० रुपये त्याने "ख" ला परत केले पाहिजेत.

**शून्यकरणीय संविदेचे विखंडन संसूचित करण्याची किंवा ती परत घेण्याची पद्धत.**

**६६.** शून्यकरणीय संविदेचे विखंडन, [3] प्रस्तावाच्या संसूचनेस किंवा ती परत घेण्यास लागू होतात त्याच नियमांच्या अधिनतेने व त्याच रीतीने संसूचित करता किंवा परत घेता येईल.

**वचनग्रहीत्याने वचनदात्याला पालनाकरता वाजवी सोयी उपलब्ध करून देण्याबाबत दुर्लक्ष केल्याचा परिणाम.**

**६७.** जर कोणत्याही वचनग्रहीत्याने वचनदात्याला आपल्या वचनाचे पालन करण्यास वाजवी सोयी उपलब्ध करून देण्याबाबत दुर्लक्ष केले किंवा त्यास नकार दिला तर, अशा दुर्लक्षामुळे किंवा नकारामुळे घडलेल्या न-पालनाबद्दल (पालन न करण्याबद्दल) वचनदात्याला माफी मिळते.

### उदाहरण

"क" "ख" शी "ख" चे घर दुरुस्त करण्याची संविदा करतो. "ख" "क" ला त्याच्या घराची दुरुस्ती जेथे आवश्यक आहे त्या जागा दाखवून देण्याबाबत हयगय करतो किंवा ते करण्यास नकार देतो.

जर अशा दुर्लक्ष किंवा नकारामुळे संविदेचे पालन केले गेले नसेल तर "क" ला त्याबद्दल माफी मिळते.

---

१. १८९१ चा अधिनियम क्रमांक १२, कलम २ व अनुसूची दोन, भाग-एक द्वारे "इतकी भरपाई" या शब्दांऐवजी घातले.

२. पुढील कलम ७५ पहा.

३. वरील कलमे ३ व ५पहा.

## प्रकरण पाच

## संविदेने निर्माण केलेल्या संबंधांशी सदृश असणाऱ्या विवक्षित संबंधांविषयी

**संविदा करण्यास असमर्थ असलेल्या व्यक्तीला किंवा तिच्यासाठी पुरवठा केलेल्या आवश्यक वस्तूंबाबत दावा सांगणे.**

**६८.** जर संविदा करावयास असमर्थ असलेल्या व्यक्तीला अथवा ज्याचा सांभाळ करण्यास ती विधितः बांधलेली आहे त्या कोणालाही त्याच्या जीवनपद्धतीला अनुरूप असलेल्या आवश्यक वस्तू दुसऱ्या व्यक्तीने पुरवल्या तर जिने असा पुरवठा केला असेल ती व्यक्ती अशा असमर्थ व्यक्तीच्या [१]संपत्तीतून प्रतिपूर्ती मिळण्यास हक्कदार असते.

### उदाहरणे

(क) "क" "ख" या वेड्यास त्याच्या जीवनस्थितीला अनुरूप अशा आवश्यक वस्तू पुरवतो. "क" "ख" च्या मालमत्तेमधून प्रतिपूर्ती मिळण्याला हक्कदार आहे.

(ख) "क" "ख" या वेड्याची पत्नी व मुले यांना त्याच्या जीवनस्थितीला अनुरूप अशा आवश्यक वस्तू पुरवतो. "क" "ख" च्या मालमत्तेमधून प्रतिपूर्ती मिळण्याला हक्कदार आहे.

**ज्याचे प्रदान होण्यात एखादी व्यक्ती हितसंबंधित आहे अशा, दुसऱ्याकडून देय असलेल्या पैशाचे तिने प्रदान केल्याबद्दल तिला प्रतिपूर्ती.**

**६९.** ज्या पैशांचे प्रदान करण्यास अन्य व्यक्ती विधितः बांधलेली आहे त्याचे प्रदान होण्यात जी हितसंबंधित आहे आणि म्हणून जी त्याचे प्रदान करते ती व्यक्ती त्या अन्य व्यक्तीकडून प्रतिपूर्ती मिळण्याला हक्कदार असते.

### उदाहरण

"ख" "क" या जमीनदाराने पट्ट्याने दिलेली बंगालमधील जमीन धारण करतो. "क" ने सरकारला द्यावयाचा महसूल थकल्यामुळे सरकारकडून त्याची जमीन विक्रीस काढल्याची जाहिरात केली जाते. महसूल कायद्यान्वये अशा विक्रीचा परिणाम "ख" चा पट्टा विलोपित होण्यात होईल. विक्रीस व परिणामी स्वतः चा पट्टा विलोपित होण्यास प्रतिबंध होण्यासाठी "ख""क" कडून देय असलेल्या रकमेचे सरकारात प्रदान करतो. "क" याप्रमाणे भरलेली रक्कम "ख" ला भरून देण्यास बांधलेला आहे.

**निःशुल्क नसलेल्या कृतीचा लाभ उपभोगणाऱ्या व्यक्तीचे आबंधन.**

**७०.** जेथे एखादी व्यक्ती कायदेशीरपणे दुसऱ्या व्यक्तीसाठी कोणतीही गोष्ट करते किंवा तिला कोणतीही गोष्ट स्वाधीन करते व ते निःशुल्क करण्याचा तिचा हेतू नसतो आणि अशी अन्य व्यक्ती तिचा लाभ उपभोगते तेथे, दुसरी व्यक्ती पहिल्या व्यक्तीने याप्रमाणे केलेल्या किंवा स्वाधीन केलेल्या गोष्टीबाबत तिला भरपाई देण्यास किंवा ती गोष्ट परत देण्यास बांधलेली असते.[२]

### उदाहरणे

(क) "क" हा व्यापारी "ख" च्या घरी चुकीने माल ठेऊन जातो. "ख" तो माल स्वतःचा समजून चालतो. तो "क" ला त्याबद्दल पैसे देण्यास बांधलेला आहे.

(ख) "क" "ख" ची मालमत्ता आगीपासून वाचवतो. ती गोष्ट निःशुल्क करण्याचा "क" चा हेतू होता असे जर परिस्थिती दर्शवत असेल तर तो "ख" कडून भरपाई मिळण्यास हक्कदार नाही.

**माल सापडलेल्याची जबाबदारी.**

**७१.** दुसऱ्याच्या मालकीचा माल सापडला असता जी व्यक्ती तो आपल्या अभिरक्षेत घेते ती, [३]उपनिहिती जिला अधीन असते त्याच जबाबदारीस अधीन असते.

**चूकभुलीने किंवा जबरदस्तीमुळे ज्या व्यक्तीला पैसे देण्यात आले किंवा वस्तू स्वाधीन करण्यात आली तिचे दायित्व.**

**७२.** ज्या चूकभुलीने किंवा जबरदस्तीमुळे जिला पैसे देण्यात आले असतील किंवा कोणतीही वस्तू स्वाधीन करण्यात आली असेल, त्या व्यक्तीने ते पैसे परत दिले पाहिजेत किंवा ती वस्तू परत केली पाहिजे.

### उदाहरणे

(क) "क" आणि "ख" संयुक्तपणे "ग" चे १०० रुपये देणे लागतात. "क" एकटा "ग" ला त्या रकमेचे प्रदान करतो व ही वस्तुस्थिती माहीत नसताना पुन्हा "ख" "ग" ला आणखी १०० रुपयाचे प्रदान करतो. "ग" ती रक्कम "ख" ला परत देण्यास बांधलेला आहे.

(ख) रेल्वे कंपनी वाहतुकीबद्दल अवैध आकार भरण्यात आल्याशिवाय विवक्षित माल प्रेषितीच्या स्वाधीन करण्यास नकार देते. तो माल मिळवण्यासाठी प्रेषिती आकारलेली रक्कम भरतो. त्या आकारापैकी अवैध होता तितका जादा अंश वसूल करण्याला तो हक्कदार आहे.

---

१. मध्यप्रांत बाल्याधिकरण अधिनियम, १८९९ (१८९९ चा २४) कलम ३१ (१) खालील मध्यप्रांतातील शासकीय पाल्यांच्या मालमत्ता या कलमान्वये दायी असणार नाही.

२. कलम ७० खाली अज्ञान व्यक्तींनी इलाखा शहर लघुवाद न्यायालयांमध्ये आणलेल्या वादांबाबत असल्याप्रमाणे इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ (१८८२ चा १५) - कलम ३२ पहा.

३. पुढील कलमे १५१ व १५२ पहा.

## प्रकरण सहा

### संविदाभंगाच्या परिणामांविषयी

**७३.** जेव्हा संविदेचा भंग झालेला असतो, तेव्हा अशा भंगामुळे ज्याला झळ पोचते तो पक्षकार ज्याने संविदेचा भंग केला त्या पक्षकाराकडून, त्यामुळे त्याची झालेली जी कोणतीही हानी किंवा नुकसान ही अशा भंगामधून व्यवहाराच्या नित्यक्रमात स्वाभाविकपणे घडून आलेली असेल अथवा पक्षकारानी जेव्हा संविदा केली तेव्हा त्यांना, तिच्या भंगामधून जी उद्‌भवण्याचा संभव असल्याचे माहीत होते त्यांच्याबद्दल भरपाई मिळण्याला हक्कदार असतो.

**संविदाभंगामुळे घडून आलेली हानी किंवा नुकसान याबद्दल भरपाई.**

अशी भरपाई भंगाच्या कारणाने पोचलेली कोणतीही सुदूर किंवा अप्रत्यक्ष हानी किंवा नुकसान याबद्दल द्यावयाचे नसते.

संविदेने निर्माण केलेल्यांशी सदृश असे आबंधन जेव्हा ओढवून घेतलेले असते आणि ते पार पाडलेले नसते तेव्हा ते पार पाडण्यात कसूर केल्यामुळे क्षती झालेली कोणतीही व्यक्ती कसूरदार पक्षकाराकडून जणू काही अशा व्यक्तीने ते पार पाडण्याची संविदा केली होती आणि तिने आपल्या संविदेचा भंग केला असल्याप्रमाणे तेवढीच भरपाई मिळण्यास हक्कदार असते.

**संविदेने निर्माण केलेल्यांशी सदृश असलेली आबंधने पार पाडण्यात कसूर केल्याबद्दल भरपाई.**

**स्पष्टीकरण.---**संविदेच्या भंगामुळे उद्‌भवलेल्या हानीचा किंवा नुकसानीचा अंदाज करताना, संविदेचे पालन न केल्यामुळे झालेली गैरसोय दूर करण्याचे जे साधन अस्तित्वात होते ते हिशेबात घेतले पाहिजे.

### उदाहरणे

(क) "क" "ख" ला ५० मण सोरा विवक्षित किंमतीला विकण्याची व स्वाधीन करण्याची संविदा करतो. स्वाधीन होताच किंमत द्यावयाची आहे. "क" आपल्या वचनाचा भंग करतो. सोरा ज्यावेळी स्वाधीन करायला पाहिजे होता त्यावेळी तशाच प्रतीचा ५० मण सोरा ज्या किंमतीस "ख" ला मिळाला असता तीहून संविदा-किंमत काही रकमेने कमी पडत असल्यास तेवढी रक्कम भरपाईच्या रूपाने "क" कडून मिळण्यास "ख" हक्कदार आहे.

(ख) मुंबईला जाण्यासाठी व जो जहाजी माल "क" ने पुरवायचा आहे तो तिथे १ जानेवारीला जहाजावर चढवून घेऊन तो कलकत्त्याला आणण्यासाठी "क" "ख" चे जहाज भाड्याने घेतो; वाहणावळ अर्जित झाल्यानंतर द्यावयाची आहे. "ख" चे जहाज मुंबईला जात नाही, पण "क" ने ज्या अटींवर जहाज भाड्याने घेतले होते त्यांच्या इतक्याच फायदेशीर अटींवर जहाजी मालासाठी योग्य वाहन मिळवण्याची "क" ला संधी आहे. "क" त्या संधीचा स्वतः ला फायदा करून घेतो. पण तसे करताना त्याला त्रास पडतो व खर्च येतो. असा त्रास व खर्च याबद्दल "ख" कडून भरपाई मिळण्यास "क" हक्कदार आहे.

(ग) "क" "ख" कडून ठरलेल्या किंमतीस ५० मण तांदूळ विकत घेण्याची संविदा करतो; स्वाधीन करण्याची वेळ निश्चित केलेली नाही. आपणास तांदूळ देऊ केल्यास आपण ते स्वीकारणार नाही असे नंतर "क" "ख" ला कळवतो. आपण तांदूळ स्वीकारणार नाही असे ज्यावेळी "क" "ख" ला कळवतो त्यावेळी "ख" तांदळाबद्दल जी किंमत मिळवू शकतो तीहून संविदा-किंमत काही रकमेने अधिक असल्यास तेवढी रक्कम भरपाईच्या रूपाने "क" कडून मिळण्यास "ख" हक्कदार आहे.

(घ) "क" "ख" चे जहाज ६०,००० रुपयांना विकत घेण्याची संविदा करतो, पण तो आपल्या वचनाचा भंग करतो. वचनभंगाच्या वेळी "ख" जहाजाबद्दल जी किंमत मिळवू शकतो तीहून संविदा-किंमत काही रकमेने अधिक असल्यास तेवढी अधिक रक्कम भरपाईच्या रूपाने "क" ने "ख" ला दिली पाहिजे.

(ङ) "क" हा नौकेचा मालक "ख" शी विनिर्दिष्ट दिवशी निघून तागाचा जहाजी माल मिर्झापूरला, त्या ठिकाणी विक्रय करण्यासाठी नेण्याची संविदा करतो. काही टाळता येण्याजोग्या कारणामुळे नौका नियत वेळी निघत नाही, त्यामुळे संविदेनुसार नौका निघाली असती तर जहाजी माल मिर्झापूरला ज्यावेळी आला असता त्यापेक्षा उशिरा तो तेथे येतो. त्या दिनांकानंतर व जहाजी माल येण्यापूर्वी तागाची किंमत उतरते. जहाजी माल रीतसर क्रमात पाठवला असता तर ज्यावेळी मिर्झापूरला आला असता त्यावेळी "ख" ला त्याबद्दल जी किंमत मिळाली असती ती आणि तो प्रत्यक्षात ज्यावेळी आला त्यावेळची त्याची बाजारातील किंमत यांमधील तफावत हे "क" ने "ख" ला द्यावयाच्या भरपाईचे प्रमाण आहे.

(च) "क" "ख" चे घर विवक्षित पद्धतीने दुरुस्त करण्याची संविदा करतो आणि आगाऊ पैसे घेतो. "क" घराची दुरुस्ती करतो, पण संविदेनुसार नाही. घराची दुरुस्ती संविदेनुरूप करण्याचा खर्च "क" कडून वसूल करण्यास "ख" हक्कदार आहे.

(छ) "क" आपले जहाज एक जानेवारीपासून एक वर्षासाठी विवक्षित किंमतीला "ख" ला भाड्याने देण्याची संविदा करतो. वाहणावळ वाढते आणि एक जानेवारीला मिळणारे भाडे संविदा-किंमतीहून जास्त होते. "क" आपल्या वचनाचा भंग करतो. त्याने संविदा-किंमती आणि एक जानेवारी व त्यापासून एक वर्षाकरता ज्या किंमतीला "ख" ज्यासारखे जहाज भाड्याने घेऊ शकला असता ती किंमत यांतील तफावतीइतकी भरपाईच्या रूपाने "ख" ला दिली पाहिजे.

(ज) "क" "ख" ला विवक्षित परिणामातील लोखंड ठराविक किंमतीला पुरवण्याची संविदा करतो. "क" ज्या किंमतीला लोखंड मिळवून स्वाधीन करू शकला असता तिच्याहून ती जास्त आहे. "ख" लोखंड घेण्यास गैरपणे नकार देतो. लोखंडाची संविदा-किंमत व ज्या रकमेला "क" लोखंड मिळवून स्वाधीन करू शकला असता ती रक्कम यांमधील तफावतीइतकी रक्कम "ख" ने "क" ला भरपाईच्या रूपाने दिली पाहिजे.

(झ) यंत्राच्या अभावी आपली गिरणी बंद पडली आहे असे "ख" या सामान्य परिवाहकाला सांगून ते यंत्र गिरणीत विनाविलंब पोचवण्यासाठी "क" "ख" च्या स्वाधीन करतो. "ख" मशीन स्वाधीन करण्यास अवाजवी विलंब करतो, परिणामी, "क" ला फायदेशीर सरकारी कंत्राटाला गमवावे लागले. यंत्र स्वाधीन करण्यात विलंब झाला त्या काळात गिरणी चालू राहिली असती तर त्यामुळे जो नफा मिळवता आला असता त्याची सरासरी रक्कम भरपाईच्या रूपाने "ख" कडून मिळण्यास "क" हक्कदार आहे, पण सरकारी कंत्राट गमावल्यामुळे पोचलेल्या तोट्याच्या रकमेस हक्कदार नाही.

(ञ) "क" ने टनाला १०० रुपये याप्रमाणे "ख" ला १,००० टन लोखंड पुरवण्याची "ख" शी संविदा केली असून ते ठरलेल्या वेळी स्वाधीन करावयाचे आहे. त्यासाठी "ग" शी टनाला ८० रुपये याप्रमाणे १,००० टन लोखंडाच्या खरेदीची संविदा करून "ख" शी झालेल्या आपल्या संविदेच्या पालनाच्या प्रयोजनार्थ आपण हे करत आहोत असे तो "ग" ला सांगतो. "ग" "क" शी झालेल्या आपल्या संविदेचे पालन करण्यात कसूर करतो. तो दुसरे लोखंड मिळवू शकत नाही व परिणामी "ख" शी संविदा विखंडित करतो. "ख" शी झालेल्या आपल्या संविदेच्या पालनामुळे "क" ने जो नफा मिळवला असता त्यासाठीचे २०,००० रुपये "ग" ने "क" ला दिले पाहिजेत.

(ट) ठराविक दिवसांपर्यंत यंत्राचा एक विवक्षित नग तयार करून विनिर्दिष्ट किंमतीला "ख" च्या स्वाधीन करण्यासाठी "क" "ख" शी संविदा करतो. "क" विनिर्दिष्ट वेळी यंत्राचा नग स्वाधीन करत नाही आणि याचा परिणाम म्हणून "क" ला जी किंमत द्यावी लागली असती त्यापेक्षा अधिक किंमतीला दुसरे यंत्र मिळवणे "ख" ला भाग पडते आणि "क" शी केलेल्या संविदेच्या वेळीच "ख" ने त्रयस्थ व्यक्तीशी जी संविदा केली होती (मात्र त्याबाबत "क" ला कळवण्यात आलेले नव्हते) तिचे पालन करण्यास "ख" ला प्रतिबंध होतो आणि त्या संविदेच्या भंगाबद्दल भरपाई देणे त्याला भाग पडते. यंत्राच्या नगाची संविदा-किंमत व "ख" ने दुसऱ्या यंत्रासाठी दिलेली रक्कम यामधील तफावतीइतकी रक्कम भरपाईच्या रूपाने "क" ने "ख" ला दिली पाहिजे, मात्र "ख" ने त्रयस्थ व्यक्तीला भरपाईच्या रूपाने दिलेली रक्कम देण्याची आवश्यकता नाही.

(ठ) "ख" ने "ग" ला घर भाड्याने देण्याची संविदा केली असून "ख" ला एक जानेवारीपर्यंत घराचा कब्जा देता यावा याकरता "ख" हा "क" या बांधणीकाराबरोबर घर बांधण्यासाठी व ते त्यावेळेपर्यंत पूर्ण करण्यासाठी संविदा करतो. "ख" व "ग" यांच्यामध्ये संविदा झाल्याचे "क" ला कळवण्यात आले आहे. "क" घराचे बांधकाम इतके कच्चे करतो की, एक जानेवारीपूर्वीच घर कोसळते आणि "ख" ला ते परत बांधावे लागते. परिणामी "ख" त्याला "ग" कडून मिळणार असलेले भाडे गमावतो आणि संविदेच्या भंगाबद्दल "ग" ला भरपाई देणे त्याला भाग पडते. घराच्या फेरबांधणीचा खर्च, गमावलेले भाडे आणि "ग" ला देण्यात आलेली भरपाई याबद्दल "क" ने "ख" ला भरपाई दिली पाहिजे.

(ड) "क" "ख" ला काही व्यापारी माल, तो विशिष्ट प्रतीचा असल्याचे प्राश्वासन देऊन विकतो, आणि या प्राश्वासनावर भरवसा ठेवून "ख" तसेच प्राश्वासन देऊन तो माल "ग" ला विकतो. माल प्राश्वासनानुसार नसल्याचे सिद्ध होते आणि "ख" "ग" ला भरपाईच्या रूपाने काही रक्कम देण्यास दायी ठरतो. "ख" "क" कडून या रकमेची प्रतिपूर्ती मिळण्यास हक्कदार आहे.

(ढ) "क" "ख" ला विनिर्दिष्ट दिवशी काही रक्कम देण्याची संविदा करतो. "क" त्या दिवशी पैसे देत नाही, त्या दिवशी पैसे न मिळाल्यामुळे परिणामी "ख" आपले ऋण फेडू शकत नाही आणि तो सर्वस्वी बरबाद होतो. "क" ने जी मुद्दल रक्कम देण्याची संविदा केली होती ती रक्कम व त्याचबरोबर, तिचा भरणा होण्याच्या दिवसापर्यंतचे व्याज खेरीजकरून "क" "ख" ला कसलीही भरपाई देण्यास दायी असणार नाही.

(ण) "क" "ख" ला एक जानेवारीला विवक्षित किंमतीला ५० मण सोरा (मीठ) स्वाधीन करण्याची संविदा करतो. नंतर एक जानेवारीआधी "ख" एक जानेवारीच्या बाजार किंमतीहून अधिक किंमतीला तो सोरा "ग" ला विकण्याची संविदा करतो. "क" आपल्या वचनाचा भंग करतो. "क" ने "ख" ला द्यावयाच्या भरपाईचा अंदाज करताना एक जानेवारीची बाजार-किंमत हिशेबात घ्यावयाची आहे. "ग" ला विक्री केल्यामुळे "ख" ला जो नफा झाला असता तो विचारात घ्यावयाचा नाही.

(त) "क" "ख" ला ठराविक दिवशी कापसाच्या ५०० गासड्या विकत देण्याची व स्वाधीन करण्याची संविदा करतो. "ख" आपला धंदा कसा चालवतो त्या पद्धतीबद्दल "क" ला माहीत नाही. "क" आपल्या वचनाचा भंग करतो आणि कापूस नसल्यामुळे "ख" ला गिरणी बंद करणे भाग पडते. गिरणी बंद केल्यामुळे "ख" चा जो तोटा झाला त्याबद्दल "क" हा "ख" ला जबाबदार नाही.

(थ) "क" "ख" ला एक जानेवारीला विवक्षित कापड विकत देण्याची व स्वाधीन करण्याची संविदा करतो, "ख" चा त्या कापडापासून विशिष्ट प्रकारच्या टोप्या बनवण्याचा उद्देश आहे, त्या टोप्यांना फक्त त्या हंगामाखेरीज एरव्ही मागणी नाही. नियत वेळ निघून जाईपर्यंत कापड स्वाधीन केले जात नाही आणि इतक्या उशिरा स्वाधीन केले जाते की, त्यावर्षी टोप्या बनवण्यासाठी ते वापरता येत नाही. "ख" "क" कडून कापडाची संविदा-किंमत व त्याची स्वाधीन करण्याच्या वेळेची बाजार-किंमत यांमधील तफावतीइतकी रक्कम भरपाईच्या रूपाने मिळण्यास हक्कदार आहे, पण टोप्या बनवून जो नफा मिळणे त्याला अपेक्षित होते तो नफा मिळण्यास किंवा त्या बनवण्याची पूर्वतयारी करण्याकरता त्याला जो खर्च करावा लागला आहे तो खर्च मिळण्यास हक्कदार असणार नाही.

(द) "क" हा जहाजाचा मालक, एक जानेवारीला निघणाऱ्या "क" च्या जहाजातून "ख" ला कलकत्त्याहून सिडनेला नेण्याची संविदा करतो, आणि "ख" "क" ला आपल्या प्रवासखर्चापैकी निम्मे पैसे अनामत म्हणून देतो. जहाज एक जानेवारीला निघत नाही, आणि परिणामी, "ख" कलकत्त्यात काही काळ अडकून पडतो व त्यामुळे त्याला काही खर्च करावा लागतो. दुसऱ्या जहाजातून तो सिडनेला जाण्यास निघतो व परिणामी, सिडने येथे फारच उशिरा आल्यामुळे काही पैशांची रक्कम गमावतो. "ख" ला त्याची अनामत रक्कम व्याजासह आणि कलकत्त्यात अडकून पडावे लागल्यामुळे त्याला जो खर्च करावा लागला तो आणि दुसऱ्या जहाजावर दिलेला प्रवासखर्च पहिल्या जहाजावर ठरलेल्याहून काही अधिक असल्यास तेवढा परत देण्यास "क" दायी आहे, पण सिडनेला फारच उशिरा आल्यामुळे पैशाची जी रक्कम त्याने गमावली ती देण्यास दायी नाही.

**संविदा भंगासाठी शास्ती करारनिविष्ट असेल अशा बाबतीत संविदा भंगाबद्दल भरपाई.**

**७४.** [1][जेव्हा संविदेचा भंग झालेला असतो तेव्हा, असा भंग झाल्यास भरावयाची रक्कम म्हणून संविदेत एखादी रक्कम नमूद केली असेल तर, किंवा संविदेत शास्ती म्हणून अन्य कोणतीही अट अंतर्भूत असेल तर, भंगाबद्दल तक्रार करणारा पक्षकार, ज्याने संविदेचा भंग केला आहे त्या पक्षकाराकडून, याप्रमाणे नमूद केलेल्या रकमेहून किंवा, यथास्थिति, करारनिविष्ट केलेल्या शास्तीहून अधिक नाही इतकी वाजवी भरपाई मिळण्यास हक्कदार असतो- मग त्या भंगामुळे वास्तविक हानी किंवा नुकसान उद्भवले असल्याचे सिद्ध झालेले असो वा नसो.

**स्पष्टीकरण.—** कसुरीच्या दिनांकापासून वाढीव व्याजाची अट ही शास्तीच्या रूपाची अट असू शकेल.]

**अपवाद.—** जेव्हा कोणतीही व्यक्ती कोणतेही जामीनखत, जातमुचलका किंवा त्याच स्वरूपाचा अन्य संलेख करून देईल, अथवा कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या आदेशानुसार कोणत्याही लोककर्तव्याचे किंवा जिच्यामध्ये लोकहित संबंधित आहे अशा कृतीचे पालन करण्यासाठी कोणतेही बंधपत्र देईल तेव्हा, अशा कोणत्याही संलेखाच्या शर्तीचा भंग झाला तर, त्यात उल्लेखिलेली संपूर्ण रक्कम भरण्यास दायी होईल.

**स्पष्टीकरण.—** जी व्यक्ती सरकारशी संविदा करते ती त्याद्वारे अपरिहार्यपणे कोणतेही लोककर्तव्य पत्करतेच किंवा लोक जिच्यात हितसंबधित आहेत अशी कृती करण्याचे वचन देतेच असे नाही.

**उदाहरणे**

(क) विवक्षित दिवशी "ख" ला ५०० रुपये देण्यास चुकलो तर आपण "ख" ला १,००० रुपये देऊ अशी "क" "ख" शी संविदा करतो. "क" "ख"ला त्या दिवशी ५०० रुपये देण्यास चुकतो. १,००० रुपयाहून अधिक नाही इतकी, न्यायालयाला वाजवी वाटेल अशी भरपाई "क" कडून वसूल करण्यास "ख"हक्कदार आहे.

(ख) "क" ने कलकत्यामध्ये शल्यचिकित्सक म्हणून व्यवसाय केला तर, तो "ख" ला ५,००० रुपये देईल, अशी "क" "ख" शी संविदा करतो. "क" कलकत्यामध्ये शल्यचिकित्सक म्हणून व्यवसाय करतो. ५,००० रुपयांहून अधिक नाही इतक्या, न्यायालयाला वाजवी वाटेल अशा भरपाईस "ख" हक्कदार आहे.

(ग) विवक्षित दिवशी न्यायालयात हजर राहण्यासाठी "क" स्वतःला ५०० रुपयाच्या शास्तीस बांधून घेणारा जातमुचलका देतो. तो त्याचा जातमुचलका गमावतो, "क" संपूर्ण शास्तीस पात्र होतो.

[2][(घ) "क" हा "ख" ला १,००० रुपये या रकमेने १२ टक्के व्याजासह सहा महिन्यांत परतफेड करण्याचे, त्यात कसूर झाल्यास ७५ टक्के दराने व्याज देय होईल अशी अट असलेले बंधपत्र देतो. ही शास्तीच्या स्वरूपाची अट आहे आणि न्यायालयाला वाजवी वाटेल, एवढीच भरपाई "क" कडून वसूल करण्यास "ख" हक्कदार आहे.

(ङ) "क" हा "ख" ला सावकाराचे देणे लागत असून विवक्षित दिनांकापासून १० मण धान्य स्वाधीन करून त्याची परतफेड करण्याचे वचन देतो आणि आपण करारनिविष्ट रक्कम कराराच्या दिनांकास सुपूर्द केली नाही तर २० मण धान्य देण्यास दायी होऊ असा करार करतो. हा शास्तीच्या स्वरूपाचा करार आहे आणि भंग झाल्यास वाजवी भरपाईच मिळण्यास "ख" हक्कदार आहे.

---

१. १८९९ चा अधिनियम ६, कलम ४ द्वारे कलम ७४ च्या पहिल्या परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद घातला.

२. १८९९ चा अधिनियम ६, कलम ४ द्वारे जादा दाखल केले.

(च) कोणताही हप्ता भरण्यास कसूर झाल्यास, संपूर्ण कर्ज देय होईल अशा अटीसह "क" "ख" ला पाच समान हप्त्यात १,००० रुपये कर्जाची परतफेड करण्याचे वचन देतो. ही अट शास्तीच्या स्वरूपाची नाही आणि संविदेची तिच्या अटींनुसार बजावणी करता येईल.

(छ) कोणताही हप्ता भरण्यात कसूर झाल्यास संपूर्ण रक्कम देय होईल अशा अटीसह, "क" "ख" कडून १०० रुपये कर्जाऊ घेतो आणि २०० रुपये, ४० रुपयाच्या ज्या पाच वार्षिक हप्त्यांनी देण्याकरता त्याला बंधपत्र देतो. ही शास्तीच्या स्वरूपाची अट आहे.]

**संविदा अधिकारतः विखंडित करणारा पक्षकार भरपाईस हक्कदार.**

**७५.** जी व्यक्ती संविदा अधिकारतः विखंडित करते ती, संविदेची पूर्तता न झाल्यामुळे तिला पोहचले असेल अशा कोणत्याही नुकसानाबद्दल भरपाईस हक्कदार असते.

**उदाहरण**

"क" ही गायिका एका नाट्यगृहाचा व्यवस्थापक "ख" याच्याशी पुढील दोन महिन्यांत प्रत्येक आठवड्यातील दोन रात्री त्याच्या नाट्यगृहात गाणे गाण्याची संविदा करते व तिला प्रत्येक रात्रीच्या प्रयोगाचे १०० रुपये देण्यास "ख" वचनबद्ध होतो. सहाव्या रात्री "क" नाट्यगृहात इच्छापूर्वक गैरहजर राहते, आणि परिणामी "ख" संविदा विखंडित करतो. संविदेची पूर्तता न झाल्यामुळे "ख" त्याला पोचलेल्या नुकसानाबद्दल भरपाई मागण्यास हक्कदार आहे.

## प्रकरण सात

कलम ७६-१२३ [मालविक्रय] "मालविक्रय अधिनियम, १९३०" (१९३० चा ३) - कलम ६५ द्वारे निरसित.

## प्रकरण आठ

### क्षतिपूर्ती व हमी यांविषयी

**"क्षतिपूर्ती संविदे" ची व्याख्या.**

**१२४.** ज्या संविदेद्वारे एक पक्षकार स्वतःच्या वर्तनामुळे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनामुळे अन्य पक्षकारांस झालेल्या हानीपासून त्याला वाचवण्याचे वचन देतो तिला "क्षतिपूर्ती संविदा" असे म्हणतात.

**उदाहरण**

२०० रुपयाच्या विवक्षित रकमेबाबत "ग" "ख" च्या विरुद्ध करील अशा कोणत्याही कार्यवाहीच्या परिणामांपासून "ख" ची क्षतिपूर्ती करण्याची संविदा "क" करतो. ही क्षतिपूर्ती संविदा आहे.

**क्षतिपूर्ती धारकां-विरुद्ध दावा आणला असता त्याचे हक्क.**

**१२५.** क्षतिपूर्ती संविदेतील वचनग्रहिता, तो आपल्या प्राधिकाराच्या व्याप्तीत कार्य करीत असताना,---

(१) क्षतिपूर्ती करण्याचे वचन लागू असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधातील कोणत्याही दाव्यात त्याला देणे भाग पडेल ती सर्व नुकसानभरपाई ;

(२) जर असा कोणताही दावा आणण्यात किंवा त्यात बचाव देण्यात त्याने वचनदात्याच्या आदेशाचे व्यतिक्रमण केले नसून त्याने ज्याप्रकारे वागणे कोणत्याही क्षतिपूर्ती संविदेच्या अभावी दूरदृष्टीचे ठरले असते त्याप्रमाणे तो वागला असेल तर, अथवा वचनदात्याने त्याला दावा आणण्यास किंवा त्यात बचाव देण्यास प्राधिकृत केले असेल तर, अशा दाव्यात त्याला देणे भाग पडेल तो सर्व परिव्यय ;

(३) अशा कोणत्याही दाव्याची कोणतीही तडजोड वचनदात्याच्या आदेशांविरुद्ध नव्हती व वचनग्रहित्याने जी तडजोड करणे कोणत्याही क्षतिपूर्ती संविदेच्या अभावी दूरदृष्टीचे ठरले असते अशीच ती होती, असे असेल तर, अथवा वचनदात्याने त्याला दाव्याची तडजोड करण्यास प्राधिकृत केले असेल तर, त्या तडजोडीच्या अटींखाली त्याला भराव्या लागल्या असतील त्या सर्व रकमा,

वचनदात्याकडून वसूल करण्यास हक्कदार असतो.

**"हमी संविदा", "प्रतिभू", "मुख्य ऋणको" व "धनको".**

**१२६.** "हमी संविदा" म्हणजे त्रयस्थ व्यक्तीने कसूर केल्यास तिच्या वचनाचे पालन करण्याची किंवा तिचे दायित्व पार पाडण्याची संविदा होय. जी व्यक्ती हमी देते तिला "प्रतिभू" म्हणतात, ज्या व्यक्तीच्या कसुरीबाबत हमी दिली जाते तिला "मुख्य ऋणको" म्हणतात आणि ज्या व्यक्तीला हमी दिली जाते तिला "धनको" म्हणतात. हमी मौखिक किंवा लेखी असू शकेल.

**हमीसाठी प्रतिफल.**

**१२७.** मुख्य ऋणकोच्या लाभासाठी केलेली कोणतीही गोष्ट किंवा दिलेले कोणतेही वचन हमी देण्यासाठी प्रतिभूला पुरेसे प्रतिफल असू शकेल.

**उदाहरणे**

(क) "ख" माल उधारीवर विकत देऊन "ख" ला स्वाधीन करण्याची "क" ला विनंती करतो. मालाची किंमत चुकती होण्याबद्दल "ग" हमी देत असल्यास तसे करण्यास "क" कबूल होतो. "क" च्या माल स्वाधीन करण्याच्या वचनाच्या प्रतिफलार्थ "ग" किंमत चुकती करण्याबद्दल हमी देण्याचे वचन देतो. "ग" च्या वचनासाठी हे पुरेसे प्रतिफल आहे.

(ख) "क" "ख" ला माल विकत देऊन स्वाधीन करतो. नंतर "ग" "क" ला ऋणासाठी "ख" विरुद्ध दावा आणण्यापासून एक वर्ष परावृत्त राहण्याची विनंती करतो आणि त्याने तसे केले तर, "ख" ने कसूर केल्यास आपण त्याची किंमत चुकती करू असे वचन देतो. विनंतीनुसार "क" परावृत्त राहण्याचे कबूल करतो. "ग" च्या वचनासाठी हे पुरेसे प्रतिफल आहे.

(ग) "क" "ख" ला माल विकत देऊन स्वाधीन करतो. नंतर "ख" ने कसूर केल्यास आपण त्याची किंमत देऊ असे "ग" प्रतिफलाशिवाय कबूल करतो. करार शून्यवत आहे.

**१२८.** संविदेद्वारे अन्य तरतूद केली नसेल तर, प्रतिभूचे दायित्व मुख्य ऋणकोच्या दायित्वाशी समव्यापी असते. **प्रतिभूचे दायित्व.**

**उदाहरण**

विनिमयपत्राचे पैसे "ग" हा स्वीकर्ता देईल याबद्दल "क" "ख" ला हमी देतो. "ग" विपत्राचे प्रदान नाकारतो. "क" हा केवळ विपत्राच्या रकमेच्या प्रदानासाठीच नव्हे तर त्यावर देय झाले असेल अशा कोणत्याही व्याजाच्या व आकाराच्या रकमेसाठी ही दायी असेल.

**१२९.** ज्या हमीची व्याप्ती संव्यवहारांच्या मालिकेवर असते तिला "अविरत हमी" म्हणतात. **अविरत हमी.**

**उदाहरणे**

(क) "ख" च्या जमीनदारीतील भाडे गोळा करण्यासाठी "ख" "ग" ला नेमील त्याच्या प्रतिफलार्थ व "ग" ने योग्य रीतीने ते भाडे गोळा करणे व भरणे यांबद्दल "क" "ख" ला ५,००० रुपयाच्या रकमेपर्यंत जबाबदार राहण्याचे वचन देतो. ही अविरत हमी आहे.

(ख) "ख" हा चहा-विक्रेता वेळोवेळी "ग" ला पुरवील त्या कोणत्याही चहाचे पैसे त्याला देण्याबद्धल "क" १०० पौंडापर्यंतची हमी देतो. "ख" "ग" ला १०० पौंडाहून जास्त किंमतीचा चहा पुरवतो आणि "ग" त्याबद्धल "ख" ला पैसे देतो. नंतर "ख" "ग" ला २०० पौंड किंमतीचा चहा पुरवतो. "ग" पैसे देण्यात कसूर करतो. "क" ने दिलेली हमी अविरत हमी होती, आणि तदनुसार तो "ख" ला १०० पौंडाच्या मर्यादेपर्यंत दायी आहे.

(ग) "ख" ने "ग" ला पिठाची पाच पोती स्वाधीन करावयाची व महिन्याच्या आत त्यांची किंमत चुकती व्हावयाची असून "क" "ख" ला ती किंमत दिली जाण्याची हमी देतो. "ख" "ग" ला पाच पोती स्वाधीन करतो. "ग" त्यांची किंमत देतो. नंतर "ख" "ग" ला चार पोती स्वाधीन करतो. "ग" त्याची किंमत देत नाही. "क" ने दिलेली हमी अविरत हमी नव्हती आणि तदनुसार तो चार पोत्यांच्या किमतीबद्दल दायी नाही.

**१३०.** धनकोला नोटीस देऊन, प्रतिभूला अविरत हमी कोणत्याही वेळी भावी संव्यवहारांपुरती परत घेता येईल. **अविरत हमी परत घेणे.**

**उदाहरणे**

(क) "ख" ने "क" च्या विनंतीवरून "ग" करता विनिमयपत्रे वटवावयाची याच्या प्रतिफलार्थ "क" "ख" ला अशा सर्व विपत्रांचे पैसे रीतसर दिले जाण्याबद्दल, ५,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत बारा महिन्यांसाठी हमी देतो. "ख" "ग" करता २,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत विपत्रे वटवतो. नंतर तीन महिन्यांच्या अखेरीस "क" हमी परत घेतो. हे परत घेणे त्यानंतरच्या कोणत्याही वटवणीबद्दल "ख" च्या बाबतीत असलेल्या समग्र दायित्वातून "क" ला विमुक्त करते. मात्र, "ग" कडून कसूर झाल्यास "क" "ख" ला २,००० रुपयांसाठी दायी होतो.

(ख) "ख" "ग" वर जी विपत्रे विकर्षित करील त्या सर्वांचे पैसे तो देईल अशी "क" "ख" ला १०,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत हमी देतो. "ख" "ग" वर विपत्र विकर्षित करतो. "ग" विपत्र स्वीकारतो. "क" (हमी) परत घेण्याची नोटीस देतो. विपत्र परिपक्व होते तेव्हा "ग" ते नाकारतो. "क" आपल्या हमीनुसार दायी आहे.

**१३१.** प्रतिभूचा मृत्यू तद्‌विरुध्द संविदेच्याअभावी भावी संव्यवहारांच्या संबंधापुरते अविरत हमी परत घेणारा म्हणून कार्यान्वित होतो. **प्रतिभूच्या मृत्यूमुळे अविरत हमी परत घेणे.**

**१३२.** जेथे दोन व्यक्ती तिसऱ्या व्यक्तीशी विवक्षित दायित्व पत्करण्याची संविदा करतात आणि त्यांच्यापैकी एकाची कसूर झाल्यास दुसरा दायी होईल अशीही एकमेकांशी संविदा करतात तेथे, तिसरी व्यक्ती अशा संविदेतील पक्षकार नसल्यामुळे, अशा दोन व्यक्तींपैकी प्रत्येकाचे पहिल्या संविदेखाली तिसऱ्या व्यक्तीबाबत जे दायित्व आहे त्यावर दुसऱ्या संविदेच्या अस्तित्वाचा, अशा तिसऱ्या व्यक्तीला त्या अस्तित्वाची जाणीव असली तरी, परिणाम होत नाही. **प्रथमतः दायी असलेल्या दोन व्यक्तींच्या दायित्वा-मध्ये, त्यांच्यामधील एकाची कसूर झाली तर दुसरा प्रतिभू होईल अशी संव्यवस्था त्यांच्याकडे झालेली असल्यास तिचा परिणाम होणार नाही.**

**उदाहरण**

"क" व "ख" हे "ग" ला संयुक्त व पृथक् वचनचिठ्ठी करून देतात. वस्तुतः "क" "ख" चा प्रतिभू म्हणून ती वचनचिठ्ठी करतो, आणि वचनचिठ्ठी केली त्यावेळेस हे "ग" ला माहीत होते. "क" ने "ख" चा प्रतिभू म्हणून वचनचिठ्ठी केली हे "ग" ला माहीत असल्याचे तथ्य हे "ग" ने "क" विरुद्ध वचनचिठ्ठीवरून आणलेल्या दाव्याला उत्तर नव्हे.

**संविदेच्या अटींमध्ये फेरफार केल्यामुळे प्रतिभूची विमुक्ती.**

**१३३.** मुख्य [१][ऋणको] व धनको यांमधील संविदेच्या अटींमध्ये प्रतिभूच्या संमतीशिवाय केलेला कोणताही फेरफार त्या फेरफारानंतरच्या संव्यवहारापुरते प्रतिभूला विमुक्त करतो.

**उदाहरणे**

(क) "ग" च्या बँकेतील व्यवस्थापक म्हणून "ख" च्या वर्तनाबद्दल "क" "ग"साठी प्रतिभू होतो. "ख" चे वेतन वाढवण्यात येईल व तो अधिकर्षाबाबतच्या तोट्याच्या एक चतुर्थांशास दायी होईल अशी संविदा "ख" व "ग" नंतर "क" च्या संमतीशिवाय करतात. "ख" एका ग्राहकाला अधिकर्ष करण्यास मुभा देतो आणि बँक काही रक्कम गमावते. "क" त्याच्या संमतीशिवाय केलेल्या फेरफारामुळे त्याच्या प्रतिभूत्वातून विमुक्त होतो आणि हा तोटा भरून देण्यास तो दायी होत नाही.

(ख) ज्या पदाची कर्तव्ये विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे निश्चित केली आहेत, अशा पदावर "ग" ने "ख" ला नियुक्त केले आहे. त्या पदावर असलेल्या "ख" च्या गैरवर्तनाच्या विरोधात "क" "ग" ला हमी देतो. नंतरच्या अधिनियमाद्वारे त्या पदाच्या स्वरूपात महत्त्वाचा फेरबदल केला जातो. नंतर "ख" गैरवर्तन करतो. "ख" चे गैरवर्तन नंतरच्या अधिनियमाद्वारे परिणाम न झालेल्या कामाबाबत असले तरी बदलामुळे "क" त्याच्या हमीखालील भावी दायित्वातून विमुक्त होतो.

(ग) मालाचा विक्रय करण्यासाठी "ग" "ख" ला आपला कारकून म्हणून वार्षिक वेतनावर, असा कारकून म्हणून "ख" कडे जमा झालेल्या पैशाचा तो रीतसर हिशेब देईल याकरिता "क" "ग" साठी प्रतिभू झाल्यावर नियुक्त करण्याचा करार करतो. नंतर "ख" ला ठराविक वेतनाच्या रूपाने पैसे न देता, त्याला त्याने विकलेल्या मालावरील अडतीच्या रूपाने ते द्यावेत असा करार "ग" व "ख" हे "क" च्या नकळत किंवा त्याच्या संमतीशिवाय करतात. "ख" ने नंतर केलेल्या गैरवर्तनाबद्दल "क" दायी नाही.

(घ) "ग" कडून "ख" ला उधारीवर पुरवल्या जाणाऱ्या कोणत्याही तेलाबद्दल "क" "ग" ला ३,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत अविरत हमी देतो. नंतर "ख" अडचणीत येतो आणि "ग" "ख" ला रोख पैसे घेऊन तेल पुरवीत राहील, व ते पैसे "ख" व "ग" यांच्यामध्ये त्यावेळी विद्यमान असलेल्या ऋणांकडे उपयोजिले जातील अशी संविदा "ख" व "ग" हे "क" च्या नकळत करतात. या नवीन संव्यवस्थेनंतर पुरवण्यात आलेल्या कोणत्याही मालाबद्दल "क" त्याच्या हमीनुसार दायी होत नाही.

(ङ) "ग" "ख" ला ५,००० रुपये, एक मार्चला कर्जाऊ देण्याची संविदा करतो. "क" परतफेडीची हमी देतो. "ग" "ख" ला एक जानेवारीला ५,००० रुपये देतो. "क" आपल्या दायित्वातून विमुक्त होतो, कारण ज्याअर्थी, "ग" ला "ख" वर पैशासाठी एक मार्च पूर्वी वाद आणता येईल त्याअर्थी, संविदेत बदल करण्यात आला आहे.

**मुख्य ऋणकोच्या मुक्तीमुळे किंवा विमुक्तीमुळे प्रतिभूची विमुक्ती.**

**१३४.** धनको व मुख्य ऋणको यांच्यामधील ज्या संविदेद्वारे मुख्य ऋणकोची मुक्ती होते तिच्यामुळे अशा मुख्य ऋणकोची विमुक्ती हा धनकोच्या ज्या कोणत्याही कृती किंवा अकृतीचा वैध परिणाम आहे, त्याच्यामुळे प्रतिभू विमुक्त होतो.

**उदाहरणे**

(क) "ग" ने "ख" ला पुरवावयाच्या मालाबद्दल "क" "ग" ला हमी देतो. "ग" "ख" ला माल पुरवतो, आणि नंतर "ख" अडचणीत येतो व त्याच्या धनकोनी ("ग" धरून) त्यांच्या मागण्यांपासून त्यांना मुक्त करण्याच्या प्रतिफलार्थ तो त्यांच्याशी, आपली मालमत्ता त्यांना अभिहस्तांकित करण्याची संविदा करतो. या ठिकाणी "ग" शी केलेल्या संविदेद्वारे "ख" मुक्त होतो आणि "क" त्याच्या प्रतिभूत्वातून विमुक्त होतो.

(ख) "क" ज्या जमिनीवर निळीचे पीक काढून ते ठराविक दराने "ख" च्या स्वाधीन करण्याची "क" "ख" शी संविदा करतो, आणि "क" च्या संविदेचे पालन करील याकरता "ग" हमी देतो. "ख" "क" च्या जमिनीत जलसिंचनासाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या प्रवाहाची दिशा बदलतो आणि त्यायोगे त्याला निळीचे पीक काढण्यास प्रतिबंध करतो. "ग" त्यानंतर आपल्या हमीनुसार दायी राहत नाही.

(ग) करारनिविष्ट वेळेत निश्चित केलेल्या किमतीस "ख" साठी घर बांधण्याची "क" "ख" शी संविदा करतो ; जरूर ते इमारती लाकूड "ख" ने पुरवावयाचे आहे. "क" संविदेचे पालन करील याकरिता "ग" हमी देतो. "ख" इमारती लाकडाचा पुरवठा करीत नाही. "ग" आपल्या प्रतिभूत्वातून विमुक्त होतो.

**धनको मुख्य ऋणकोशी आपसमेळ करतो किंवा त्याला अवधी देतो किंवा त्याच्याविरुद्ध दावा न आणण्याचा करार करतो अशा बाबतीत प्रतिभूची विमुक्ती.**

**१३५.** धनको व मुख्य ऋणको यांच्यामधील ज्या संविदेद्वारे धनको मुख्य ऋणकोशी आपसमेळ करतो अथवा त्याला अवधी देण्याचे किंवा त्याच्याविरुद्ध दावा न आणण्याचे वचन देतो, ती संविदा, प्रतिभूने अशा संविदेस अनुमती दिली नाही तर प्रतिभूला विमुक्त करते.

---

१. १९९७ चा अधिनियम क्रमांक २४, कलम २ व अनुसूची एक द्वारे घातले.

**१३६.** मुख्य ऋणकोला अवधी देण्याची संविदा धनकोने मुख्य ऋणकोशी न करता त्रयस्थ व्यक्तीशी केलेली असते अशा बाबतीत प्रतिभू विमुक्त होत नाही.

**मुख्य ऋणकोला अवधी देण्याची संविदा त्रयस्थ व्यक्तींशी केली जाते अशा बाबतीत प्रतिभू विमुक्त होत नाही.**

**उदाहरण**

"ख" चा प्रतिभू म्हणून "क" ने विकर्षिलेल्या आणि "ख" ने स्वीकारलेल्या थकीत विपत्राचा धारक "ग" "ड" शी "ख" ला अवधी देण्याची संविदा करतो. "क" विमुक्त होत नाही.

**१३७.** मुख्य ऋणकोविरुद्ध दावा आणण्यापासून किंवा त्याच्याविरुद्ध अन्य कोणत्याही उपायाची बजावणी करण्यापासून धनकोने परावृत्त राहणे एवढ्यानेच केवळ, हमीमध्ये त्याविरुद्ध अशा कोणत्याही तरतुदी नसल्यास प्रतिभू विमुक्त होत नाही.

**धनको दावा आणण्यापासून परावृत्त राहिल्याने प्रतिभू विमुक्त होत नाही.**

**उदाहरण**

"ख", "ग" चे "क" ने हमी दिलेली आहे असे ऋण देणे लागतो. ऋण प्रदेय होते. ऋण प्रदेय झाल्यानंतर एक वर्षभर "ग" "ख" विरुद्ध दावा आणत नाही. "क" त्याच्या प्रतिभूत्वामधून विमुक्त होत नाही.

**१३८.** जेथे सहप्रतिभू असतात तेथे, धनकोने त्यांच्यापैकी एकाची मुक्ती केल्याने इतर प्रतिभू विमुक्त होत नाहीत ; तसेच, याप्रमाणे मुक्ती मिळालेला प्रतिभूही अन्य प्रतिभूंच्या बाबतीत असलेल्या त्याच्या जबाबदारीतून त्यामुळे मुक्त होत नाही.[१]

**एका प्रतिभूच्या मुक्तीमुळे इतर विमुक्त होत नाहीत.**

**१३९.** जर धनकोने प्रतिभूच्या अधिकारांशी विसंगत असेल अशी कोणतीही कृती केली किंवा प्रतिभूच्या बाबतीत असलेल्या त्याच्या कर्तव्यामुळे त्याला जी कृती करणे भाग आहे अशी कोणतीही कृती केली नाही आणि त्यामुळे खुद्द प्रतिभूला मुख्य ऋणकोविरुद्ध उपलब्ध असलेल्या परिणामरूप उपायास हानी पोचली तर प्रतिभू विमुक्त होतो :—

**प्रतिभूच्या परिणामरूप उपायास हानी पोचवणाऱ्या धनकोच्या कृती किंवा अकृतीमुळे प्रतिभूची विमुक्ती.**

**उदाहरणे**

(क) "ख" ठराविक रकमेत "ग" करिता जहाज बांधून देण्याची संविदा करतो, काम जसजसे विवक्षित टप्पे गाठील तसतशी ती रक्कम हप्त्याहप्त्याने द्यावयाची आहे. "ख" कराराचे पालन करील याकरता "क" "ग" ला प्रतिभू होतो. "ग" "क" च्या नकळत "ख" ला शेवटचे दोन हप्ते आधीच देतो. याप्रमाणे आधीच भरणा केल्यामुळे "क" विमुक्त होतो.

(ख) "ख" ने व "ख" चा प्रतिभू म्हणून "क" ने "ग" च्या नावे केलेली संयुक्त व पृथक् वचनचिठ्ठी व तीसोबत "ख" च्या फर्निचरचे विक्रयपत्र व त्याद्वारे फर्निचर विकण्याचा व आवक त्या चिठ्ठीच्या फेडीसाठी उपयोजित करण्याचा अधिकार "ग" ला दिला, या प्रतिभूतीवर "ग" "ख" ला पैसे कर्जाऊ देतो. मागाहून "ग" फर्निचर विकतो, पण त्याची गैरवर्तणूक आणि इच्छापूर्वक केलेला हलगर्जीपणा यामुळे अगदी थोडी किंमत वसूल होते. "क" वचनचिठ्ठीच्या दायित्वातून विमुक्त होतो.

(ग) "क" "ड" ला "ख" कडे शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवतो आणि "ड" च्या इनामदारीबद्दल "ख" ला हमी देतो. "ड" रोकडीचा मेळ करतो हे महिन्यातून निदान एकदा तरी पाहण्याचे "ख" आपल्यातर्फे वचन देतो. वचन दिल्याप्रमाणे "ख" ही गोष्ट होत असल्याचे पाहत नाही आणि "ड" अपहार करतो. "क" आपल्या हमीनुसार "ख" ला दायी होत नाही.

**१४०.** जेथे हमी दिलेले ऋण देय झाले असेल किंवा हमी दिलेले कर्तव्य पार पाडण्यात मुख्य ऋणकोकडून कसूर झाली असेल तेथे प्रतिभू ज्यासाठी दायी आहे त्या सर्वांची फेड किंवा त्याचे पालन होताच धनकोला मुख्य ऋणकोविरुद्ध होते ते सर्व अधिकार प्रतिभूकडे विनिहित होतात.

**फेड किंवा पालन झाल्यावर प्रतिभूचे अधिकार.**

**१४१.** प्रतिभूत्वाचा करार करण्यात आला त्यावेळी मुख्य ऋणकोविरुद्ध धनकोकडे असलेल्या प्रत्येक प्रतिभूतीच्या फायद्याला प्रतिभू हक्कदार असतो - मग प्रतिभूला अशा प्रतिभूतीचे अस्तित्व माहीत असो वा नसो -, आणि जर अशी प्रतिभूती धनकोने गमावली किंवा प्रतिभूच्या संमतीशिवाय सोडून दिली तर, प्रतिभू प्रतिभूतीच्या मूल्याच्या व्याप्तीपुरता विमुक्त होतो.

**धनकोच्या प्रतिभूतीं-च्या फायद्यावर प्रतिभूचा अधिकार.**

**उदाहरणे**

(क) "ग" आपला भाडेकरू "ख" यास "क" च्या हमीवर २,००० रुपये कर्जाऊ देतो. "ख" च्या फर्निचरच्या गहाणाद्वारे "ग" ला त्या २,००० रुपयांकरता अतिरिक्त प्रतिभूति मिळते. "ग" गहाण रद्द करतो. "ख" दिवाळखोर होतो, आणि "ग" "क" विरुध्द त्याच्या हमीच्या आधारावर दावा आणतो. फर्निचरच्या मूल्याइतक्या रकमेपर्यंत "क" दायित्वातून विमुक्त होतो.

(ख) "ग" या धनकोने "ख" ला दिलेले कर्ज हुकूमनाम्याद्वारे प्रतिभूत केलेले असून त्याला त्या कर्जाबद्दल "क" कडूनही हमी मिळते. नंतर "ग" हुकूमनाम्याच्या बजावणीत "ख" चा माल ताब्यात घेतो आणि त्यानंतर "क" च्या नकळत बजावणी मागे घेतो. "क" विमुक्त होतो.

(ग) "ग" कडून "ख" ला मिळणारे कर्ज प्रतिभूत करण्यासाठी "ख" चा प्रतिभू म्हणून "क" "ख" बरोबर संयुक्तपणे "ग" ला बंधपत्र करून देतो. नंतर "ग" "ख" कडून त्याच ऋणाकरता अतिरिक्त प्रतिभूति मिळवतो. मागाहून "ग" अतिरिक्त प्रतिभूति सोडून देतो. "क" विमुक्त होत नाही.

---

१. मागील कलम ४४ पहा.

**विपर्यासाद्वारे मिळालेली हमी अवैध.**

**१४२.** संव्यवहाराच्या महत्त्वाच्या भागासंबंधी धनकोने केलेल्या किंवा त्याला ज्ञात असताना व त्याच्या अनुमतीने करण्यात आलेल्या विपर्यासाद्वारे मिळवलेली असेल अशी कोणतीही हमी अवैध असते.

**लपवणुकीद्वारे मिळवलेली हमी अवैध.**

**१४३.** धनकोने महत्त्वाच्या तथ्याबाबत मौन राखून मिळवली असेल अशी कोणतीही हमी अवैध असते.

**उदाहरणे**

(क) आपल्याकरता पैसे वसूल करण्यासाठी "क" "ख" ला कारकून म्हणून नेमतो. "ख" त्याच्याकडे आलेल्यांपैकी काही पैशांचा हिशेब देण्यात चुकतो, आणि परिणामी "क" "ख" ला तो रीतसर हिशेब देईल याबद्दल प्रतिभूति पुरवण्यास सांगतो. "ख" रीतसर हिशेब देईल याकरता "ग" स्वत: ची हमी देतो. "क" "ग" ला "ख" च्या पूर्वीच्या वर्तनाबद्दल माहिती करून देत नाही. नंतर "ख" कसूर करतो. हमी अवैध आहे.

(ख) २,००० टन इतके लोखंड "ग" ने "ख" ला पुरवावयाचे असून त्याच्या प्रदानाची हमी "क" "ग" ला देतो. "ख" ने दर टनामागे बाजारभावापेक्षा पाच रुपये जास्त द्यावे आणि अशी जादा रक्कम जुन्या ऋणाच्या समापनाकरिता उपयोजित करावी असा "ख" व "ग" यांनी खाजगी रीतीने करार केलेला आहे. हा करार "क" पासून लपवून ठेवण्यात येतो. "क" प्रतिभू म्हणून दायी नाही.

**हमीत सहप्रतिभू सामील होईपर्यंत धनको तिच्या आधारावर कृती करणार नाही अशा संविदेवर हमी.**

**१४४.** जेव्हा एखादी व्यक्ती, अन्य व्यक्ती सहप्रतिभू म्हणून हमीत सामील होईपर्यंत धनको तिच्या आधारावर कृती करणार नाही अशा संविदेवर हमी देते तेथे जर ती अन्य व्यक्ती हमीत सामील झाली नाही तर हमी वैध नसते.

**सहप्रतिभूचे क्षतिपूर्ती करण्याचे उपलक्षित वचन.**

**१४५.** प्रत्येक हमी - संविदेत मुख्य ऋणकोने प्रतिभूची क्षतिपूर्ती करावयाची असे उपलक्षित वचन असते, आणि प्रतिभूने हमीखाली जी जी रक्कम योग्यपणे भरली असेल ती ती मुख्य ऋणकोकडून वसूल करण्याला तो हक्कदार असतो, मात्र गैरपणे भरल्या असतील अशा कोणत्याही रकमांना तो हक्कदार असणार नाही.

**उदाहरणे**

(क) "ख" हा "ग" चा ऋणी आहे, आणि "क" त्या ऋणाबद्दल प्रतिभू आहे. "ग" "क" कडे त्या रकमेची मागणी करतो आणि त्याने नकार देताच त्या रकमेकरता त्याच्याविरुध्द दावा आणतो. दाव्यात बचाव देण्यास वाजवी कारणे असल्यामुळे "क" तसे करतो पण त्याला ऋणाची रक्कम परिव्ययासकट भरणे भाग पडते. मुख्य ऋणादाखल तसेच परिव्ययादाखल त्याने भरलेली रक्कम तो "ख" कडून वसूल करू शकतो.

(ख) "ग" "ख" ला काही पैशाची रक्कम कर्जाऊ देतो आणि ती रक्कम प्रतिभूत करण्यासाठी "ख" ने "क" वर विकर्षिलेले विनिमयपत्र "क" "ख" च्या विनंतीवरून स्वीकारतो. विनिमयपत्राचा धारक "ग " हा "क" कडे त्या रकमेची मागणी करतो आणि "क" ने ती देण्यास नकार देताच विनिमयपत्रावरून त्याच्याविरुध्द दावा आणतो. दाव्यात बचाव देण्यास वाजवी कारणे नसतानाही तो तसे करतो आणि त्याला विनिमयपत्राची व परिव्ययाची रक्कम भरावी लागते. तो "ख" कडून विनिमयपत्राची रक्कम वसूल करू शकतो, पण परिव्ययादाखल भरलेली रक्कम नाही, कारण त्या कारवाईत बचाव देण्यास खरेखुरे कारण नव्हते.

(ग) "ग" ने "ख" ला पुरवावयाच्या तांदळाची किंमत दिली जाण्याबद्दल "क" "ग" ला २,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत हमी देतो. "ग" "ख" ला २,००० रुपयांपेक्षा कमी किमतीचा तांदूळ पुरवतो, पण पुरवलेल्या तांदळाबाबत "क" कडून २,००० रुपयाची रक्कम मिळवतो. "क" प्रत्यक्षात पुरवलेल्या तांदळाच्या किंमतीपेक्षा जास्त रक्कम "ख" कडून वसूल करू शकत नाही.

**सहप्रतिभू समान अंशदान करण्यास दायी.**

**१४६.** जेथे दोन किंवा अधिक व्यक्ती एकाच ऋणाकरता किंवा कर्तव्याकरता संयुक्तपणे किंवा पृथक्‌पणे आणि एकाच संविदेखाली असो वा भिन्न संविदांखाली असो आणि एकमेकांना कळत वा नकळत असो, सहप्रतिभू असतात तेथे, त्याविरुद्ध कोणत्याही संविदेच्याअभावी सहप्रतिभू संपूर्ण ऋणाचा किंवा मुख्य ऋणकोकडून त्याचा जो भाग अदत्त राहिला असेल त्याचा प्रत्येकी समान हिस्सा देण्यास परस्परांना दायी असतात.[१]

**उदाहरणे**

(क) "ङ" ला कर्जाऊ देण्यात आलेल्या ३,००० रुपयांच्या रकमेकरता "क", "ख" व "ग" हे "घ" चे प्रतिभू आहेत. "ङ" परतफेड करण्यात कसूर करतो. "क", "ख" व "ग" त्यांच्यापुरते हे प्रत्येकी १,००० रुपये देण्यास दायी आहेत.

---

१. मागील कलम ४३ पहा.

(ख) "ङ" ला कर्जाऊ देण्यात आलेल्या १,००० रुपयांच्या रकमेकरता "क", "ख" व "ग" हे "घ" चे प्रतिभू आहेत, आणि "क" एक-चतुर्थांशाच्या मर्यादेपर्यंत, "ख" एक-चतुर्थांशाच्या मर्यादेपर्यंत व "ग" एक-द्वितीयांशाच्या मर्यादेपर्यंत जबाबदार असेल अशी संविदा "क", "ख" व "ग" यांच्यात झालेली आहे. "ङ" परतफेड करण्यात कसूर करतो. प्रतिभूपैकी "क" २५० रुपये, "ख" २५० रुपये आणि "ग" ५०० रुपये देण्यास त्यांच्यापुरते दायी आहेत.

**१४७.** जे सहप्रतिभू भिन्न भिन्न रकमांसाठी बांधलेले असतात ते, त्यांच्या त्यांच्या आबंधांनाच्या मर्यादांनुसार असेल तेथवर, समान रकमा देण्यास दायी असतात. **भिन्न भिन्न रकमांसाठी बांधील असलेल्या सहप्रतिभूंचे दायित्व.**

**उदाहरणे**

(क) "घ" ने "ङ" ला रीतसर हिशेब द्यावयाचा या शर्तीसह "क", "ख" व "ग" हे "घ" चे प्रतिभू म्हणून तीन वेगवेगळी बंधपत्रे करून देतात आणि प्रत्येकजण वेगवेगळ्या म्हणजे "क" १०,००० रुपयांच्या, "ख" २०,००० रुपयांच्या आणि "ग" ४०,००० रुपयांच्या शास्तीस स्वतः ला बांधून घेतो. "घ" हिशेबात ३०,००० रुपयांची कसूर करतो. "क", "ख" व "ग" प्रत्येकी १०,००० रुपये भरण्यास दायी आहेत.

(ख) "घ" ने "ङ" ला रीतसर हिशेब द्यावयाचा या शर्तीसह "क", "ख" व "ग" हे "घ" चे प्रतिभू म्हणून तीन वेगवेगळी बंधपत्रे करून देतात आणि प्रत्येकजण वेगवेगळ्या म्हणजे, "क" १०,००० रुपयांच्या, "ख" २०,००० रुपयांच्या आणि "ग" ४०,००० रुपयांच्या शास्तीस स्वतः ला बांधून घेतो. "घ" हिशेबात ४०,००० रुपयांची कसूर करतो. "क" १०,००० रुपये, "ख" व "ग" प्रत्येकी १५,००० रुपये भरण्यास दायी आहेत.

(ग) "घ" ने "ङ" ला रीतसर हिशेब द्यावयाचा या शर्तीसह "क", "ख" व "ग" हे "घ" चे प्रतिभू म्हणून तीन वेगवेगळी बंधपत्रे करून देतात आणि प्रत्येकजण वेगवेगळ्या म्हणजे, "क" १०,००० रुपयांच्या, "ख" २०,००० रुपयांच्या आणि "ग" ४०,००० रुपयांच्या शास्तीस स्वतः ला बांधून घेतो. "घ" हिशेबात ७०,००० रुपयांची कसूर करतो. "क", "ख" व "ग" यांच्यापैकी प्रत्येकास आपल्या बंधपत्राची संपूर्ण शास्ती भरावी लागेल.

## प्रकरण नऊ

## निक्षेपाविषयी

**१४८.** "निक्षेप" म्हणजे एका व्यक्तीने काही प्रयोजनासाठी, ते प्रयोजन सिद्धीस जाईल तेव्हा माल परत करण्यात येईल किंवा तो स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीच्या निदेशांनुसार, त्याची अन्यप्रकारे विल्हेवाट करण्यात येईल; या संविदेवर मालाची दुसरीकडे केलेली सुपूर्दगी होय. माल स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीला "निक्षेपक" म्हणतात. ज्या व्यक्तीकडे तो स्वाधीन करण्यात येतो तिला "निक्षेपग्राही" म्हणतात. **"निक्षेप", "निक्षेपक" व "निक्षेपग्राही" यांच्या व्याख्या.**

**स्पष्टीकरण.---** दुसऱ्याचा माल आधीच कब्जात असलेल्या व्यक्तीने जर तो माल निक्षेपग्राही म्हणून धारण करण्याची संविदा केली तर ती त्यामुळे निक्षेपग्राही होते आणि असा माल निक्षेपाद्वारे स्वाधीन केलेला नसला तरी मालक त्याचा निक्षेपक होतो.

**१४९.** निक्षेपग्राहीस करावयाची सुपूर्दगी उद्देशित निक्षेपग्राहीच्या किंवा त्याच्या वतीने माल धारण करण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्तीच्या कब्जात तो जाणे हा जिचा परिणाम आहे अशी कोणतीही गोष्ट ठरवून करता येईल. **निक्षेपग्राहीला सुपूर्दगी कशी करावयाची.**

**१५०.** निक्षेपित मालातील ज्या वैगुण्यांची त्याला जाणीव आहे आणि मालाच्या वापरास जी विशेष अडथळा आणतात किंवा जी निक्षेपग्राहीला असाधारण जोखमीत टाकतात ती वैगुण्ये निक्षेपग्राहीला उघड करण्यास निक्षेपक बांधील असतो आणि त्याने याप्रमाणे ती उघड केली नाहीत तर, निक्षेपग्राहीला अशा वैगुण्यांपासून प्रत्यक्षपणे पोचणाऱ्या नुकसानाबद्दल तो (निक्षेपक) जबाबदार असतो. **निक्षेपित मालातील वैगुण्ये उघड करणे हे निक्षेपकाचे कर्तव्य.**

जर माल भाड्याने निक्षेपित केला असेल तर, निक्षेपक अशा नुकसानाबद्दल जबाबदार असतो, मग निक्षेपित मालातील अशा वैगुण्यांच्या अस्तित्वाची त्याला जाणीव असो वा नसो.

**उदाहरणे**

(क) जो नाठाळ असल्याचे "क" ला माहीत आहे असा घोडा तो "ख" ला उसना देतो. घोडा नाठाळ आहे हे तथ्य तो उघड करत नाही. घोडा उधळतो. "ख" फेकला जातो व जखमी होतो. "ख" ला पोचलेल्या नुकसानाबद्दल "क" जबाबदार आहे.

(ख) "क" "ख" चे वाहन भाड्याने घेतो. वाहन असुरक्षित आहे, पण "ख" ला याची जाणीव नाही आणि "क" ला दुखापत होते. "क" च्या दुखापतीबद्दल "ख" जबाबदार आहे.

**निक्षेपग्राहीने घ्यावयाची काळजी.**

[1]**१५१.** निक्षेपाच्या सर्व प्रकरणी, निक्षेपग्राहीने, त्याच्याकडे निक्षेपित केलेल्या मालाची, सदृश्य परिस्थितीत सर्वसामान्य व्यवहारदृष्टीचा मनुष्य निक्षेपित[2] मालाच्या इतके आकारमान, दर्जा किंवा मूल्य असलेल्या स्वतः च्या मालाची जितकी घेईल तितकी काळजी घेण्यास बांधलेला असतो.

**निक्षेपित वस्तू गहाळ होणे इत्यादीबद्दल निक्षेपग्राही केव्हा दायी नसतो.**

**१५२.** जर निक्षेपग्राहीने कलम १५१ मध्ये वर्णिलेल्या इतकी काळजी घेतलेली असेल तर, निक्षेपित माल गहाळ झाल्याबद्दल, नष्ट झाल्याबद्दल किंवा ऱ्हास पावल्याबद्दल तो, कोणत्याही विशेष संविदेच्या अभावी, जबाबदार नसतो.

**निक्षेपग्राहीने शर्तीशी विसंगत कृती केल्यामुळे निक्षेपाचे समापन.**

**१५३.** जर निक्षेपित मालाविषयी निक्षेपग्राहीने निक्षेपाच्या शर्तीशी विसंगत अशी कोणतीही कृती केली तर, निक्षेपाची संविदा निक्षेपकाच्या विकल्पानुसार शून्यकरणीय असते.

**उदाहरण**

"क" "ख" ला एक घोडा त्याच्या स्वतःच्या रपेटीसाठी भाड्याने देतो. "ख" आपल्या गाडीतून घोडा हाकतो. हे, "क" च्या विकल्पानुसार निक्षेपाचे समापन होऊ शकेल.

**निक्षेपित मालाचा अनधिकृत वापर करणाऱ्या निक्षेपग्राहीचे दायित्व.**

**१५४.** जर निक्षेपग्राहीने निक्षेपित मालाच्या निक्षेपाच्या शर्तीस अनुसरून नसेल असा कोणताही वापर केला तर, तो मालाच्या अशा वापरातून किंवा तो वापर चालू असताना निक्षेपकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानाबद्दल त्याला भरपाई देण्यास दायी असतो.

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला फक्त त्याच्या स्वतः च्या रपेटीसाठी एक घोडा भाड्याने देतो. "ख" आपल्या कुटुंबातील सदस्य "ग" याला घोड्यावरून रपेट करू देतो. "ग" काळजीपूर्वक रपेट करतो, पण घोडा अपघाताने पडतो आणि त्याला दुखापत होते. घोड्याला झालेल्या दुखापतीबद्दल "क" ला भरपाई देण्यास "ख" दायी आहे.

(ख) खास बनारसला कूच करण्यासाठी "क" कलकत्यात "ख" चा घोडा भाड्याने घेतो. "क" यथायोग्य काळजी घेऊन रपेट करतो, पण बनारस ऐवजी कटककडे कूच करतो. घोडा अपघाताने पडतो व त्याला दुखापत होते. घोड्याला झालेल्या दुखापतीबद्दल "ख" ला भरपाई देण्यास "क" दायी आहे.

**निक्षेपकाच्या संमतीने त्याच्या मालाचे निक्षेपग्राहीच्या मालाशी मिश्रण केल्याचा परिणाम.**

**१५५.** जर निक्षेपग्राहीने निक्षेपकाच्या संमतीने निक्षेपकाचा माल आपल्या स्वतःच्या मालात मिसळला तर अशाप्रकारे निर्माण झालेल्या मिश्रणात, निक्षेपक व निक्षेपग्राही यांचा त्यांच्या त्यांच्या हिश्यांच्या प्रमाणात हितसंबंध असेल.

**माल वेगळा केला जाऊ शकतो तेव्हा, निक्षेपकाच्या संमती-शिवाय केलेल्या मिश्रणाचा परिणाम.**

**१५६.** जर निक्षेपग्राहीने निक्षेपकाच्या संमतीशिवाय निक्षेपकाचा माल आपल्या मालात मिसळला आणि जर तो माल वेगळा करता किंवा विभागता येत असेल तर, मालातील मालमत्ता त्या त्या पक्षकारांकडेच राहते; पण वेगळा करण्याचा किंवा विभागण्याचा खर्च आणि मिश्रणातून उद्‌भवणारे कोणतेही नुकसान सोसण्यास निक्षेपग्राही बांधील असतो.

**उदाहरण**

विशिष्ट खुणा केलेल्या १०० गासड्या "क" "ख" कडे निक्षेपित करतो. "ख" "क" च्या संमतीशिवाय त्या १०० गासड्या वेगळ्या खुणेच्या स्वतःच्या गासड्यांमध्ये मिसळतो; स्वतःच्या १०० गासड्या परत मिळण्यास "क" हक्कदार आहे आणि गासड्या वेगवेगळ्या करण्यासाठी आलेला खर्च व अन्य कोणतेही आनुषंगिक नुकसान सोसण्यास "ख" बांधलेला आहे.

**माल वेगळा केला जाऊ शकत नाही अशा बाबतीत, निक्षेपकाच्या संमती-शिवाय केलेल्या मिश्रणाचा परिणाम.**

**१५७.** जर निक्षेपग्राहीने निक्षेपकाच्या संमतीशिवाय निक्षेपकाचा माल आपल्या स्वतः च्या मालात अशा रीतीने मिसळला की, निक्षेपित माल अन्य मालापासून वेगळा काढणे व तो परत स्वाधीन करणे अशक्य आहे, तर निक्षेपक मालाच्या हानीबद्दल निक्षेपग्राही भरपाई मिळण्यास हक्कदार असतो.

**उदाहरण**

"क" "ख" कडे ४५ रुपये किंमतीचे केप (cape) पिठाचे एक पिंप निक्षेपित करतो. "ख" "क" च्या संमतीशिवाय ते पीठ, पिंपास २५ रुपये या दराच्या आपल्या स्वतःच्या पिठात मिसळतो. "ख" ने "क" ला त्याच्या पिठाच्या हानीबद्दल भरपाई दिली पाहिजे.

---

१. मद्रास बंदर विश्वस्त मंडळ अधिनियम, १९०५ (१९०५ चा मद्रास अधिनियम २) अन्वये घटित झालेली मद्रास बंदर विश्वस्तांची मालाविषयीची जबाबदारी म्हणजे कलम १५२ मधील "कोणत्याही विशेष संविदेच्या अभावी" या विशेषक शब्दांशिवाय या कलमांखालील निक्षेपग्राहीची जबाबदारी असल्याचे घोषित करण्यात आले आहे ; पहा, त्या अधिनियमाचे कलम ४० (१).

२. रेल्वे संविदांबाबत पहा, "भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०" (१८९० चा ९) कलम ७२ सामान्य परिवाहकांच्या दायित्वाबाबत, पहा, "परिवाहक अधिनियम १८६५" (१८६५ चा ३) कलम ८.

**१५८.** निक्षेपाच्या शर्तीनुसार, निक्षेपग्राहीने निक्षेपकासाठी माल ठेवावयाचा असून किंवा त्याची ने-आण करावयाची असून किंवा त्यावर काही क्रिया करावयाची असून निक्षेपग्राहीला त्यासाठी कोणतेही पारिश्रमिक मिळणार नसेल अशा बाबतीत, निक्षेपक निक्षेपग्राहकाला निक्षेपाच्या प्रयोजनार्थ झालेल्या जरूर त्या खर्चाची फेड करील. **आवश्यक त्या खर्चाची निक्षेपकाने फेड करणे.**

**१५९.** वापरण्यासाठी वस्तू उसनी देण्याऱ्याला त्याने ती विशिष्ट काळासाठी किंवा प्रयोजनासाठी दिली असली तरीही, उसनवारी निःशुल्क असल्यास कोणत्याही वेळी ती वस्तू परत मागता येईल. पण जर उसने घेणाऱ्याने विनिर्दिष्ट मुदतीकरिता किंवा प्रयोजनाकरता केलेल्या अशा उसनवारीच्या भरवशावर अशारीतीने वागला असेल की, उसनवार दिलेली वस्तू संमत केलेल्या वेळेआधी परत करण्यामुळे उसनवारीमधून, उसने घेणाऱ्याने वस्तुतः मिळवलेल्या लाभाहून त्याला तोटा अधिक होईल, तर ती परत करणे उसने देणाऱ्याने भाग पाडल्यास याप्रमाणे झालेला तोटा याप्रमाणे मिळालेल्या लाभाहून जितका अधिक असेल तितक्या रकमेबद्दल त्याने उसने घेणाऱ्याचे हानिरक्षण केले पाहिजे. **निःशुल्क उसना दिलेला माल परत करणे.**

**१६०.** निक्षेपित माल, ज्या मुदतीकरिता तो निक्षेपित केला होता ती संपताच किंवा ज्या प्रयोजनाकरता तो निक्षेपित केला होता ते साध्य होताच, मागणीशिवाय परत करणे किंवा निक्षेपकाच्या निदेशांनुसार स्वाधीन करणे हे निक्षेपग्राहीचे कर्तव्य असते. **निक्षेपित माल मुदत संपताच किंवा प्रयोजन साध्य होताच परत करणे.**

[१]**१६१.** जर निक्षेपग्राहीच्या कसुरीमुळे माल योग्य वेळी परत केला गेला नाही, स्वाधीन केला गेला नाही किंवा दिला गेला नाही तर त्या वेळेपासून, माल कोणत्याही प्रकारे गहाळ होणे, नष्ट होणे किंवा ऱ्हास पावणे याबद्दल तो निक्षेपकास जबाबदार असतो.[२] **माल योग्य रीतीने परत केला नसेल अशाबाबतीत निक्षेपग्राहीची जबाबदारी.**

**१६२.** निःशुल्क निक्षेप निक्षेपग्राहीच्या किंवा निक्षेपकाच्या मृत्युमुळे समापित होतो. **निःशुल्क निक्षेपाचे मृत्युमुळे समापन.**

**१६३.** एतद्‌विरुध्द संविदेच्या अभावी निक्षेपित मालापासून झालेली असेल अशी कोणतीही वृद्धी किंवा फायदा निक्षेपकास किंवा त्याच्या निदेशांनुसार स्वाधीन करण्यास निक्षेपग्राही बांधील असेल. **निक्षेपित केलेल्या मालापासूनच्या वृद्धीस किंवा फायद्यास निक्षेपक हक्कदार.**

**उदाहरण**

"क" एक गाय तिची देखभाल करण्यासाठी "ख" च्या हवाली करतो. गाईला एक वासरू होते. "ख" "क" ला गाय व त्याचप्रमाणे वासरू स्वाधीन करण्यास बांधील आहे.

**१६४.** निक्षेपक निक्षेप करण्यास किंवा माल परत घेण्यास किंवा त्यासंबंधी निदेश देण्यास हक्कदार नव्हता तर या कारणाने निक्षेपग्राहीला पोचेल अशा कोणत्याही हानीबद्दल निक्षेपक निक्षेपग्राहीला जबाबदार असतो. **निक्षेपकाची निक्षेपग्राहीच्या बाबतीतली जबाबदारी.**

**१६५.** जर मालाच्या अनेक संयुक्त मालकांनी त्याचा निक्षेप केला तर, कोणत्याही तद्‌विरुद्ध कराराच्या अभावी, निक्षेपग्राहीला सर्वांच्या संमतीशिवाय एका संयुक्त मालकाकडे किंवा त्याच्या निदेशांनुसार तो माल परत स्वाधीन करता येईल. **अनेक संयुक्त मालकांकडून निक्षेप.**

**१६६.** जर मालावर निक्षेपकाचा कोणताही हक्क नसेल आणि निक्षेपग्राहीने सद्‌भावपूर्वक निक्षेपकाकडे किंवा त्याच्या निदेशांनुसार तो परत स्वाधीन केला तर अशा स्वाधीन करण्याबाबत निक्षेपग्राही मालकाला जबाबदार नसतो.[३] **विनाहक्क निक्षेपकाच्या पुन्हा स्वाधीन केला असता निक्षेपग्राही जबाबदार नाही.**

**१६७.** जर निक्षेपकाव्यतिरिक्त अन्य व्यक्ती निक्षेपित मालावर दावा सांगत असेल तर निक्षेपकाकडे माल स्वाधीन करणे थांबविण्यासाठी व मालावरील हक्क निर्णीत करण्यासाठी तिला न्यायालयाकडे अर्ज करता येईल. **निक्षेपित मालावर दावा सांगणाऱ्या त्रयस्थ व्यक्तींचा हक्क.**

---

१. "मद्रास बंदर विश्वस्तांच्या कब्जातील मालाबाबतच्या त्यांच्या जबाबदारीला कलम १६१ लागू असल्याचे घोषित केले आहे, पहा, "मद्रास बंदर विश्वस्त मंडळ अधिनियम, १९०५" (१९०५ चा मद्रास अधिनियम २.)

२. रेल्वे संविदांबाबत पहा, "भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०" (१८९० चा ९) कलम ७२.

३. "साक्षीपुरावा अधिनियम, १८७२" (१८७२ चा १) कलम ११७ पहा.

**माल सापडलेल्याचा हक्क देऊ केलेल्या विनिर्दिष्ट बक्षिसा-करता त्याला दावा करता येईल.**

**१६८.** माल सापडलेल्याला, माल जतन करण्यासाठी व मालक शोधून काढण्यासाठी त्याने स्वेच्छेने घेतलेला त्रास व केलेला खर्च यांबद्दलच्या भरपाईसाठी मालकाविरुद्ध दावा आणण्याचा अधिकार नसतो, पण अशी भरपाई मिळेपर्यंत त्याला तो माल मालकाला न देता ठेवून घेता येईल; आणि जेथे गहाळ झालेला माल परत करण्याबद्दल मालकाने विनिर्दिष्ट बक्षीस देऊ केले असेल तेथे अशा बक्षिसाकरता माल सापडलेल्या व्यक्तीला दावा आणता येईल व ते (बक्षीस) त्याला मिळेपर्यंत माल ठेवून घेता येईल.

**सामान्यत: विक्रेय असलेली वस्तू सापडलेल्या व्यक्तीला ती विकता येईल.**

**१६९.** जी सामान्यत: विक्रीविषय असते अशी वस्तू जेव्हा गहाळ होते तेव्हा, जर वाजवी तत्परतता दाखवूनही मालक सापडू शकला नाही तर, किंवा मागणी झाल्यावर त्याने वस्तू सापडलेल्याचा कायदेशीर खर्च देण्याचे नाकारले तर,

(१) वस्तूला, ती नाश पावण्याचा किंवा तिच्या मूल्याचा अधिकांश गमावण्याचा धोका असेल तेव्हा, किंवा

(२) सापडलेल्या वस्तूबाबत सापडलेल्या व्यक्तीचा कायदेशीर खर्च तिच्या मूल्याच्या दोन-तृतीयांशाइतका असेल तेव्हा, वस्तू सापडणाऱ्याला ती विकता येईल.

**निक्षेपग्राहीचा विशिष्ट धारणाधिकार.**

**१७०.** जेथे निक्षेपाच्या प्रयोजनानुसार, निक्षेपग्राहीने निक्षेपित मालाबाबत श्रम किंवा कौशल्य यांचा वापर अनुस्यूत असलेले कोणतेही काम केले असेल तर, तद्विरुद्ध संविदेच्या अभावी, त्याबाबतीत त्याने केलेल्या कामाबद्दल यथायोग्य पारिश्रमिक मिळेपर्यंत असा माल ठेवून घेण्याचा त्याला अधिकार असतो.

**उदाहरणे**

(क) "ख" या जडजवाहिऱ्याला "क" एक अवघड हिरा पैलू पाडण्यासाठी व उजाळा देण्यासाठी स्वाधीन करतो व त्याप्रमाणे केले जाते. "ख" ला त्याने केलेल्या कामाबद्दल पैसे दिले जाईपर्यंत हिरा ठेवून घेण्यास तो हक्कदार आहे.

(ख) "क" कोट शिवण्यासाठी "ख" या शिंप्याला कापड देतो. कोट पुरा होताच तो स्वाधीन करण्याचे आणि किंमतीबद्दल तीन महिन्यांची उधारी देण्याचे "ख" "क" ला वचन देतो. पैसे मिळेपर्यंत कोट ठेवून घेण्यास "ख" हक्कदार नाही.

**बँकव्यवसायी, वखारिये, मालधक्कावाले, न्यायवादी व विमादलाल यांचा सर्वसाधारण धारणाधिकार.**

**१७१.** बँकव्यवसायी, वखारिये, मालधक्कावाले व उच्च न्यायालयातील न्यायवादी व विमादलाल यांना तद्विरुद्ध संविदेच्या अभावी, त्यांच्याकडे निक्षेपित केलेला कोणताही माल सर्वसाधारण खातेबाकीबद्दल प्रतिभूती म्हणून ठेवून घेता येईल; पण तशा आशयाची सुव्यक्त संविदा असल्याशिवाय, अन्य कोणत्याही व्यक्तींना, त्यांच्याकडे निक्षेपित केलेला माल अशा खातेबाकीबद्दल प्रतिभूती म्हणून ठेवून घेण्याचा अधिकार नसतो.[१]

**तारणरूप निक्षेप**

**"तारण", "तारणकार" व "तारणधारक " यांची व्याख्या.**

**१७२.** ऋणाच्या फेडीबद्दल किंवा वचनाचे पालन करण्याबद्दल प्रतिभूती म्हणून केलेल्या मालाच्या निक्षेपास "तारण" म्हणतात. या प्रकरणी निक्षेपकास "तारणकार" म्हणतात. निक्षेपग्राहीला "तारणधारक" म्हणतात.

**तारणधारकाचा अडवून ठेवण्याचा हक्क.**

**१७३.** तारण ठेवलेला माल तारणधारकाला ऋणाची फेड किंवा वचनाचे पालन एवढ्यासाठी नव्हे तर ऋणावरील व्याज आणि तारण ठेवलेल्या मालाच्या कब्जाबाबत किंवा तो जतन करण्यासाठी त्याला आलेला जरूर तो सर्व खर्च यांसाठीही ठेवून घेता येईल.

**ज्यासाठी माल तारण ठेवला त्याहून अन्य तारणासाठी किंवा वचनासाठी तारण-धारकाने माल ठेवून घ्यावयाचा नाही, मागाहूनच्या कर्जाच्या बाबतीत गृहीतक.**

**१७४.** तारण ठेवलेला माल, ज्याच्याकरता तो तारण ठेवला त्या ऋणाहून किंवा वचनाहून अन्य कोणत्याही ऋणाकरता किंवा वचनाकरता, तशा आशयाच्या संविदेच्या अभावी, तारणधारक ठेवून घेणार नाही; पण तद्विरुद्ध कोणत्याही गोष्टीच्या अभावी तारणधारकाने मागाहून दिलेल्या आगाऊ रकमांच्या बाबत अशी संविदा असल्याचे गृहित धरले जाईल.

**आलेल्या असाधारण खर्चाबाबत तारण-धारकाचा हक्क.**

**१७५.** तारणधारक, तारण ठेवलेला माल जतन करण्यासाठी त्याला आलेला असाधारण खर्च तारणकाराकडून मिळण्यास हक्कदार असतो.

---

१. अभिकर्त्याच्या धारणाधिकाराबाबत पहा. पुढील कलम २२१ रेल्वे प्रशासनाच्या धारणाधिकाराबाबत पहा, भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९) कलम ५५.

**१७६.** ज्यासाठी माल तारण ठेवला होता त्या ऋणाची फेड करण्यात किंवा ठरवलेल्या वेळी वचनाचे पालन करण्यात तारणकाराने कसूर केल्यास तारणधारकाला तारणकाराविरुद्ध त्या ऋणावरून किंवा वचनावरून दावा आणता येईल आणि तारण ठेवलेला माल सांपार्श्विक प्रतिभूती म्हणून ठेवून घेता येईल किंवा तारण ठेवलेली वस्तू तारणकाराला विक्रीची वाजवी नोटीस दिल्यावर विकता येईल. **तारणकार कसूर करतो त्याबाबतीतील तारणधारकाचा हक्क.**

तथापि, अशा विक्रीपासूनचे उत्पन्न ऋणाबाबत किंवा वचनाबाबत देय असलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, शिल्लक रकमेचे प्रदान करण्यास तारणकार अजून दायी असतो. जर विक्रीपासूनची आवक याप्रमाणे देय असलेल्या रकमेहून जास्त असेल, तर तारणधारक अधिशेष तारणकाराला देईल.

**१७७.** ज्यासाठी तारण केले असेल त्या ऋणाच्या फेडीसाठी किंवा वचनाच्या पालनासाठी जर वेळ ठरवलेली असेल आणि ठरवलेल्या वेळी ऋणाची फेड किंवा वचनाचे पालन करण्यात तारणकाराने कसूर केली तर, तारण ठेवलेल्या मालाचे त्याला मागाहून त्याची प्रत्यक्ष विक्री होण्यापूर्वी विमोचन करता येईल;[१] पण त्या प्रकरणी, त्याने त्या व्यतिरिक्त आणखी, त्याच्या कसुरीमुळे उद्‌भवला असेल असा कोणताही खर्च दिला पाहिजे. **कसूर करणाऱ्या तारणकारांचा विमोचनाचा हक्क.**

[२][**१७८.** मालकाच्या संमतीने माल किंवा मालाचे हक्कलेख व्यापारी अभिकर्त्याच्या कब्जात असतील अशाबाबतीत त्याने व्यापारी अभिकर्त्याच्या कामकाजाच्या सामान्य क्रमात कार्य करताना केलेले कोणतेही तारण, जणू काही ते करण्यास मालाच्या मालकाने त्याला व्यक्तपणे प्राधिकृत केले असल्याप्रमाणे तितकेच विधिग्राह्य असेल, परंतु असे की, तारणधारक सद्‌भावपूर्वक कार्य करीत असावा आणि तारण ठेवण्याचा प्राधिकार तारणकाराला नाही याची तारणकाराला तारणाच्या वेळी जाणीव नसली पाहिजे. **व्यापारी अभिकर्त्याने केलेले तारण.**

**स्पष्टीकरण.---** या कलमात "व्यापारी अभिकर्ता" व "हक्कलेख" या शब्दप्रयोगांना, "भारतीय मालविक्रय अधिनियम, १९३०" (१९३० चा ३) मध्ये त्यांना नेमून दिलेले अर्थ असतील.

**१७८ क.** जेव्हा तारणकाराला त्याने तारण ठेवलेल्या मालाचा कब्जा कलम १९ किंवा १९क अन्वये शून्यकरणीय असलेल्या संविदेनुसार मिळालेला असेल, पण तारणाच्या वेळी संविदा विखंडित करण्यात आलेली नसेल तेव्हा, तारणधारकाला मालावर निर्दोष मालकीहक्क प्राप्त होतो, परंतु, तारणधारक सद्‌भावपूर्वक व तारणकाराच्या हक्कवैगुण्याच्या जाणिवेशिवाय कार्य करत असावा.] **शून्यकरणीय संविदेनुसार कब्जा असलेल्या व्यक्तीने केलले तारण.**

**१७९.** एखादी व्यक्ती, ज्यात तिचा केवळ मर्यादित हितसंबंध असेल तो माल तारण ठेवते अशाबाबतीत, तारण त्या हितसंबंधाच्या व्याप्तीपुरते वैध असते. **तारणकाराला केवळ मर्यादित हितसंबंध असेल त्याबाबतीतील तारण.**

### निक्षेपग्राही किंवा निक्षेपक यांचे अपकर्त्याविरुद्ध दावे

**१८०.** त्रयस्थ व्यक्तीने निक्षेपित मालाच्या वापरापासून किंवा कब्जापासून निक्षेपग्रहित्याला गैरपणे वंचित केल्यास किंवा त्या मालाला कोणतीही क्षती पोहोचवल्यास निक्षेप झाला नसता तर मालकाने तशाच प्रकरणी योजले असते असे उपाय योजण्यास निक्षेपग्राही हक्कदार असतो; आणि अशाप्रकारे वंचित करण्याबद्दल किंवा क्षती करण्याबद्दल एकतर निक्षेपग्राहीला किंवा निक्षेपकाला व्यक्तीविरुध्द दावा आणता येईल. **निक्षेपग्राहीचा किंवा निक्षेपकाचा अपकर्त्याविरुध्द दावा.**

**१८१.** अशा कोणत्याही दाव्यात, अनुतोष किंवा भरपाई म्हणून जे काही मिळेल त्याबाबत, निक्षेपग्राही व निक्षेपक यांच्या दरम्यान, त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या हितसंबंधानुसार देवाण-घेवाण केली जाईल. **अशा दाव्यांमधून मिळालेल्या अनुतोषाचे किंवा भरपाईचे संविभाजन.**

## प्रकरण दहा

### अभिकरण अभिकर्त्यांची नियुक्ती व प्राधिकार

**१८२.** "अभिकर्ता" म्हणजे दुसऱ्याकरता कोणतीही कृती करण्यासाठी किंवा त्रयस्थ व्यक्तींबरोबरच्या व्यवहारांमध्ये दुसऱ्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेमलेली व्यक्ती होय. जिच्याकरता अशी कृती केली जाते किंवा जिचे याप्रमाणे प्रतिनिधित्व केले जाते त्या व्यक्तीला "प्रकर्ता" म्हणतात. **" अभिकर्ता " व " प्रकर्ता " यांच्या व्याख्या.**

---

१. मुदतीसाठी पहा, "मुदतमर्यादा अधिनियम, १९६३" (१९६३ चा ३६) अनुसूची एक.

२. १९३० चा अधिनियम क्रमांक ४ द्वारे मूळ कलम १७८ ऐवजी कलमे १७८ व १७८ क घातली.

**अभिकर्ता कोण नेमू शकेल.**

**१८३.** जी व्यक्ती, ती, ज्या कायद्यास अधीन आहे त्यानुसार, सज्ञान वयाची आहे आणि जी निकोप मनाची आहे अशा कोणत्याही व्यक्तीला अभिकर्ता नेमता येईल.

**अभिकर्ता कोणाला होता येईल.**

**१८४.** प्रकर्ता व त्रयस्थ व्यक्ती यांच्या दरम्यान, कोणत्याही व्यक्तीला अभिकर्ता होता येईल; मात्र जी सज्ञान वयाची व निकोप मनाची नाही अशी कोणतीही व्यक्ती, ती आपल्या प्रकर्त्याला यात त्यासंबंधात अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार जबाबदार होईल अशाप्रकारे अभिकर्ता होऊ शकत नाही.

**प्रतिफल असणे आवश्यक नाही.**

**१८५.** अभिकरण निर्माण करण्यासाठी कोणतेही प्रतिफल असणे आवश्यक नाही.

**अभिकर्त्याचा प्राधिकार व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.**

**१८६.** अभिकर्त्याचा प्राधिकार व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.[१]

**व्यक्त व उपलक्षित प्राधिकार यांची व्याख्या.**

**१८७.** प्राधिकार जेव्हा तोंडी किंवा लेखी शब्दांद्वारे दिला जातो तेव्हा तो व्यक्त असल्याचे म्हटले जाते. जेव्हा प्राधिकार प्रकरणाच्या परिस्थितीवरून अनुमानित करावयाचा असतो, तेव्हा तो उपलक्षित असल्याचे म्हटले जाते; आणि तोंडी किंवा लेखी गोष्टी अथवा सामान्य व्यवहारक्रम यांना प्रकरणाची परिस्थती असे गणता येईल.

**उदाहरण**

सेरामपूरमध्ये "क" च्या मालकीचे दुकान असून तो स्वतः कलकत्त्यात राहतो आणि अधूनमधून दुकानावर जातो. "ख" दुकानाची व्यवस्था पाहतो आणि दुकानाच्या प्रयोजनार्थ "ग" कडून "क" च्या नावावर माल मागविण्याचा आणि "क" च्या पैशातून त्याची किंमत चुकती करण्याची त्याची सवय "क"ला माहीत आहे. "ख" ला "क" च्या नावावर "ग" कडून दुकानाच्या प्रयोजनार्थ माल मागवण्याचा उपलक्षित प्राधिकार "क" कडून मिळाला आहे.

**अभिकर्त्याच्या प्राधिकाराची व्याप्ती.**

**१८८.** एखादी कृती करण्याचा प्राधिकार असलेल्या अभिकर्त्याला अशी कृती करण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक कायदेशीर गोष्ट करण्याचा प्राधिकार असतो.

धंदा चालविण्याचा प्राधिकार असलेल्या अभिकर्त्याला अशा धंद्याचे चालन करण्याच्या प्रयोजनार्थ जरूर असलेली किंवा त्याच्या ओघात नेहमी केली जाणारी प्रत्येक कायदेशीर गोष्ट करण्याचा प्राधिकार आहे.

**उदाहरणे**

(क) लंडनमध्ये राहत असलेल्या "ख" ने त्याला येणे असलेल्या ऋणाची मुंबई येथे वसुली करण्यासाठी "क" ला नेमले आहे. ऋणाच्या वसुली करण्याच्या प्रयोजनार्थ जरूर असलेली कोणतीही विधिग्राहय प्रक्रिया "क" ला अंगीकारता येईल व त्याला त्याबद्दल वैध विमुक्ती देता येईल.

(ख) "क" आपला जहाज बांधणीचा व्यवसाय चालविण्यासाठी "ख" ला अभिकर्ता म्हणून नेमतो. "ख" ला धंदा चालविण्यासाठी इमारती लाकूड व इतर सामग्री खरेदी करता येईल आणि कामगार मजुरीने लावता येतील.

**आणीबाणीच्या प्रसंगी अभिकर्त्याचा प्राधिकार.**

**१८९.** आणीबाणीच्या प्रसंगी आपल्या प्रकर्त्याला तोट्यापासून वाचविण्यासाठी, सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेल्या व्यक्तीने सदृश परिस्थितीत स्वतःच्या बाबतीत केल्या असत्या अशा सर्व कृती करण्याचा अभिकर्त्याला प्राधिकार असतो.

**उदाहरणे**

(क) विक्रीसाठी नेमलेल्या अभिकर्त्याला आवश्यक असल्यास मालाची दुरुस्ती करून घेता येईल.

(ख) "क" "ख" कडे कलकत्याला खाद्यसामुग्री, ती ताबडतोब कटकला पाठविण्याचा निदेश देऊन प्रेषित करतो. ती खाद्यसामग्री वाटेत खराब न होता कटकपर्यंत पोचण्यासारखी नसेल तर, "ख" ला कलकत्यात ती विकता येईल.

**उप - अभिकर्ते**

**अभिकर्ता प्रत्यायोजन केव्हा करू शकत नाही.**

**१९०.** अभिकर्त्याने ज्यांचे पालन व्यक्तिशः करण्याचे व्यक्तपणे किंवा उपलक्षणेने पत्करलेले असेल त्या कृतींचे पालन करण्यासाठी तो, उप अभिकर्त्याची नेमणूक सामान्य व्यापारी रूढीनुसार करता येईल किंवा अभिकरणाच्या स्वरूपामुळे ती करणे आवश्यक आहे असे असल्याशिवाय, कायदेशीरपणे दुसऱ्याला नेमू शकत नाही.

---

१. तथापि, नोंदणी अधिनियम, १९०८ कलम ३३ (१९०८ चा १६) पहा. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अनुसूची एक, आदेश तीन, नियम ४ सुध्दा पहा.

**१९१.** उप-अभिकर्ता म्हणजे मूळ अभिकर्त्याने अभिकरणाच्या कामावर नेमलेली आणि त्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करणारी व्यक्ती होय.

**"उप-अभिकर्ता" याची व्याख्या.**

**१९२.** जेथे उप-अभिकर्ता योग्यरीतीने नियुक्त झालेला असतो तेथे, त्रयस्थ व्यक्तींच्या संबंधापुरते, प्रकर्त्याचे प्रतिनिधीत्व उप-अभिकर्त्याकडून केले जाते आणि जणू काही तो मुळात प्रकर्त्याने नियुक्त केलेला अभिकर्ता होता अशाप्रकारे प्रकर्ता त्याच्या कृतींनी बांधला जातो व त्याच्या कृतींबद्दल जबाबदार असतो.

**योग्यरीतीने नेमलेल्या उप-अभिकर्त्याद्वारे प्रकर्त्याचे प्रतिनिधित्व.**

उप-अभिकर्त्याच्या कृतीबद्दल अभिकर्ता प्रकर्त्याला जबाबदार असतो.

**अभिकर्त्याची उप-अभिकर्त्याबद्दलची जबाबदारी.**

लबाडीची किंवा इच्छापूर्वक केलेली अपकृतीची बाब खेरीज करून, उप-अभिकर्ता अभिकर्त्याला आपल्या कृतींबद्दल जबाबदार असतो, मात्र प्रकर्त्याला जबाबदार नसतो.

**उपअभिकर्त्याची जबाबदारी.**

**१९३.** अभिकर्त्याने तसे करण्याचा प्राधिकार नसताना एखाद्या व्यक्तीला उप-अभिकर्ता म्हणून कार्य करण्यास नियुक्त केले असेल अशाबाबतीत प्रकर्त्याचे अभिकर्त्याशी जे नाते असते तेच अभिकर्त्याचे अशा व्यक्तीशी असते, आणि त्याच्या कृतींबद्दल प्रकर्ता व त्रयस्थ व्यक्ती या दोघांनाही तो जबाबदार असतो, याप्रमाणे नेमलेल्या व्यक्तीकडून प्रकर्त्याचे प्रतिनिधित्व होत नाही व तिच्या कृतींना तो जबाबदार असत नाही किंवा ती व्यक्तीही प्रकर्त्याला जबाबदार असत नाही.

**प्राधिकाराशिवाय नियुक्त केलेल्या उप-अभिकर्त्याबद्दल अभिकर्त्याची जबाबदारी.**

**१९४.** अभिकरणाच्या कामात प्रकर्त्यासाठी कार्य करण्याकरता अन्य व्यक्ती नामित करण्याचा व्यक्त किंवा उपलक्षित प्राधिकार धारण करणाऱ्या अभिकर्त्याने तदनुसार अन्य व्यक्ती नामित केली असेल अशा बाबतीत अशी व्यक्ती ही उप-अभिकर्ता नसते, तर अभिकरणाच्या कामातील जो भाग तिच्यावर सोपवण्यात आला असेल अशा भागापुरती ती प्रकर्त्याचा अभिकर्ता असते.

**प्रकर्ता व अभिकरणाच्या वतीने कार्य करण्यासाठी अभिकर्त्याने रीतसर नियुक्त केलेल्या व्यक्ती यांच्यामधील नाते.**

### उदाहरणे

(क) "क" आपली संपदा लिलावाने विकण्याचा आणि त्यासाठी लिलाव करणारा नेमण्याचा निदेश आपला सॉलिसिटर "ख" याला देतो. विक्री पार पाडण्यासाठी "ख" "ग" या लिलाव करणाऱ्याला नामित करतो. "ग" हा उप-अभिकर्ता नाही तर विक्री पार पाडण्यापुरता "क" चा अभिकर्ता आहे.

(ख) "ख" या कलकत्यातील व्यापाऱ्याला "क" त्याला "ग आणि कंपनी" कडून येणे असलेले पैसे वसूल करण्यासाठी प्राधिकृत करतो. पैशांच्या वसुलीसाठी "ग आणि कंपनी" विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याची सूचना "ख" "घ" या सॉलिसिटरला देतो. "घ" हा उप-अभिकर्ता नसून "क" चा सॉलिसिटरआहे.

**१९५.** आपल्या प्रकर्त्यासाठी अशा अभिकर्त्याची निवड करताना, सर्वसामान्य व्यवहारदृष्टीच्या मनुष्याने स्वत:च्या बाबतीत जितकी विवेकबुध्दी वापरली असती तितकीच, विवेकबुद्धी वापरण्यास अभिकर्ता बांधलेला आहे, आणि जर त्याने तसे केले असेल तर, तो याप्रमाणे निवड केलेल्या अभिकर्त्याच्या कृतींबद्दल किंवा त्याच्या हलगर्जीपणाबद्दल प्रकर्त्याला जबाबदार नसतो.

**अशा व्यक्ती नामित करताना अभिकर्त्याचे कर्तव्य.**

### उदाहरणे

(क) "क" "ख" या व्यापाऱ्याला त्याच्यासाठी जहाज खरेदी करण्यास सांगतो. "क" साठी जहाज निवडण्यास "ख" हा एका प्रख्यात नौ-सर्वेक्षकाची नेमणूक करतो. सर्वेक्षक निष्काळजीपणे निवड करतो आणि जहाज जलपर्यटनयोग्य नसल्याचे आढळून येते आणि नष्ट होते. "क" ला "ख" नव्हे नौ-सर्वेक्षक जबाबदार आहे.

(ख) "ख" या व्यापाऱ्याकडे "क" विक्रीसाठी माल प्रेषित करतो. "ख" "क" ला माल विकण्यासाठी रीतसर क्रमानुसार पतदार लिलाव करणाऱ्याची नेमणूक करतो आणि लिलाव करणाऱ्याला विक्रीचे उत्पन्न घेण्याची मुभा देतो. विक्री उत्पन्नाचा हिशेब देण्याआधीच लिलाववाल्याचे दिवाळे निघते. विक्री उत्पन्नासाठी "ख" "क" ला जबाबदार नाही.

### अनुमती

**१९६.** एखाद्या व्यक्तीने दुसऱ्याच्या वतीने त्याच्या नकळत किंवा त्याच्या प्राधिकाराशिवाय कृती केलेल्या असतात अशाबाबतीत अशा कृतीला अनुमती देण्याचा किंवा त्या अस्वीकृत करण्याचा पर्याय त्याला निवडता येईल. जर त्याने त्यांना अनुमती दिली तर जणू काही त्या त्याच्या प्राधिकाराने केलेल्या असाव्या अशाप्रकारे तेच परिणाम होतील.

**एखाद्या व्यक्तीकरता तिच्या प्राधिकाराशिवाय केलेल्या कृतींबाबत तिचा हक्क. अनुमतीचा परिणाम.**

अनुमती व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.

**१९७.** अनुमती व्यक्त किंवा ज्याच्या वतीने कृती केल्या जातात त्या व्यक्तीच्या वर्तनातून उपलक्षित असू शकेल.

**उदाहरणे**

(क) "क" प्राधिकाराशिवाय "ख" साठी माल विकत घेतो. मागाहून "ख" स्वतःच्या फायद्यासाठी "ग" ला तो विकतो. "ख" च्या वर्तनात "क" ने त्याच्यासाठी केलेल्या खरेदीला अनुमती उपलक्षित आहे.

(ख) "ख" च्या प्राधिकाराशिवाय "क" "ख" चे पैसे "ग" ला कर्जाऊ देतो. मागाहून "ख " त्या पैशावर "ग " कडून व्याज स्वीकारतो. "ख " च्या वर्तनात कर्जाला अनुमती उपलक्षित आहे.

विधिग्राह्य अनुमती-साठी माहिती आवश्यक.

**१९८.** प्रकरणाच्या तथ्यांबाबतची जिची माहिती सारतः सदोष आहे ती व्यक्ती विधिग्राह्य अनुमती देऊ शकत नाही.

संव्यवहाराचा भाग असलेल्याप्राधिकृत न केलेल्या कृतीला अनुमती देण्याचा परिणाम.

**१९९.** एखादी व्यक्ती तिच्यावतीने केलेल्या प्राधिकृत न केलेल्या कृतीला अनुमती देईल तर, अशी कृती ज्याचा भाग असतो त्या संपूर्ण संव्यवहारास अनुमती देते असे होते.

प्राधिकृत न केलेल्या व्यक्तीला दिलेल्या अनुमतीमुळे त्रयस्थ व्यक्तीला क्षती पोचत नाही.

**२००.** एका व्यक्तीने दुसरीच्या वतीने अशा दुसऱ्या व्यक्तीच्या प्राधिकाराशिवाय केलेली जी कृती, प्राधिकाराने केली असती तर, त्रयस्थ व्यक्तीला नुकसानभरपाईला दायी करण्यासाठी किंवा त्रयस्थ व्यक्तीचा कोणताही अधिकार किंवा हितसंबंध क्षमापित करण्यासाठी परिणामक झाली असती ती कृती अनुमतीने अशाप्रकारे परिणामक केली जाऊ शकत नाही.

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ने त्याला प्राधिकृत केलेले नसताना "ख" च्या वतीने "ख" ची मालमत्ता असलेली चीजवस्तू ज्याच्या कब्जात आहे त्या "ग" कडून ती स्वाधीन करण्याची मागणी करतो. "ग" ने स्वाधीन करण्यास नकार दिला तर तो नुकसानभरपाईस दायी होईल अशारीतीने "ख" ही मागणी अनुमत करू शकत नाही.

(ख) "क" तीन महिन्यांच्या नोटिशीने समापित होणारा पट्टा "ख" कडून धारण करतो. "ग" ही प्राधिकृत न केलेली व्यक्ती "क" ला समापनाची नोटीस देते. नोटीस "क" वर बंधनकारक होईल अशारीतीने "ख " ती अनुमत करू शकत नाही.

**प्राधिकार परत घेणे**

प्राधिकरणाचे समापन.

**२०१.** प्रकर्त्याने आपला प्राधिकार परत घेतल्याने अथवा अभिकर्त्याने अभिकरणाच्या कामाचा त्याग केल्याने, अथवा अभिकरणाचे काम पूर्ण झाल्याने, प्रकर्ता किंवा अभिकर्ता मरण पावल्याने किंवा तो विकल मनाचा झाल्याने, अथवा दिवाळखोर ऋणकोंच्या ऋणमोचनासाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींअन्वये प्रकर्ता दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत झाल्याने अभिकरण समापित होते.

विषयवस्तूत अभिकर्त्याचा हितसंबंध असतो अशाबाबतीत अभिकरणाचे समापन.

**२०२.** जी अभिकरणाची विषयवस्तू आहे अशा मालमत्तेत अभिकर्त्याचा स्वतः चा हितसंबंध असतो अशाबाबतीत अभिकरण, व्यक्त संविदेच्या अभावी, अशा हितसंबंधाला बाधक होईल अशारीतीने समापित केले जाऊ शकत नाही.

**उदाहरणे**

(क) "क" आपली जमीन विकण्याचा आणि त्या उत्पन्नातून "क" कडून "ख" ला देय असलेल्या ऋणांची फेड करून घेण्याचा प्राधिकार देतो. "क" आपला प्राधिकार परत घेऊ शकत नाही किंवा त्याच्या भ्रमिष्टपणामुळे किंवा मृत्युमुळे तो समापित होऊ शकत नाही.

(ख) "क" ने "ख" ला कापसाच्या १,००० गासड्या पाठवल्या असून "ख" ने अशा कापसावर त्याला अग्रिमे दिलेली आहेत आणि "क" "ख" ला कापूस विकून त्या किमतीतून त्यांच्या स्वतः च्या अग्रिमाच्या रकमेची स्वतःला परतफेड घेण्यास सांगतो. "क" आपला प्राधिकार परत घेऊ शकत नाही अथवा त्याचा भ्रमिष्टपणा किंवा मृत्यू यामुळे तो समापितही होत नाही.

प्रकर्त्याला अभिकर्त्याचा प्राधिकार केव्हा परत घेता येईल.

**२०३.** अभिकर्त्याला दिलेला प्राधिकार प्रकर्त्याला बंधनकारक होईल अशारीतीने वापरला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी प्रकर्त्याला, निकटपूर्व कलमाने अन्य प्रकारची तरतूद केली असेल ते खेरीजकरून परत घेता येईल.

**२०४.** आपल्या अभिकर्त्याला दिलेला प्राधिकार अंशतः वापरला गेल्यानंतर, अभिकरणात आधीच केलेल्या कृतींतून उद्‌भवतात अशा कृती व आबंधने यांच्या संबंधापुरता, प्रकर्त्याला तो प्राधिकार परत घेता येणार नाही. **प्राधिकार अंशतः वापरला असेल अशाबाबतीतील परत घेणे.**

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला "क" च्या नावाने कापसाच्या १,००० गासड्या विकत घेण्यास आणि "ख" च्या हातात "क" चे जे पैसे असतील त्यातून त्याची किंमत देण्यास प्राधिकृत करतो. "ख" किमतीसाठी स्वतः जातीने दायी होईल अशारीतीने त्याच्या स्वतः च्या नावाने कापसाच्या १,००० गासड्या विकत घेतो. कापसाची किंमत देण्याच्या संबंधापुरता "क" "ख" चा प्राधिकार परत घेऊ शकत नाही.

(ख) "क" "ख" ला "क" च्या नावाने कापसाच्या १,००० गासड्या विकत घेण्यास आणि "ख" च्या हातात "क" चे जे पैसे असतील त्यातून त्याची किंमत देण्यास प्राधिकृत करतो. "ख" "क" च्या नावाने, आणि किमतीसाठी स्वतः जातीने दायी होणार नाही अशारीतीने कापसाच्या १,००० गासड्या विकत घेतो. कापसाची किंमत देण्याचा "ख" चा प्राधिकार "क" परत घेऊ शकतो.

**२०५.** जेथे अभिकरण काही कालावधीपर्यंत चालू ठेवावे अशी व्यक्त किंवा उपलक्षित संविदा केलेली असेल अशा प्रकरणात, त्याच्या अगोदरच पुरेशा कारणाशिवाय ते परत घेतले किंवा त्याचा त्याग केला तर त्याबाबत प्रकर्त्याने अभिकर्त्याला किंवा यथास्थिति अभिकर्त्याने प्रकर्त्याला नुकसानभरपाई दिली पाहिजे. **प्रकर्त्याने परत घेण्याबद्दल किंवा अभिकर्त्याने त्याग केल्याबद्दल नुकसानभरपाई.**

**२०६.** असे परत करणे किंवा त्याग करणे यांची वाजवी नोटीस दिली गेली पाहिजे, अन्यथा, प्रकर्त्याला किंवा यथास्थिति, अभिकर्त्याला याद्वारे झालेले नुकसान एकाने दुसऱ्याला भरून दिले पाहिजे. **परत घेण्याची किंवा त्याग करण्याची नोटीस.**

**२०७.** परत घेणे आणि त्याग करणे व्यक्त असू शकेल अथवा प्रकर्त्याच्या किंवा अभिकर्त्याच्या आपापल्या वर्तनात उपलक्षित असू शकेल. **परत घेणे आणि त्याग करणे व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.**

**उदाहरण**

"क" चे घर भाड्याने देण्यास "क" "ख" ला अधिकार प्रदान करतो. मागाहून "क" ते स्वतःच भाड्याने देतो. हे "ख" च्या प्राधिकाराचे उपलक्षित प्रत्याहरण आहे.

**२०८.** अभिकर्त्याच्या प्राधिकाराचे समापन, अभिकर्त्याच्या संबंधापुरते, ते त्याला माहीत होण्यापूर्वी किंवा त्रयस्थ व्यक्तींच्या संबंधापुरते, त्यांना माहीत होण्यापूर्वी परिणामक होत नाही. **अभिकर्त्याच्या प्राधिकाराचे समापन अभिकर्त्यापुरते व त्रयस्थ व्यक्तींपुरते केव्हा परिणामक होते.**

**उदाहरणे**

(क) "क" आपल्याकरता माल विकण्याचा "ख" ला निदेश देतो, आणि मालाच्या आलेल्या किमतीवर पाच टक्के अडत "ख" ला देण्याचा करार करतो. मागाहून "क" पत्राद्वारे "ख" चा प्राधिकार परत घेतो. "ख" पत्र पाठवण्यात आल्यानंतर, पण त्याला ते मिळण्यापूर्वी १०० रुपयांना माल विकतो. विक्री "क" वर बंधनकारक आहे, आणि "ख" त्याची अडत म्हणून पाच रुपयांस हक्कदार आहे.

(ख) मुंबईतील वखारीत असलेला काही कापूस, आपल्याकरता विकण्याचा "क" मद्रास येथून पत्राद्वारे "ख" ला निदेश देतो आणि मागाहून विक्री करण्याचा त्याचा प्राधिकार पत्राद्वारे परत घेतो व कापूस मद्रासला पाठवण्याचा "ख" ला निदेश देतो. "ख" दुसरे पत्र मिळाल्यानंतर ज्याला पहिल्या पत्राची माहिती आहे पण दुसऱ्या पत्राची नाही त्या "ग" बरोबर त्याला कापूस विकण्याची संविदा करतो. "ग" "ख" ला पैसे देतो, ते घेऊन "ख" फरारी होतो. "ग" चे प्रदान "क" पुरते सुयोग्य आहे.

(ग) "क" आपला अभिकर्ता "ख" यास, "ग" ला काही पैसे देण्याचा निदेश देतो. "क" मरण पावतो आणि "घ" त्याच्या मृत्युपत्राचे संप्रमाण मिळवतो, "ख" "क" च्या मृत्युनंतर, पण ते कळण्यापूर्वी "ग" ला पैसे देतो. प्रदान "घ" ह्या मृत्युपत्र व्यवस्थापकापुरते सुयोग्य आहे.

**२०९.** जेव्हा प्रकर्ता मरण पावल्यामुळे किंवा विकल मनाचा झाल्यामुळे अभिकरण समापित होते तेव्हा अभिकर्ता त्याच्यावर सोपवण्यात आलेल्या हितसंबंधांचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी त्याच्या भूतपूर्व प्रकर्त्याच्या प्रतिनिधींच्या वतीने सर्व वाजवी उपाययोजना करण्यास बांधलेला असतो. **प्रकर्त्याच्या मृत्युमुळे किंवा भ्रमिष्टपणा-मुळे अभिकरण समापित झाले असता अभिकर्त्याचे कर्तव्य.**

**उप-अभिकर्त्यांच्या प्राधिकाराचे समापन.** **२१०.** अभिकर्त्याच्या प्राधिकाराचे समापन त्याने नियुक्त केलेल्या सर्व उप अभिकर्त्यांच्या प्राधिकाराच्या समापनास (अभिकर्त्याच्या प्राधिकाराच्या समापनाविषयी यात अंतर्भूत असलेल्या नियमांना अधीन राहून) कारणीभूत होते.

**अभिकर्त्याचे प्रकर्त्याविषयीचे कर्तव्य**

**प्रकर्त्याच्या धंद्याचे चालन करताना अभिकर्त्याचे कर्तव्य.** **२११.** अभिकर्ता आपल्या प्रकर्त्याच्या धंद्याचे, प्रकर्त्याने दिलेल्या निदेशांनुसार अथवा अशा कोणत्याही निदेशांच्या अभावी, अभिकर्ता जेथे अशा धंद्याचे चालन करतो त्या ठिकाणी त्याच प्रकारचा धंदा करण्याची जी रूढी प्रचलित असेल तीनुसार चालन करण्यास बांधलेला असतो. जेव्हा अभिकर्ता अन्य प्रकाराचे वर्तन करतो तेव्हा, कोणताही तोटा झाल्यास त्याने तो प्रकर्त्याला भरून दिला पाहिजे आणि कोणताही नफा उपार्जित झाल्यास त्याने त्याचा हिशेब दिला पाहिजे.

**उदाहरणे**

(क) हातात असतील ते पैसे वेळोवेळी व्याजाने गुंतवण्याची रूढी ज्यात आहे तो धंदा "ख" साठी चालवण्याच्या कामासाठी नेमलेला "क" हा अभिकर्ता अशी गुंतवणूक करत नाही. "ख" ला अशा गुंतवणुकीमुळे सामान्यत: मिळणारे व्याज त्याला "क" ने भरून दिले पाहिजे.

(ख) ज्याच्या धंद्यात उधारीवर (पतीवर) विक्री करण्याची रूढी नाही असा "ख" हा दलाल "क" चा माल "ग" ला उधारीवर (पतीवर) विकतो, त्यावेळी त्याची "ग" ची पत खूप मोठी होती. "ग" पैसे देण्यापूर्वी दिवाळखोर होतो. "ख" ने "क" चा तोटा भरून दिला पाहिजे.

**अभिकर्त्याच्या बाबतीत आवश्यक असलेले कौशल्य व तत्परता.** **२१२.** प्रकर्त्याला अभिकर्त्याकडे कौशल्याची उणीव असल्याची जाणीव नसेल तर, धंद्याचे चालन सदृश कामात नेमलेल्या व्यक्तीकडे सर्वसाधारणत: जितके कौशल्य असते तितक्या कौशल्याने अभिकर्ता अभिकरणाच्या धंद्याचे चालन करण्यास बांधलेला आहे. अभिकर्ता तत्परतेने कार्य करण्यास आणि त्याच्याजवळ असेल तेवढे कौशल्य वापरण्यास, आणि स्वत: त्याच्याकडून झालेला हलगर्जीपणा, कौशल्याची उणीव किंवा गैरचालन यांच्या प्रत्यक्ष परिणामांबाबत, आपल्या प्रकर्त्याला भरपाई देण्यास बांधलेला आहे, पण असा हलगर्जीपणा, कौशल्याची उणीव किंवा गैरचालन यामुळे अप्रत्यक्षपणे किंवा दूरत्वाने झालेल्या तोट्याच्या किंवा नुकसानाच्या बाबतीत अशाप्रकारे बांधलेला असणार नाही.

**उदाहरणे**

(क) "क" या कलकत्त्यातील व्यापाऱ्याचा "ख" हा लंडनमधील अभिकर्ता असून त्याला "क" च्या खाती काही पैशांची रक्कम, ती त्याच्याकडे पाठवण्याचा आदेश देऊन, देण्यात आली आहे. "ख" बराच काळ पैसे ठेवून घेतो. पैसे न मिळाल्याचा परिणाम म्हणून "क" दिवाळखोर होतो. "ख" चे दायित्व, ते पैसे व ज्या दिवशी ते पैसे द्यावयास हवे होते तेव्हापासून, नेहमीच्या दराने व्याज आणि आणखी कोणताही प्रत्यक्ष तोटा उदा. विनिमय दरातील बदलामुळे होणारा- यांच्यापुरते आहे, पण त्याच्या पलीकडे नाही.

(ख) उधारीवर (पतीवर) माल विकण्याचा प्राधिकार असलेला "क" हा मालाच्या विक्रीचा अभिकर्ता "ख" ज्या पतदारीबाबत योग्य ती व नेहमीची चौकशी न करता "ख" ला विक्री करतो. "ख" अशा विक्रीच्या वेळी दिवाळखोर असतो. त्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या कोणत्याही तोट्याबद्दल "क" ने आपल्या प्रकर्त्याला भरपाई दिली पाहिजे.

(ग) जहाजाचा विमा उतरविण्यासाठी "ख" ने नेमलेला "क" हा विमादलाल विमापत्रात नेहमीचे खंड घातलेले आहेत की नाहीत हे पाहात नाही. त्यानंतर जहाज नाहीसे होते. खंड वगळल्यामुळे परिणामी हमीदारांकडून काहीही वसूल केले जाऊ शकत नाही. "क" "ख" ला हानी भरून देण्यास बांधलेला आहे.

(घ) "क" हा इंग्लंडमधील व्यापारी, ज्याने अभिकरण स्वीकारले त्या आपल्या "ख" या मुंबईतील अभिकर्त्याला आपणास विवक्षित जहाजाने कापसाच्या १०० गासड्या पाठवण्याचा निदेश देतो. कापूस पाठवणे "ख" च्या अधिकारात असूनही तो तसे करत नाही. जहाज इंग्लंडला सुरक्षित येते. जहाजाच्या आगमनानंतर लवकरच कापसाचा भाव वाढतो. जहाज आले त्यावेळी कापसाच्या १०० गासड्यांवर "क" ने जो नफा मिळवला असता तो त्याला भरून देण्यास "ख"बांधलेला आहे, पण नंतरच्या भाववाढीमुळे त्याला झाला असता अशा कोणत्याही नफ्यासाठी बांधलेला नाही.

**अभिकर्त्याचे हिशेब.** **२१३.** अभिकर्ता मागणी होताच योग्य ते हिशेब प्रकर्त्याला देण्यास बांधलेला आहे.

**प्रकर्त्याशी संपर्क साधण्याचे अभिकर्त्याचे कर्तव्य.** **२१४.** अडचणीच्या प्रकरणी आपल्या प्रकर्त्याशी संपर्क साधण्याच्या आणि त्याचे अनुदेश मिळवण्याचा प्रयत्न करण्याच्या कामी शक्य तितक्या वाजवी तत्परतेने वागणे हे अभिकर्त्याचे कर्तव्य आहे.

**२१५.** जर अभिकर्त्याने अभिकरणाच्या धंद्यामध्ये प्रकर्त्याची प्रथम संमती न घेता आणि त्या विषयाबद्दल त्याला स्वत:ला माहीत झाली असतील अशा सर्व महत्वाच्या तथ्यांची प्रकर्त्याला माहिती करून न देता, स्वत:च्या फायद्यासाठी व्यवहार केला तर प्रकर्त्याला, आपल्यापासून अभिकर्त्याने कोणतेही महत्वाचे तथ्य अप्रामाणिकपणे लपविले आहे किंवा आपणास अभिकर्त्याचे व्यवहार गैरफायदेशीर झालेले आहेत असे ते प्रकरण दर्शवील तर तो संव्यवहार नाकारता येईल. **अभिकरणाच्या धंद्यात प्रकर्त्याच्या संमतीशिवाय अभिकर्ता त्याच्या स्वत:च्या फायद्यासाठी व्यवहार करतो अशाबाबतीत प्रकर्त्याचा हक्क.**

**उदाहरणे**

(क) "क" ची संपत्ती विकण्याचा निदेश "क" "ख" ला देतो. "ख" स्वतः साठी "ग" च्या नावाने ती संपत्ती विकत घेतो "ख" ने स्वत:साठी संपत्ती विकत घेतली आहे असे "क" च्या नजरेस आल्यावर आपल्यापासून "ख" ने अप्रामाणिकपणे कोणतेही महत्वाचे तथ्य लपवले आहे किंवा आपणास ती विक्री गैरफायदेशीर झाली आहे असे "क" दाखवू शकला तर त्याला विक्री नाकारता येईल.

(ख) "क" ची संपदा विकण्याचा निदेश "क" "ख" ला देतो. संपदा विकण्यापूर्वी संपदेची पाहणी करताना, संपदेत "क" ला अज्ञात असलेली एक खाण "ख" ला सापडते. ती संपदा स्वत:साठी विकत घेण्याची आपली इच्छा आहे असे "ख" "क" ला कळवतो. पण खाणीचा शोध लागल्याचे त्याच्यापासून लपवतो. खाणीच्या अस्तित्वाची माहिती नसल्यामुळे "क" "ख" ला संपदा विकत घेऊ देतो. "ख" ने ज्यावेळी संपदा विकत घेतली त्यावेळी त्याला खाण असल्याचे माहीत होते हे नजरेस आल्यावर "क" ला स्वविकल्पानुसार विक्री नाकारता येईल किंवा अंगीकार करता येईल.

**२१६.** जर अभिकर्ता अभिकरणाच्या धंद्यातील व्यवहार आपल्या प्रकर्त्याच्या फायद्यासाठी करण्याऐवजी आपल्या प्रकर्त्याच्या नकळत स्वतः होऊन करील तर अभिकर्त्याला त्या संव्यवहारातून निष्पन्न झाला असेल अशा कोणत्याही लाभाची त्याच्याकडून मागणी करण्यास प्रकर्ता हक्कदार असेल. **अभिकरणाच्या धंद्यात स्वत: फायद्यासाठी व्यवहार करत असताना अभिकर्त्याने मिळवलेल्या लाभावर प्रकर्त्याचा हक्क.**

**उदाहरण**

"क" त्याच्यासाठी एक विवक्षित घर विकत घेण्याचा "ख" या आपल्या अभिकर्त्याला निदेश देतो. ते घर विकत घेता येत नाही असे "ख" "क" ला सांगतो आणि स्वत:साठी ते विकत घेतो. "ख" ने ते घर विकत घेतल्याचे नजरेस आल्यावर "ख" ने त्याबद्दल जी किंमत दिली असेल त्या किंमतीस ते "क" ला विकण्यास "क" "ख" ला भाग पाडू शकेल.

**२१७.** अभिकरणाच्या धंद्यात प्रकर्त्यासाठी मिळालेल्या कोणत्याही रकमांमधून अभिकर्त्याला, अशा धंद्याचे चालन करताना त्याने दिलेली अग्रिमे किंवा त्याला योग्यरीत्या आलेले खर्च यांच्याबाबत स्वत:ला देय असलेले सर्व पैसे आणि अभिकर्ता म्हणून कृती केल्याबद्दल त्याला प्रदेय होईल असे पारिश्रमिकही अडवून ठेवता येईल. **प्रकर्त्यासाठी मिळालेल्या रकमांमधून अडवून ठेवण्याचा हक्क.**

**२१८.** प्रकर्त्यासाठी मिळालेल्या सर्व रकमांचा अशा वजाती करून त्याला भरणा करण्यास अभिकर्ता बांधलेला आहे. **प्रकर्त्याकरता मिळालेल्या रकमांचा भरणा करण्याचे अभिकर्त्याचे कर्तव्य.**

**२१९.** कोणत्याही विशेष संविदेच्या अभावी कोणत्याही पालनाबद्दलचे पैसे अशी कृती पूर्ण होईपर्यंत अभिकर्त्याला देय होत नाहीत मात्र विक्रीसाठी अभिकर्त्याकडे दिलेला संपूर्ण माल विकला गेलेला नसला किंवा विक्री वस्तुतः पूर्ण झालेली नसली तरी, विकलेल्या मालादाखल त्याला मिळालेले पैसे त्याला अडवून ठेवता येतील. **अभिकर्त्याचे पारिश्रमिक केव्हा देय होते.**

**२२०.** जो अभिकर्ता अभिकरणाच्या धंद्याचे चुकीच्या पद्धतीने चालन केल्याबद्दल दोषी असेल तो धंद्याच्या ज्या भागाचे त्याने चुकीचे पालन केले असेल त्याच्याबद्दल कोणत्याही पारिश्रमिकास हक्कदार असणार नाही. **गैरचालित धंद्याबद्दल अभिकर्ता पारिश्रमिकास हक्कदार नसतो.**

**उदाहरणे**

(क) "ग" कडून १,००,००० रुपये वसूल करण्यासाठी आणि त्याची सुयोग्य प्रतिभूतीवर गुंतवणूक करण्यासाठी "क" "ख" ला नेमतो. "ख" १,००,००० रुपये वसूल करतो आणि त्यातील ९०,००० रुपये सुयोग्य प्रतिभूतीवर गुंतवतो पण जी प्रतिभूती वाईट असल्याचे त्याला माहीत असायला हवे होते तिच्यावर तो, १०,००० रुपये खर्च करतो व त्यामुळे "क" २,००० रुपये गमावतो. १,००,००० रुपये वसूल केल्याबद्दल आणि ९०,००० रुपये गुंतवल्याबद्दल "ख" पारिश्रमिकास हक्कदार आहे. १०,००० रुपये गुंतवल्याबद्दल तो कोणत्याही पारिश्रमिकास हक्कदार नाही आणि त्याने "ख" ला २,००० रुपयांची भरपाई केली पाहिजे.

(ख) "ग" कडून १,००० रुपये वसूल करण्यासाठी "क" "ख" ला नेमतो. "ख" च्या चुकीच्या चालनामुळे पैसा वसूल होत नाही. "ख" त्याच्या सेवेबद्दल कोणत्याही पारिश्रमिकास हक्कदार नाही, आणि त्याने तोटा भरून दिला पाहिजे.

**प्रकर्त्याच्या मालमत्तेवर अभिकर्त्याचा धारणाधिकार.**

**२२१.** कोणत्याही तद्‌विरुद्ध संविदेच्या अभावी, अभिकर्ता त्याला मिळालेला प्रकर्त्याचा माल, कागदपत्र आणि अन्य मालमत्ता ती जंगम असो वा स्थावर असो त्यांच्याबाबत स्वत:स अडत, संवितरणे व सेवा यांच्या दाखल देय असलेली रक्कम त्याला दिली जाईपर्यंत किंवा तिचा हिशेब दिला जाईपर्यंत अडवून ठेवण्यास हक्कदार आहे.

## अभिकर्त्याविषयीचे प्रकर्त्याचे कर्तव्य

**कायदेशीर कृतींच्या परिणामाबाबत अभिकर्त्याची क्षतिपूर्ती करावयाची.**

**२२२.** अभिकर्त्याला प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करून केलेल्या सर्व कायदेशीर कृतींच्या परिणामाबाबत त्याची क्षतिपूर्ती करण्यास अशा अभिकर्त्याचा नियोक्ता बांधलेला आहे.

### उदाहरणे

(क) कलकत्यात असलेल्या "क" कडून मिळालेल्या अनुदेशांनुसार "ख" सिंगापूर येथे "ग" शी त्याला विवक्षित माल स्वाधीन करण्याची संविदा करतो. "क" "ख" ला माल पाठवत नाही आणि "ग" संविदा भंगाबद्दल "ख" विरुद्ध दावा लावतो. "ख" "क" ला दावा आणला गेल्याचे कळवतो आणि "क" त्याला दाव्यात बचाव देण्यास प्राधिकृत करतो. "ख" दाव्यात बचाव देतो आणि त्याला नुकसानभरपाई परिव्यय देणे भाग पडते व खर्च करावा लागतो. अशी नुकसानभरपाई, परिव्यय व खर्च यांबद्दल "क" "ख" ला दायी आहे.

(ख) "ख" हा कलकत्यातील दलाल, तेथील "क" या व्यापाऱ्याच्या आदेशांनुसार "क" साठी तेलाची १० पिंपे खरेदी करण्याची "ग" बरोबर संविदा करतो. नंतर "क" तेल घेण्यास नकार देतो आणि "ग" "ख" विरुद्ध दावा लावतो. "ख" "क" ला कळवतो, "क" संविदा संपूर्णपणे नाकारतो. "ख" बचाव देतो पण अयशस्वी होतो आणि त्याला नुकसानभरपाई व परिव्यय द्यावा लागतो व खर्च करावा लागतो. अशी नुकसानभरपाई परिव्यय व खर्च यांबद्दल "ख" ला दायी आहे.

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीच्या परिणामांबाबत अभिकर्त्याची क्षतिपूर्ती.**

**२२३.** जेथे एक व्यक्ती दुसऱ्याला एखादी कृती करण्यासाठी नेमते आणि अभिकर्ता ती कृती सद्‌भावपूर्वक करतो तरी त्या कृतीमुळे त्रयस्थ व्यक्तीच्या हक्काला हानी पोचली असल्याने कृतीच्या परिणामांबाबत अभिकर्त्याची क्षतिपूर्ती करण्यास नियोक्ता बांधलेला असतो.

### उदाहरणे

(क) "ख" च्या मालावर बजावणी करण्यास हक्कदार असलेला हुकूमनामाधारक "क" न्यायालयाच्या अधिकाऱ्याला विवक्षित माल हा "ख" चा माल आहे असे अभिवेदन करून त्यांचे अभिग्रहण करण्याची मागणी करतो. अधिकारी मालाचे अभिग्रहण करतो आणि मालाचा खरा मालक "ग" त्याच्यावर दावा आणतो. "क" च्या निदेशांचे पालन केल्यामुळे परिणामी अधिकाऱ्याला जी रक्कम "ग" कडे भरावी लागली तिच्याबद्दल अधिकाऱ्यांची क्षतिपूर्ती करण्यास "क" दायी आहे.

(ख) "क" च्या कब्जात असलेला माल "ख" "क" च्या विनंतीवरून विकतो. पण त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार "क" ला नव्हता. "ख" ला हे माहीत नाही आणि तो विक्रीचे उत्पन्न "क" च्या स्वाधीन करतो. नंतर मालाचा खरा मालक "ग" "ख" वर आपला दावा लावतो आणि मालाचे मूल्य व परिव्यय वसूल करतो. "ग" ला जे देणे "ख" ला भाग पडले त्याबद्दल आणि "ख" च्या स्वत:च्या खर्चाबद्दल "क" त्याला क्षतिपूर्ती करण्यास दायी आहे.

**गुन्हेगारी कृतीमध्ये अभिकर्त्यासाठी नियोक्ता दायी नसणे.**

**२२४.** एक व्यक्ती जे गुन्हेगारीचे आहे असे कृत्य करण्यासाठी दुसऱ्याला नेमतो अशाबाबतीत त्या कृत्याच्या परिणामांबाबत अभिकर्त्याची क्षतिपूर्ती करण्यास नियोक्ता व्यक्त किंवा उपलक्षित वचनाने दायी नसतो.[१]

### उदाहरणे

(क) "ग" ला मारहाण करण्यासाठी "क" "ख" ला नेमतो आणि त्या कृतीच्या सर्व परिणामांबाबत त्याची क्षतिपूर्ती करण्याचा करार करतो. तदनंतर "ख" "ग" ला मारहाण करतो आणि त्याला तसे केल्याबद्दल "ग" ला नुकसानी द्यावी लागते. "क" "ख" ला नुकसानीबद्दल क्षतिपूर्ती करण्यास दायी नाही.

(ख) "ख" हा एक वृत्तपत्राचा मालक "क" च्या विनंतीवरून वृत्तपत्रात "ग" बद्दल अपलेख प्रकाशित करतो आणि "क" प्रकाशनाच्या परिणामांबाबत आणि त्याबाबतच्या कोणत्याही कारवाईतील खर्च व नुकसानी यांबाबत "ख" ची क्षतिपूर्ती करण्याचा करार करतो. "ग" "ख" विरुद्ध दावा आणतो आणि त्याला नुकसानी द्यावी लागते व खर्चही होतो. "क" "ख" ला दायी होत नाही.

---

१. मागील कलम २४ पहा.

**२२५.** प्रकर्त्याने केलेला हलगर्जीपणा किंवा त्याच्या कौशल्यातील उणीव यांमुळे त्याच्या अभिकर्त्याला झालेल्या [१]क्षतीबद्दल प्रकर्त्याने अशा अभिकर्त्याला भरपाई दिली पाहिजे. **प्रकर्त्याच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या क्षतीबद्दल अभिकर्त्याला भरपाई.**

**उदाहरण**

घरबांधणीच्या कामी "क" "ख" ला गवंडी म्हणून नेमतो आणि स्वत: परांची उभारतो. ती अकुशलपणे उभारली जाते व परिणामी "ख" जखमी होतो. "क" ने "ख" ला भरपाई दिली पाहिजे.

**त्रयस्थ व्यक्तींशी केलेल्या संविदावर अभिकरणाचा प्रस्ताव**

**२२६.** अभिकर्त्यामार्फत केलेल्या संविदांची व अभिकर्त्याने केलेल्या कृतींमधून उद्‌भवणाऱ्या आबंधनांची अंमलबजावणी त्या संविदा व त्या कृती जणू काही प्रकर्त्याने जातीने केलेल्या होत्या अशा प्रकारे, त्याच रीतीने करता येईल व त्यांना तेच वैध परिणाम असतील. **अभिकर्त्याच्या संविदा अंमलात आणणे व परिणाम.**

**उदाहरणे**

(क) "ख" मालाच्या विक्रीकरता अभिकर्ता आहे हे माहीत असताना पण प्रकर्ता कोण आहे हे माहीत नसताना "क" त्याच्याकडून माल विकत घेतो. "ख" चा प्रकर्ता हा "क" कडून मालाच्या किंमतीची मागणी करण्यास हक्कदार असलेली व्यक्ती आहे व प्रकर्त्याने लावलेल्या दाव्यात "क"ला देय असलेल्या ऋणाबरोबर त्या हक्क मागणीची वजावट करू शकत नाही.

(ख) "क" हा "ख" च्या वतीने पैसे स्वीकारण्याचा प्राधिकार असलेला त्याचा अभिकर्ता असून "ग" कडून "ख" ला देय असलेली काही पैशांची रक्कम "ग" कडून स्वीकारतो. प्रस्तुत रक्कम "ख" ला देण्याच्या आपल्या आबंधनातून "ग" ची विमुक्ती होते.

**२२७.** अभिकर्ता जे करण्यास प्राधिकृत असेल त्यापेक्षा अधिक असे काही जेव्हा करतो आणि तो जे काही करतो त्याचा त्याच्या प्राधिकारात असलेला भाग त्याच्या प्राधिकारापलिकडे असलेल्या भागापासून पृथक करणे शक्य असते तेव्हा, तो जे करतो त्यापैकी जेवढे त्याच्या प्राधिकारात आहे तेवढेच तो व त्याचा प्रकर्ता यांच्या दरम्यान बंधनकारक आहे. **जेव्हा अभिकर्ता प्राधिकाराला अतिक्रम करतो तेव्हा प्रकर्ता कोठवर बांधलेला असतो.**

**उदाहरण**

"क" जहाजाचा व जहाजी मालाचा मालक असून जहाजाचे ४,००० रुपयाचे विमापत्र मिळवण्यास "ख" ला प्राधिकृत करतो. "ख" जहाजाचे ४,००० रुपयाचे आणि तेवढ्याच रकमेचे जहाजी मालाचे विमापत्र मिळवतो. "क" जहाजाच्या विमापत्रानुसार अधिमूल्य देण्यास बांधलेला आहे, पण जहाजी मालाच्या विमापत्रानुसार अधिमूल्य देण्यास बांधलेला नाही.

**२२८.** अभिकर्ता जे करण्यास प्राधिकृत असेल त्याहून अधिक असे काही तो जेव्हा करतो आणि त्याच्या प्राधिकाराच्या व्याप्तीबाहेर जे काही तो करतो ते या व्याप्तीत आहे त्यापासून पृथक करता येणे शक्य नाही तेथे प्रकर्ता त्या संव्यवहारास मान्यता देण्यास बांधलेला नाही. **जेव्हा अभिकर्त्याच्या प्राधिकाराचा अतिक्रम पृथक करता येण्यासारखा नसतो तेव्हा प्रकर्ता बांधलेला नाही.**

**उदाहरण**

"क" त्याच्यासाठी ५०० मेंढ्या विकत घेण्यास "ख" ला प्राधिकृत करतो. "ख" ५०० मेंढ्या आणि २०० कोकरे ६,००० रुपयाला एकरकमी विकत घेतो. "क" ला संपूर्ण संव्यवहार नाकारता येईल.

**२२९.** अभिकर्त्याला दिलेल्या कोणत्याही नोटिशीला किंवा त्याने मिळवलेल्या कोणत्याही माहितीला, जर ती त्याने प्रकर्त्याकरता केलेल्या संव्यवहाराच्या ओघात दिलेली किंवा मिळवलेली असती तर, प्रकर्ता व त्रयस्थ व्यक्ती यांच्या दरम्यान जणू काही ती प्रकर्त्याने दिलेली किंवा मिळवलेली होती अशा प्रकारे, तेच वैध परिणाम असतील. **अभिकर्त्याला दिलेल्या नोटिशीचे परिणाम.**

**उदाहरणे**

(क) "क" ज्याचा दृश्यमान मालक आहे तो विवक्षित माल "ग" कडून विकत घेण्यास "ख" ने "क" ला नेमले आहे आणि तो तदनुसार खरेदी करतो. विक्रीच्या वाटाघाटीच्या ओघात, तो माल खरोखरी "घ" च्या मालकीचा आहे असे "क" ला समजते, पण "ख" त्या तथ्याबाबत अनभिज्ञ आहे. "ख" त्याला "ग" कडून येणे असलेल्या ऋणाची मालाच्या किंमतीशी वजावट करण्यास हक्कदार नाही.

---

१. घातक अपघात अधिनियम, १८५५ (१८५५ चा १३) याच्याशी तुलना करा.

(ख) "ग" ज्याचा दृश्यमान मालक आहे तो माल "ग" कडून विकत घेण्यास "ख" ने "क" ला नेमले आहे. "क" याप्रमाणे त्याची नेमणूक होण्यापूर्वी "ग" चा नोकर होता व माल खरोखरी "घ"च्या मालकीचा आहे हे त्याला त्यावेळी समजले होते, पण "ख" त्या तथ्याबाबत अनभिज्ञ आहे. त्याच्या अभिकर्त्याला ते माहीत असले तरी "ख" ला "ग" कडून त्याला येणे असलेल्या ऋणाची मालाच्या किंमतीशी वजावट करता येईल.

**प्रकर्त्याच्या वतीने केलेल्या संविदा अभिकर्ता जातीने अंमलात आणू शकत नाही किंवा त्याद्वारे बांधला जाऊ शकत नाही.**

**२३०.** तशा आशयाच्या कोणत्याही संविदेच्या अभावी, अभिकर्ता, त्याने प्रकर्त्याच्या वतीने केलेल्या संविदा जातीने अंमलात आणू शकत नाही किंवा त्यांद्वारे जातीने बांधला जात नाही.

**तद्विरुद्ध संविदा असल्याचे गृहीतक.**

पुढील प्रकरणी अशी संविदा अस्तित्वात असल्याचे गृहीत धरले जाईल :---

(१) अभिकर्त्याने मालाच्या विक्रीची किंवा खरेदीची संविदा विदेशवासी व्यापाऱ्याकरता केलेली असेल अशाबाबतीत ;

(२) अभिकर्ता आपल्या प्रकर्त्याचे नाव उघड करत नाही अशाबाबतीत ;

(३) प्रकर्ता उघड केलेला असला तरी, त्याच्यावर दावा करता येऊ शकत नाही अशाबाबतीत.

**उघड न केलेल्या अभिकर्त्याने केलेल्या संविदेतील पक्षकारांचे अधिकार.**

**२३१.** जर अभिकर्त्याने जिला ती अभिकर्ता असल्याचे माहीत नसेल किंवा तशी शंका घेण्यास कारण नसेल अशा व्यक्तीशी संविदा केली तर, तिच्या प्रकर्त्याला संविदा पालनाची मागणी करता येईल ; मात्र अभिकर्ता हा प्रकर्ता असता तर, संविदेतील अन्य पक्षकाराला अभिकर्त्याविरुद्ध जे अधिकार मिळाले असते, तेच अधिकार त्याला प्रकर्त्याविरुद्ध असतात.

संविदेची पूर्ती होण्यापूर्वी प्रकर्त्याने स्वतःला उघड केल्यास, संविदेतील अन्य पक्षकार, संविदेतील प्रकर्ता कोण आहे हे आपल्याला अन्य पक्षकाराला माहीत असते तर, किंवा अभिकर्ता हा प्रकर्ता नाही हे आपल्याला माहीत असते तर, आपण संविदा केली नसती असे दाखवू शकल्यास ; त्याला संविदेची पूर्तता करण्यास नकार देता येईल.

**प्रकर्ता समजला गेलेल्या अभिकर्त्याशी केलेल्या संविदेचे पालन.**

**२३२.** जेथे एक मनुष्य दुसऱ्याशी तो दुसरा मनुष्य अभिकर्ता आहे हे माहीत नसताना किंवा तशी शंका घेण्यास सयुक्तिक कारण नसताना संविदा करतो तेथे, प्रकर्त्याने संविदेच्या पालनाची मागणी केल्यास तो, अभिकर्ता व संविदेतील अन्य पक्षकार यांमधील विद्यमान अधिकारांच्या आबंधनांच्या अधीनतेनेच असे पालन करून घेऊ शकतो.

**उदाहरण**

"क" "ख" चे ५०० रुपये देणे लागतो. तो "ख" ला १,००० रुपये किंमतीचा तांदूळ विकतो. त्या संव्यवहारात "क" हा "ग" चा अभिकर्ता म्हणून कार्य करीत आहे, पण वस्तुस्थिती अशी आहे हे "ख" ला माहीत नाही किंवा तशी शंका घेण्यास त्याला सयुक्तिक कारणही नाही. "क" "ख" ला "क" च्या ऋणाची वजावट करण्याची मुभा दिल्याशिवाय तांदूळ घेण्यास भाग पाडू शकत नाही.

**जातीने दायी असलेल्या अभिकर्त्याशी व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचा हक्क.**

**२३३.** जेथे अभिकर्ता जातीने दायी असतो अशा प्रकरणात, त्याच्याशी व्यवहार करणारी व्यक्ती एकतर त्याला किंवा त्याच्या प्रकर्त्याला किंवा त्या दोघांनाही दायी धरू शकेल.

**उदाहरण**

"क" "ख" शी त्याला कापसाच्या १०० गासड्या विकत देण्याची संविदा करतो आणि नंतर "ख" "ग" चा अभिकर्ता म्हणून कार्य करत असल्याचे त्याला आढळून येते. कापसाच्या किंमतीसाठी "क" ला "ख" वर किंवा "ग" वर किंवा दोघांवरही दावा आणता येईल.

**प्रकर्ता किंवा अभिकर्ता यालाच केवळ दायी धरला जाईल या विश्वासावर कार्य करण्यास अभिकर्त्याला किंवा प्रकर्त्याला प्रवृत्त करण्याचे परिणाम.**

**२३४.** जिने अभिकर्त्याशी संविदा केलेली आहे ती व्यक्ती जेव्हा, केवळ प्रकर्ता दायी धरला जाईल या विश्वासावर कार्य करण्यास अभिकर्त्याला प्रवृत्त करते, किंवा केवळ अभिकर्ताच दायी धरला जाईल या विश्वासावर कार्य करण्यास प्रकर्त्याला प्रवृत्त करते तेव्हा ती मागाहून अनुक्रमे अभिकर्त्यास किंवा प्रकर्त्यास दायी धरू शकत नाही.

**२३५.** आपण दुसऱ्याचा प्राधिकृत अभिकर्ता असल्याचे असत्यपणे अभिवेदन करणारी व त्याद्वारे, त्रयस्थ व्यक्तीला असा अभिकर्ता म्हणून आपल्याशी व्यवहार करण्यास प्रवृत्त करणारी व्यक्ती, जर तिच्या अभिकथित नियोक्त्याने तिच्या कृतींना अनुमती दिली नाही तर, दुसऱ्याने याप्रमाणे व्यवहार केल्यामुळे त्याला होईल अशा कोणत्याही हानीच्या किंवा नुकसानाच्याबाबत त्याला भरपाई देण्यास दायी असते. **बनावट अभिकर्त्याचे दायित्व.**

**२३६.** ज्या व्यक्तीशी तिच्या अभिकर्ता या भूमिकेनुसार संविदा करण्यात आली असेल ती, जर तिने वस्तुतः अभिकर्ता म्हणून नव्हे तर स्वतःच्या फायद्यासाठी केले असेल तर, संविदेच्या पालनाची मागणी करण्यास हक्कदार नसते. **अभिकर्ता म्हणून खोटेपणाने संविदा करणारी व्यक्ती पालनास हक्कदार नाही.**

**२३७.** जेव्हा अभिकर्त्याने प्राधिकाराशिवाय आपल्या प्रकर्त्याच्या वतीने कृती केल्या असतील किंवा त्रयस्थ व्यक्तींची आबंधने ओढवून घेतली असतील तेव्हा, जर, प्रकर्त्याने अशा कृती अभिकर्त्याच्या प्राधिकाराच्या व्याप्तीत होत्या असा समज करून घेण्यास त्रयस्थ व्यक्तींना आपल्या शब्दांद्वारे किंवा वर्तनाद्वारे प्रवृत्त केले असेल तर, प्रकर्ता अशा कृतींनी किंवा आबंधनांनी बांधलेला असतो. **अभिकर्त्याच्या अप्राधिकृत असलेल्या कृती प्राधिकृत होत्या असा समज निर्माण करणाऱ्या प्रकर्त्याचे दायित्व.**

**उदाहरणे**

(क) "क" "ख" ला विक्रीसाठी माल प्रेषित करतो आणि निश्चित केलेल्या पेक्षा कमी किंमतीला विक्री न करण्याची त्याला सूचना देतो. "ख" च्या सूचना माहीत नसताना "ग" "ख"शी राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीला माल विकत घेण्याची संविदा करतो. "क" संविदेने बांधलेला आहे.

(ख) "क" "ख"कडे पृष्ठांकन केलेले परक्राम्य संलेख सोपवतो. "क"च्या खाजगी आदेशांचे व्यतिक्रमण करून "ख" ते "ग" ला विकतो विक्री सुयोग्य आहे.

**२३८.** आपल्या प्रकर्त्याकरता आपले काम करण्याच्या ओघात अभिकर्त्यांनी केलेल्या विपर्यासांचा किंवा लबाडीचा अशा अभिकर्त्यांनी केलेल्या करारांवर जणू काही विपर्यास किंवा लबाडी प्रकर्त्यांनी केलेली होती त्याप्रमाणेच परिणाम होतो, पण त्यांच्या प्राधिकारात येत नाहीत त्या बाबींमध्ये अभिकर्त्यांनी केलेले विपर्यास किंवा लबाडी त्यांच्या प्रकर्त्यावर परिणाम करत नाही. **अभिकर्त्याने केलेल्या विपर्यासाचा किंवा लबाडीचा करारावर परिणाम.**

**उदाहरणे**

(क) "क" मालविक्रीसाठी "ख" चा अभिकर्ता असताना जो विपर्यास करण्यास "ख" ने त्याला प्राधिकृत केले नव्हते त्याद्वारे "ग"ला तो माल विकत घेण्यास तो प्रवृत्त करतो. संविदा "ख" व "ग" यांच्या दरम्यान "ग" च्या विकल्पानुसार शून्यकरणीय आहे.

(ख) "ख" च्या जहाजाचा कप्तान "क" भरणपत्रांमध्ये नमूद केलेला माल जहाजावर मिळाला नसताना तो स्वाक्षरित करतो. "ख" व बनावट प्रेषक यांच्या दरम्यान भरणपत्रे शून्यवत आहेत.

प्रकरण अकरा

(भागीदाराविषयी) "भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२" (१९३२ चा ९) कलम ७३ व अनुसूची दोन यांद्वारे निरसित.

**अनुसूची.—** (अधिनियमिती निरसित) "निरसन व विशोधन अधिनियम, १९१४" (१९१४ चा १०) कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे निरसित.

# भारतीय संविदा अधिनियम, १८७२

# The Indian Contract Act, 1872

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| baialed good | निक्षेपित माल | [ sec. 150] |
| bailee | निक्षेपग्राही | [ sec. 148 ] |
| bailment | निक्षेप | [ sec. 148] |
| bailment of pledge | तारणरूप निक्षेप | [ sec. 172] |
| bailor | निक्षेपक | [ sec. 148] |
| breach of contract | संविदा भंग | [ sec. 74] |
| coercion | जबरदस्ती | [ sec. 15] |
| communication | संसूचना | [ sec. 1] |
| consent | संमती | [ sec. 13] |
| consideration | प्रतिफल | [ sec. 2(d)] |
| consideration for guarantee | हमीसाठी प्रतिफल | [ sec. 126] |
| consideration for the promise | वचनाचे प्रतिफल | [ sec. 2(d)] |
| consign | प्रेषण मालपाठवणी | [ sec. 42] |
| co-sureties | सहप्रतिभू | [ sec. 13] |
| contingent contract | समाश्रित संविदा | [ sec. 31] |
| continuing guarantee | अविरत हमी | [ sec. 129] |
| contract | संविदा | [ sec. 1] |
| contract of guarantee | हमी संविदा | [ sec. 127] |
| contract of indemnity | क्षतिपूर्ती संविदा | [ sec. 124] |
| devolution | प्रक्रांती | [ sec. 45] |
| devolution of joint liabilities | संयुक्त दायित्वांची प्रक्रांती | [ sec. 42] |
| devolution of joint right | संयुक्त अधिकारांची प्रक्रांती | [ sec. 45] |
| engagement | अभिसंकेत | [ sec. 46] |
| froud | लबाडी | [ sec. 17] |
| free consent | मुक्त समंती | [ sec. 14] |
| implied promise | उपलक्षित वचन | [ sec. 145] |
| impossible act | अशक्य कृती | [ sec. 56] |
| indebted | ऋणी | [ sec. 16(3)(c)] |
| indemnity holder | क्षतिपूर्तीधारक | [ sec. 125] |
| inferred | अनुमानित | [ sec. 187] |
| misrepresentation | विपर्यास | [ sec. 18] |
| obligation | आबंधन | [ sec. 37] |
| offer | प्रविदा | [ sec. 38] |
| offer of performance | पालनाची प्रविदा | [ sec. 38] |
| pawnee | तारणधारक | [ sec. 172] |

| | | |
|---|---|---|
| pawnor | तारणकार | [ sec. 172] |
| performance of reciprocal promises | अन्योन्य वचनाचे पालन | [ sec. 51] |
| pledge | तारण | [ sec. 172] |
| principal | प्रकर्ता | [ sec. 182] |
| principal debtor and creditor | मुख्य ऋणको व धनको | [ sec. 126] |
| promisee | वचनग्रहीता | [ sec. 2(c)] |
| promisor | वचनदाता | [ sec. 2(c)] |
| retification | अनुमती | [ sec. 196] |
| renumciation | त्याग करणे | [ sec. 45] |
| repudiate | नाकारणे | [ sec. 15] |
| rescission of voidable contract | शुन्यकरणीय संविदेचे विखंडन | [ sec. 66] |
| retainer | अडवून ठेवण्आचा हक्क | [ sec. 217] |
| right to redeem | विमोचनाचा हक्क | [ sec. 177] |
| sound mind | निकोप मन | [ sec. 12] |
| the good bailed | निक्षेपित माल | [ sec. 150] |
| undue influence | गैरवाजवी प्रभाव | [ sec. 16] |
| voidable contract | शून्यकरणीय संविदा | [ sec. 2(i)] |
| void agreements | शून्यवत करार | [Chapt. II] |

# भारतीय संविदा अधिनियम, १८७२
# The Indian Contract Act, 1872

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अडवून ठेवण्याचा हक्क | retainer | [ कलम २१७] |
| अनुमती | ratification | [ कलम १९६ ] |
| अनुमानित | Inferred | [ कलम १८७ ] |
| अन्योन्य वचनाचे पालन | performance of receiprocal promises | [ कलम ५९ ] |
| अभिसंकेत | engagement | [ कलम ४६] |
| अविरत हमी | Continuing gurantee | [ कलम १२९] |
| अशक्य कृती | impossible act | [ कलम ५६] |
| आबंधन | obligation | [ कलम ३७] |
| उपलक्षित वचन | Implied promise | [ कलम १४५] |
| ऋणी | Indebted | [ कलम १६(३)(ग)] |
| क्षतिपूर्तीधारक | indemnity holder | [ कलम १२५] |
| क्षतिपूर्ती संविदा | Contract of indemnity | [ कलम १२४] |
| गैरवाजवी प्रभाव | undue influence | [ कलम १६] |
| जबरदस्ती | coercian | [ कलम १५] |
| तारण | pledge | [ कलम १७२] |
| तारणकार | pawnor | [ कलम १७२] |
| तारणधारक | pawnee | [ कलम १७२] |
| तारणरूप निक्षेप | bailment of pledge | [ कलम १७२] |
| त्याग करणे | renumciation | [ कलम ४५] |
| नाकारणे | repudiate | [ कलम २१५] |
| निकोप मन | sound mind | [ कलम १२] |
| निक्षेप | bailment | [ कलम १४८] |
| निक्षेपग्राही | bailee | [ कलम १४८] |
| निक्षेपित माल | bailed goods, the goods bailed | [ कलम १५०] |
| पालनाची प्रविदा | offcer of performance | [ कलम ३८] |
| प्रकर्ता | principal | [ कलम १८२] |
| प्रक्रांती | devolution | [ कलम ४५] |
| प्रतिफल | consideration | [ कलम २(घ)] |
| प्रतिभूचे दायित्व | surety's liability | [ कलम १२८] |
| प्रविदा | offer | [ कलम ३८] |
| प्रेषण | consign | [ कलम ४२] |
| मुक्त संमती | free consent | [ कलम १४] |
| मुख्य ऋणको व धनको | principal debtor and creditor | [ कलम १२६] |
| लबाडी | fraud | [ कलम १७] |
| वचनदाता | promisor | [ कलम २(ग)] |

| | | |
|---|---|---|
| वचनग्रहीता | promisee | [ कलम २(ग)] |
| वचनाचे प्रतिफल | consideration for the promise | [ कलम २(घ)] |
| विपर्यास | misrepresentation | [ कलम १८] |
| विमोचनाचा हक्क | right to redeem | [ कलम १७७] |
| शून्यकरणीय संविदा | viodable contract | [ कलम २(झ)] |
| शून्यकरणीय संविदेचे विखंडन | rescission of voidable contract | [ कलम ६६]] |
| शून्यवत करार | void agreements | [ प्रकरण दोन]] |
| सहप्रतिभू | co-sureties | [ कलम १४६]] |
| संमती | consent | [ कलम १३] |
| समाश्रित संविदा | contingent contract | [ कलम ३१] |
| संयुक्त अधिकाराची प्रक्रांती | devolution of joint right | [ कलम ४५] |
| संयुक्त दायित्वांची प्रक्रांती | devolution of joint liabilities | [ कलम ४२] |
| संविदा | contract | [ कलम १] |
| संविदा भंग | breach of contract | [ कलम ७४] |
| संसूचना | communication | [ कलम १] |
| हमी संविदा | contract of guarantee | [ कलम १२६] |
| हमीसाठी प्रतिफल | consideration for gurantee | [ कलम १२७] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई